# छत्रपती शिवाजी महाराज एक जाणता राजा



मराठी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० ला महाराष्ट्रातील पुण्यात असलेल्या जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला. एक आदर्श शासनकर्ता, उत्कृष्ट योद्धा व सहिष्णू राजा म्हणून त्यांनी भारतीय आणि विशेषत्वाने महाराष्ट्रीय इतिहासात आपला विशेष ठसा उमटवला आहे. शिवरायांच्या वडिलांचे नाव शहाजी राजे भोसले व आईचे नाव जिजाबाई असे होते. जिजाबाई या धार्मिक स्वभावाच्या सात्विक स्त्री होत्या. त्या शिवरायांना लहान असताना युद्धाच्या गोष्टी सांगत असत. रामायण महाभारतातील कथा सुद्धा त्या सांगायच्या. या सर्व गोष्टींचा शिवरायांवर खूप प्रभाव झाला.




डॉ.दिलीप बंजारा

महात्मा गांधी

महाविद्यालय अहमदपूर


ज्या काळात शिवाजी महाराजांचा जन्म झाला तेव्हा भारतात विदेशी व अत्याचारी मुस्लिम शासकांचे राज्य होते. मुस्लीम शासकांद्वारे भारतीयांवर होत असलेली आक्रमणे, लूट व धार्मिक सक्ती पाहून शिवरायांनी १६ वर्षांच्या वयातच स्वराज्य स्थापनेचा निर्णय घेतला. शिवराय लहान असताना शहाजी राजांनी त्यांना व जिजाबाईंना दादाजी कोंडदेव यांच्या जवळ सोडून दिले. दादाजी कोंडदेवांनीच शिवरायांना युद्ध कला, जसे घोडस्वारी, तलवारबाजी, बान मारणे असे शिक्षण दिले. १० वर्षांच्या असताना १४ मै १६४० रोजी महाराजांचे लग्न सईबाई यांच्याशी लाल महल पुणे येथे करण्यात आला. शिवाजी महाराज्यांच्या पत्नीचे चे पूर्ण नाव सईबाई निबळकर असे होते.

मुघलांच्या ताब्यात असलेले गड किल्ले परत मिळवण्यासाठी त्यांनी आपल्या उपक्रमाची सुरुवात, त्यांच्याशी सहमत असलेल्या समवयस्क तरुणांन सोबत केली. वर्ष १६४५ मध्ये शिवाजी महाराजांनी मुघल बादशाह आदिलशाहच्या कोंढाणा किल्यावर हल्ला करून त्याला जिंकून घेतले. या नंतर आदिलशाह च्या सेनेने शहाजी राजांना बंदी बनून घेतले व शिवरायांना कोंढाणा सोडण्याची मांग केली. वडिलांना वाचवण्यासाठी त्यांना कोंढाणा सोडावा लागला. शाहजी राजाच्या मुक्ततेनंतर १६४५ सालीच त्यांचा मृत्यू झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर शिवाय महाराजांनी परत आक्रमण करणे सुरू केले.

वर्ष १६५९ मध्ये आदिलशाह ने आपला सगळ्यात बहादुर सेनापती अफजलखानाला शिवरायांना मारण्यासाठी पाठवले. त्या वेळी महाराज प्रतापगडावर होते. अफजलखानाने मैत्रीच्या नात्याने शिवरायांना भेटण्याचे खोटे नाटक केले. प्रतापगडाच्या पायथ्याशी असलेल्या एका झोपडीत शिवराय व अफजलखान १० नोव्हेंबर १६५९ ला भेटले. दोघांमध्ये शर्त होती की सोबत एका तलवारी शिवाय कोणतेही हत्यार आणायचे नाही. शिवरायांना माहीत होते की अफजलखान त्यांना मारण्यासाठी आलेला आहे म्हणून त्यांनी आपल्या कपड्यांखाली चिलखत चढविले होते व हातात वाघाची नखे लपवून ठेवली. ज्या वेळी शिवराय झोपडीत पोहचले तेव्हा अफजल खानाने त्यांना मिठी मारण्यासाठी हाथ पुढे केले. शिवरायांनी सुद्धा त्याला मिठी मारली पण दुसऱ्याच क्षणी अफजल खानाने आपल्या हातात असलेल्या चाकूच्या सहायाने शिवरायांच्या पाठीवर वार केला. परंतु चिलखत घातले असल्याकारणाने महाराज बचावले. दुसऱ्याच क्षणी त्यांनी आपल्या हातात असलेल्या नखांनी अफजलखानावर हमला केला. जोरदार हमल्याने अफजल खान घायाळ झाला व काही मिनिटातच तो मारला गेला. भेटीपूर्वी ठरलेल्या हालचाली नुसार महाराजांनी सैन्याला इशारा दिला. शिवरायांचे सैन्य अफजलखानाच्या बेसावध सैन्यावर तुटून पडले. या युद्धात महाराजांनी हत्ती, घोडे, उंट, मौल्यवान रत्न, अलंकार ई. संपत्ती लुटली.

मुघल शासक औरंगजेबाचे लक्ष उत्तर भारताकडून दक्षिण भारताकडे वळले. औरंगजेब शिवाजी महाराजांबद्दल जाणून होता. त्याने दक्षिण भारतात त्याचा मामा शाहिस्तेखान याला सुभेदार म्हणून नेमले. शाहिस्तेखान आपल्या १ लाख ५० हजार सैनिकांना घेऊन पुणे पोहचला व तेथे त्याने लूटपाट सुरू केली. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील लाल किल्ल्यात त्याने तळ ठोकला. शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाला मारण्यासाठी योजना बनवली. महालाजवळून जाणाऱ्या एका लग्न मिरवणुकीचा आधार घेत शिवाजी महाराज आपल्या काही साथीदारांसोबत पहारेकऱ्यांच्या नजरा चुकवत महालात शिरले. महाराजांना लाल महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच शाहिस्तेखानच्या खोलीत शिवाजी महाराजांनी प्रवेश केला. आवाजाने शाहिस्तेखान जागे झाला. महाराजांना समोर पाहून तो घाबरला जीव वाचवण्यासाठी त्याने महालाच्या खिडकीतून उडी मारली. शिवाजी महाराजांनी चपळाईने त्याच्यावर तलवारीचा वार केला पण या हा वार त्याच्या हाताच्या बोटावर लागला व त्याची तीन बोटे कापली गेली. शाहिस्तेखान तेथून पळून गेला. महाराजांच्या या शौर्य मुळे त्यांची कीर्ती अधिकच वाढून

नंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी मुघलांना सळो कि पळो करून सोडले. महाराजांनी मुघलांच्या ताब्यात असलेल्या सुरत शहरावर लूट करून खूप सारे धन मिळवले. आज शिवाजी महाराज महाराष्ट्रीयनासाठी दैवता प्रमाणे आहेत. शिवाजी महाराज हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या पराक्रमाच्या गोष्टी आजही महाराष्ट्रासह पूर्ण देशात सांगितल्या जातात. शिवाजी महाराज गोरिल्ला युद्ध कलेचे जनक म्हणून देखील ओळखले जातात. मराठा साम्राज्याचे जनक शिवाजी महाराज यांचे ३ एप्रिल १६८० साली अवघ्या चाळीस वर्षांच्या वयात निधन झाले. परंतु अवघ्या ३४० वर्षांनंतर आजही महाराष्ट्रीयन जनतेच्या मनात ते जिवंत आहेत. जय हिंद जय शिवराय.

दैनिक लोकशाही विचारांचा रक्षक
रिपब्लिकन गार्ड

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंचायत राज व्यवस्था

तत्कालीन प्रस्थापितांनी स्थानिक शासनासंबंधी व पंचायतीराजच्या संबंधी त्यांचे अनेक विचार मांडले आहेत . त्यांनी संविधान सभेत पंचायत राज व्यवस्थेसंबंधी फार कमी विचार मांडले होते. त्यांचा त्यावेळसच्या पंचायतराज प्रारूपास कडाडून विरोध होता. ग्रामपंचायतीसंबंधी व भारतीय गावासंबंधी त्यांनी संविधान समेत काललले विधाने जगभर गाजले व त्या एकाच विधानावरून त्यांचे ग्रामीण व्यवस्थेबद्दलचे आकलन स्पष्ट होते ते विधान होते,



What is the Village but a sink and localism, a den of ignorance, narro- mindedness and communalism ? I am glad that the draft constitution has discarded the village and adoptes the individual as unit (Constitiution -ssembly Database, 4 November 1948. pp. ३८-९). त्यांनी केलेले हे विधान आजही पूर्णपणे असत्य आहे, असे म्हणता येत नाही आणि म्हणून डॉ. आंबेडकरांनी पंचायतीराज संस्थामध्ये दलित वर्गासाठी विशेष प्रतिनिधित्वाची मागणी १९३२ मध्ये बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कॉऊसिल डिबेटस्मध्ये केली होती व त्यावेळच्या ग्रामपंचायत विधेयकाला कडाडून विरोध केला होता. त्यांच्या मते भारतासाठी स्वशासनाच्या सिद्धांताचा स्वीकार तेव्हाच केला जाईल जेव्हा या प्रत्येक स्वशासन संस्थेत दलित वर्गाला त्यांच्या अधिकाराचे रक्षण करण्यासाठी विशेष प्रतिनिधित्व दिले जाईल व त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल.

प्रा.डॉ.दिलीप बंजारा
अहमदपूर. मो.९८८१०९०५८८

'ग्रामपंचायतीच्या प्राचीन पद्धतीवर त्यानी सडकून टीका केली होती. ते म्हणत, जर भारत राष्ट्रभक्तीची भावना उत्पन्न करण्यात यशस्वी झाला नसेल, तर त्याचे मुख्य कारण ग्रामपद्धती अस्तित्त्वांत असणे हे आहे. तिने लोकांना स्थानिक विशेषतेने स्थानिक देशाभिमानाने व्याज केले आहे. तिने विस्तृत नागरी भावनेला मुळीच जागा ठेवली नाही. त्यामुळे प्राचीन ग्रामपंचायतामुळे भारत संघटित लोकांचा देश बनू शकला नाही. ग्रामपंचायतीना ग्रामीण गणराज्य म्हटले जायचे. त्यासंबंधी ते म्हणतात, 'या गणराज्यांचे गुण काहीही असोत, मला असे म्हणताना मुळीच संकोच वाटत नाही की ते भारतातील सार्वजनिक आयुष्याच्या नाशाचे कारण राहिले आहेत.'

डॉ. आंबेडकरांच्या मते, ग्रामपंचायत ही ग्रामीण जनतेच्या नागरी सुविधांवर परिणाम करणाऱ्या स्वयंशासनाच्या प्रश्नाचीच हाताळणी करीत नाही तर ती ग्रामीण जनतेच्या स्वातंत्र्य, जीवन आणि मालमत्तेच्या समस्येवरही परिणाम करते. स्थानिक संस्थाच्या कामाचे ओझे कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीची आवश्यकता आहे. या आमपंचायतींची रचना करताना ते म्हणतात की, मी या मताचा आहे की, ग्रामपंचायतीवर नेमणुकीने दलित वर्गाच्या प्रतिनिधित्वाची तरतूद केली पाहिजे. ही नेमणूक जिल्हाधिकाऱ्याने किंवा जिल्हा स्थानिक मंडळाच्या अध्यक्षाने केल्यास अधिक चांगले. ज्या खेड्यात या वर्गाचे कमीत कमी ५० वयस्क व्यक्ती आहेत त्याठिकाणी पंचायतीवर नेमणुकीने किंवा राखीव जागाच्या पद्धतीने प्रतिनिधिचा निश्चित करण्याची व्यवस्था केलीच पाहिजे. जातीय प्रतिनिधित्त्व ही वाईट गोष्ट नाही, ते विष नाही, तर या देशातील निरनिराळ्या वर्गाच्या रक्षा आणि सुरक्षिततेसाठी करण्यात येणारी ती सर्वोत्तम व्यवस्था आहे.

ग्रामीण न्यायपालिका स्थानिक प्रतिनिधी स्थानिक कार्यासोबतच काही फौजदारी व दिवाणी खटल्याची न्यायिक तपासणी करण्याचे कार्यही करतील. पंच न्यायिक व्यवस्थेला त्याचा विरोध होता. त्यांनी अशा निवडून आलेल्या पंचाच्या न्यायदानाच्या योग्यतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते व त्याऐवजी पर्यायी व्यवस्था सुचविली होती. ती म्हणजे, अवैतनिक मॅजिस्ट्रेटच्या पीठातून जिल्हावार न्यायिक परिमंडळाची विभागणी करून अशा न्यायिक मंडळावर शासनाने न्यायिक कार्य करण्यासाठी तीन किंवा अधिक व्यक्तीचे नामांकन करावे व त्यांच्या माध्यमातून न्यायदानाचे कार्य करावे. याचेच सुधारित स्वरूप म्हणजे आजचे लोक अदालत होय.

भारतात पंचायतराजच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आंबेडकरांनी प्रामुख्याने तीन गोष्टींवर भर दिला होता. १) पंचायतराजमध्ये अल्पसंख्याकांना / दलितांना आरक्षण म्हणजे आजच्या अनुसूचित जाती व जमाती २) पंचायतमध्ये न्यायिक तज्ज्ञांची आवश्यकता आणि ३) जातिव्यवस्था बदल. १९९२ मध्ये ७३ व्या घटनादुरुस्तीत उपरोक्त नमूद बाबींचा वेगळ्या स्वरूपात का होईना समावेश झाल्याचे निदर्शनास येते. याच बाबीची आज पंचायतराजची प्रमुख वैशिष्ट्ये व व्यापकता सिद्ध करण्यासाठी आपल्या देशातील विद्वान जगभर चर्चा करत आहेत; पण या सर्व बाबींची चर्चा व मांडणी डॉ. आंबेडकरांनी १९३२ मध्येच केली होती. त्या दृष्टीने ते पंचायतराजच्या आजच्या सुधारणांचे अग्रणी पितामह ठरतात. ७३ व्या घटना दुरुस्तीने १) पंचायती राजमध्ये अनुसूचित जाती व जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण दिले आहे. २) आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी योजना तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्याचा अधिकार. ३) भू-सुधार, गरिबी निवारण, दुर्बल घटकांचे कल्याण इ. कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार हे सर्व अधिकार देऊन डॉ. आंबेडकरांच्या विचारांची तः अपेक्षापूर्ती करण्यात आली आहे; परंतु अजूनही या ७३ व्या घटना दुरुस्तीत नव्यवस्था निर्मूलन या मुद्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाने न करण्याची गरज आहे.

# प्रा.डॉ.दिलीप बंजारा यांची निवड

अहमदपूर,(प्रतिनिधी:)-प्रा.डॉ. दिलीप बंजारा हे महात्मा गांधी महात्मा गांधी महाविद्यालयात लोकप्रशासन विभाग प्रमुख असून ते नेहमी वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिण्याचे काम करीत असतात. त्यांच्या या लिखाणातून शैक्षणिक, सामाजिक व संस्कृती अशा विविध विषयांना हात घालतात. तेव्हा सर्व कार्याचा विचार करून महात्मा कबीर समता परिषद तर्फे देण्यात येणारा पुरस्कार व महाराष्ट्रातील प्रतिष्ठेचा समजला जाणारा महाराष्ट्र भूषण व



जीवनगौरव पुरस्कारासाठी प्रा. डॉ. दिलीप बंजारा यांची शैक्षणिक साहित्यिक व सामाजिक कार्य पाहून निवड करण्यात आलेली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन आपल्या कार्यातून समाजाची झालेली प्रगती लक्षात घेऊन स न २०२३ ह्या वर्षाचा महाराष्ट्र जीवन भूषण गौरव पुरस्कार यांना जाहीर करण्यात आलेला आहे. याबद्दल प्रा. डॉ. बंजारा यांचे सर्व मित्रपरिवार प्राचार्य डॉ. एस. आर. शेळके सर डॉ.एम एम निवर्गी, डॉ अनिल कुमार जाधव, डॉ. अनिल कांबळे, डॉ. नितीन देशमुख,डॉ. विनोद माने, डॉ.देसाई, डॉ.श्रीमती आर.ए.जाधव आमचे **पान ४ वर**

३००मा.घावण,.पाक.मा. घालण,खा- आहे.

# महात्मा गांधी महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी



अहमदपूर(प्रतिनिधी)दि.महात्मा गांधी महाविद्यालय जे की शिक्षणाचे पंढरी म्हणून ओळखले जाते या वर्षा पासून शैक्षणिक धोरण स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या माध्यमाने व महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठातून नवीन शैक्षणिक धोरण राबविण्याचे आव्हान करण्यात आले होते. आणि त्यानुसार महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर यांनी सुद्धा नवीन शैक्षणिक धोरण राबविले आहे यात पूर्वी सारखे शिक्षण विद्यार्थ्यांना घेता येणार नाही अर्थातच या मध्ये विद्यार्थ्यांना ज्या शाखेत ते शिकत आहेत ते विषय तर शिकावेच लागेल त्याच बरोबर इतर शाखेच्या विषयांचे सुद्धा त्यांना अवलोकन करावे लागेल ज्या मुळे हे विषय घेतल्यानंतर त्यांच्या ज्ञानजात वाढ होईल.या साठी आज महात्मा गांधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या मर्जी नुसार कला,विज्ञान,वाणिज्य आणि संगणक विषयाच्या विद्यार्थ्यांना त्यांना विषय निवडीच्या संदर्भात विकल्प देण्यात आले होते.आणि त्यानुसार आज महात्मा गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य जे की आजच्या बैठकीचे अध्यक्ष म्हणून होते त्यांच्या नेतृत्वाखाली आणि नवीन शैक्षणिक धोरणचे समन्वयक प्रा डॉ आर एम कदम यांच्या नेतृत्वाखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे आणि मराठी विभागाचे विभाग प्रमुख तथा आमच्या महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी प्रा डॉ अनिल कांबळे यांनी केले यात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना असे आव्हान केले की,विद्यार्थ्यांनी आपापले स्वावलंबन बाळगून त्यांनी त्यांच्या पद्धतीने विषयाची निवड करावी. तसेच आर एम कदम यांनी असे म्हटले की,प्रत्येक विद्यार्थ्यांना या ठिकाणी आपला विषय निवडण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे आणि त्या नुसार महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी यांनी त्यानुसार विषयाची निवड करून त्यांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले बैठकीचे आभार मराठी विभाग प्रमुख डॉ बी व्ही नरवाडे सर यांनी मानले.विषय निवडी दरम्यान महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.

# उतारवयात बायकोचा सल्ला ऐकण्यातच आपले हित!

**बऱ्याच दिवसापासून आणि समाजात घडणाऱ्या कौटुंबिक निरीक्षणावरून मनात एक अशी इच्छा निर्माण झाली की, या मुद्द्यावर एखादा लेख लिहिणे गरजेचे वाटते म्हणून मी हा लेख लिहिण्याचा धाडस करीत आहे. यात बऱ्याच गोष्टी मी अनुभवलेल्या आहेत तेच मी या ठिकाणी नमूद करू इच्छितो लेख एखाद्याला आवडेल ना आवडेल ही पुढची गोष्ट आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर सल्ल्याचे महत्त्व आहे. पण उतारवयात तो अधिक महत्त्वाचा ठरतो. उतारवय म्हणजे अनुभवांचे भांडार आणि पुढील आयुष्यात स्थैर्य निर्माण करण्याचा काळ, या टप्प्यावर जोडीदाराचा सल्ला म्हणजे आपल्या जीवनाला योग्य दिशा दाखवणारा दीपस्तंभ ठरतो. विशेषतः बायकोचा सल्ला हा केवळ मत नसून, आपल्या कल्याणासाठी विचारपूर्वक दिलेला मार्गदर्शक ठरतो.**

उतारवयातील गरजा आणि सल्ल्याचे महत्त्वः वृद्धत्वात शारीरिक आणि मानसिक क्षमता हळूहळू कमी होत जातात, कुटुंबातील जबाबदाऱ्या कमी होऊ लागतात, पण आरोग्य आणि आर्थिक स्थैर्य राखण्याचे महत्त्व वाढते. अशा वेळी बायकोचा सल्ला महत्त्वाचा ठरतो, कारण तिचे आयुष्यभराचे निरीक्षण आणि आपल्याबद्दलची जाणीव तिला आपल्या गरजा आणि मर्यादा चांगल्या प्रकारे समजावून देतात. तिचा सल्ला म्हणजे तिच्या अनुभवांचा परिपाक असतो, जो आपल्या जीवनाला अधिक सुकर आणि संतुलित बनवतो. व्यवहारिक दृष्टिकोनाचा लाभः उतारवयात अनेकांना समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ असते. परंतु, बायको अनेकदा या तळमळीला वास्तवाची जोड देते. ती म्हणते, आधी काळजी स्वतःची घ्या आणि मगच समाजासाठी काम करा. उदाहरणार्थ, एका व्यक्तीने निवृत्तीनंतर समाजसेवेसाठी स्वतःला झोकून दिले, पण आर्थिक नियोजनाचा अभाव असल्याने कुटुंबाला अडचणींचा सामना करावा लागला, अशा वेळी बायकोचा सल्ला ऐकला असता, तर ते आधी आर्थिक स्थैर्य निर्माण करून नंतर समाजसेवेसाठी अधिक चांगल्या प्रकारे



योगदान देऊ शकले असते.

समंजसपणाचा आधारः बायकोचा सल्ला म्हणजे केवळ आर्थिक आणि आरोग्यविषयक विचार नाही, तर आपल्या उर्जेचा आणि वेळेचा योग्य वापर करण्याची जाणीवही असते. अनेकदा वृद्धत्वात भावना अधिक प्रभावी करतात. समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा असेल, तरीही ती वास्तवात रुजवण्यासाठी आधारभूत गोष्टींची काळजी घेणे आवश्यक असते. बायकोच्या सल्ल्यातून समजतो की आपण प्रथम स्वतःच्या गरजा पूर्ण करायला हव्यात, कारण समाजसेवा करण्यासाठी स्वतः मजबूत असणे अत्यावश्यक आहे.

**उतारवयातील अनुभवांचे महत्व :**

एक ज्येष्ठ गृहस्थ, जो निवृत्तीनंतर समाजसेवेसाठी कार्य त्याच्या पत्नीने त्याला आधी स्वतःच्या आरोग्याची आणि सांगितले. सुरुवातीला त्याला हा सल्ला साधा वाटला, परंतु कळला. आपल्या कुटुंबासाठी स्थैर्य निर्माण केल्यानंतर अधिक प्रभावीपणे वापरली आणि त्यांचे कार्य यशस्वी झाले. बायकोच्या सल्ल्याचा व्यापक विचार उतारवयातील बायकोचा सल्ला हा तिच्या दीर्घ अनुभवांवर आधारित असतो. ती आपल्या कुटुंबाच्या गरजा, आपल्या स्वभावातील गुण-दोष, आणि सामाजिक परिस्थिती यांचा समतोल साधून सल्ला देते. तिच्या या सल्ल्यामध्ये आपल्या भल्याचा विचार तर असतोच, पण आपल्या कुटुंबाच्या स्थैर्याचीही जाणीव असते.

उतारवयात बायकोचा सल्ला ऐकण्यातच आपले हित आहे हा विचार केवळ सल्ल्याला महत्त्व देत नाही, तर त्यामागच्या अनुभवाला आणि निःस्वार्थ भावनेलाही अधोरेखित करतो. बायकोचा सल्ला म्हणजे तिच्या काळजीची आणि प्रेमाची अभिव्यक्ती आहे. तो सल्ला ऐकून त्यावर विचार करूनच निर्णय घेतल्यास उतारवय अधिक समाधानी, सुरक्षित आणि स्थिर होऊ शकते. अंततः उतारवयात ओडीदाराचा सल्ला ही केवळ मार्गदर्शनाची बाब नसून, तो आपल्या जीवनाला दिशा देणारा एक विश्वासू साथीदार आहे. तिच्या सल्ल्याचे महत्त्व ओळखणे, हेच खरे आयुष्याचं यश आहे.

**-डॉ. बंजारा दिलीप लालू,**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

# सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ उद्घाटन सोहळा संपन्न...



अहमदपूर(प्रतिनिधी)दि.शिक्षणातून नोकरी व उद्योजकता वाढीस लागणे हे शिक्षणाचे खरे उद्देश असले पाहिजे.बदलत्या काळात फक्त पारंपारिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करू शकत नाही.विद्यार्थ्यांनी कौशल्या वर आधारित शिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे.कौशल्य विकासा मुळेच विद्यार्थी हा सक्षम बनू शकतो. डिजिटल मार्केटिंग,वेब डिझाईनिंग,हॉटेल मॅनेजमेंट व फॅशन डिझायनिंग यासारख्या ऑनलाईन कोर्से अध्ययन पदवी शिक्षणा बरोबरच केले पाहिजे.भारताला सक्षम बनवण्यासाठी कौशल्य आधारित धोरणात्मक नीतीची गरज आहे. विविध स्पर्धा परीक्षेच्या यशस्वीतेसाठी कला शाखेत प्रवेश घेणे हेच महत्त्वाचे आहे. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो डॉ एस आर शेळके म्हणाले की विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर बनले पाहिजे.प्रयत्न आणि चिकाटी महत्त्वाची आहे.विद्यार्थ्यांनी काळानुरूप बदल करणे आवश्यक आहे. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

त्याच बरोबर कार्यक्रमासाठी उपस्थित विचार विकास मंडळाचे सहसचिव सुरेश देशमुख,कोषाध्यक्ष रामचंद्र शेळके या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख डॉ नितीन देशमुख मराठी विभाग प्रमुख डॉ अनिल कांबळे,डॉ बंजारा डॉ नरवाडे डॉ सूर्यवंशी डॉ राजश्री मामरे,डॉ बी के माकणे पाटील डॉ अर्जुन,डॉ साठे डॉ.जोंधळे डॉ कांबळे प्रा सुनील दहिकांबळे डॉ दाभाडे उपस्थित राहिले. अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्प२०२४-२५या भिती पत्रकाचे उद्घाटन केले. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून रवी कादम हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ राजश्री जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा अर्जुन पांडुरंग यांनी केले तर आभार डॉ श्याम शिंदे यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते.

दैनिक सुवर्ण महाराष्ट्र

# महाराष्ट्राचे हरित क्रांती 'श्वेतेक्रांतीचे जनक ॲड. डॉ. वसंतरावजी नाईक

कृषी क्षेत्रात कापुस एकाधिकार योजना, कृषि उत्पन बाजार समितीचे जनक, विनोबा भावे यांची भुदान चळवळ, दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी गाई व म्हैस कर्ज, विविध फळपिके संशोधन व विकास, कृषी विद्यापीठ स्थापना, पाणी आडवा पाणी जिरवा उद्राते, वसंत बंधारे व पाझर तलावाचे जनक, कृषि मंडळे स्थापना इत्यादी अद्वितीय काम त्यांनी केले व १९६५ साली येत्या २ वर्षात माझे राज्य स्वयंपूर्ण नाही झाले तर झाडाला मी स्वतः लटकवीन अशी शनिवार वाडा येथे जाहिर घोषणा करणारे ते मुख्यमंत्री होते. त्यांनी अन्नधान्य स्वयंपूर्णता करून दाखविले. असा हा महान शेतकऱ्यांचा कैवारी, पाठीराखा नेता होऊन गेला. महाराष्ट्राचे हरित क्रांती व श्वेत क्रांतीचे जनक ॲड. डॉ. मा. मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.



श्री वसंतराव फुलसिंग नाईक ( राठोड ) यांचा जन्म दि. १ जूलै १९१३ रोजी गहूली ता. पुसद, जि. यवतमाळ येथे एका शेतकरी कुटूबात झाला. पहिल्यापासून संघटना कौशल्य आणि कृषि क्षेत्राची आवड असलेला सर्वसामान्य माणुस. शेती व शेतकरीबाबत असामान्य तळमळ व त्यासंबंधी कार्य यामुळे कृषी क्रांतीचे जनक झाले. महाराष्ट्रात सर्वात जास्त वेळा ४ सलग १२ वर्षे मुख्यमंत्री राहिले. मध्यप्रदेशचे पहिले उपमहसुल मंत्री महाराष्ट्राचे पहिले महसुल मंत्रीचा मान त्यांच्याकडे आहे. राज्य केंद्रीय बँकेचे संचालक, पुसद शेतकरी मंडळाचे पहिल्या अध्यक्षाचा मान मिळविला.राज्यातील दारूबंदी उठवून शासनाचा महसुल वाढविला व दारु भेसळपासून बचाव केला.

रोजगार हमी योजना ही मुहर्तमेढ रोवून १९७२ दुष्काळ पडला, त्यावेळी ५० लाख लोकांना रोजगार हमी योजना अंतर्गत काम देऊन अन्नधान्य पुरवठा करून भुकबळी पासून जनतेचे संरक्षण केले. महाराष्ट्रात देशातील प्रथमतः त्रिस्तरीय पंचायतराजचा उगम करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले व जनतेच्या हाती सोपावून, प्रवाहात कार्यप्रणालीत आणण्याचे काम त्यांनी केले. अशा ह्या महान जानता राजा, शेतकऱ्यांचा कैवारी 'हरितक्रांती' श्वेत क्रांतीचे जनक सहकारची मुहर्तमेढ रोवणाऱ्या कृषी संशोधन केंद्र, विद्यापीठ जनक राजनिती तज्ञ, कृषीतज्ञ यांचा जन्मदिवस कृषी दिन म्हणून साजरा करून मानाचा मुजरा करून त्याचे ऋणी राहून जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन करूयात !!



**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**लोकप्रशासन विभाग प्रमुख, महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर.**

# महाराष्ट्राचे हरित क्रांती व श्वेतक्रांतीचे जनक : ॲड.डॉ.वसंतरावजी नाईक



कृषी क्षेत्रात कापुस एकाधिकार योजना, कृषि उत्पन बाजार समितीचे जनक, विनोबा भावे यांची भुदान चळवळ, दुग्ध व्यवसायाला चालना देण्यासाठी गाई व म्हैस कर्ज, विविध फळपिके संशोधन व विकास, कृषी विद्यापीठ स्थापना, पाणी आडवा पाणी जिरवा उद्गाते, वसंत बंधारे व पाझर तलावाचे जनक, कृषि मंडळे स्थापना इत्यादी अद्वितीय काम ज्यांनी केले व १९६५ साली येत्या २ वर्षात माझे राज्य स्वयंपूर्ण नाही झाले तर झाडाला मी स्वतः लटक्वीन अशी शनिवार वाडा येथे जाहिर घोषणा करणारे ते मुख्यमंत्री होते. त्यांनी अन्नधान्य स्वयंपूर्णता करून दाखविले. असा हा महान शेतकऱ्यांचा कैवारी, पाठीराखा नेता होऊन गेला.

महाराष्ट्राचे हरित क्रांती व श्वेत क्रांतीचे जनक ॲड.डॉ.मा.मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. श्री वसंतराव फुलसिंग नाईक (राठोड) यांचा जन्म दि. १ जूलै १९१३ रोजी गहूली ता. पुसद, जि. यवतमाळ येथे एका शेतकरी कुटूबात झाला. पहिल्यापासून संघटना कौशल्य आणि कृषि क्षेत्राची आवड असलेला सर्वसामान्य माणुस. शेती व शेतकरीबाबत असामान्य तळमळ व त्यासंबंधी कार्य यामुळे कृषी क्रांतीचे जनक झाले. महाराष्ट्रात सर्वात जास्त ४ वेळा सलग १२ वर्षे मुख्यमंत्री राहिले. मध्यप्रदेशचे पहिले उपमहसुल मंत्री महाराष्ट्राचे पहिले महसुल मंत्रीचा मान त्यांच्याकडे आहे. राज्य केंद्रीय बँकेचे संचालक, पुसद शेतकरी मंडळाचे पहिल्या अध्यक्षाचा मान मिळविला.

राज्यातील दारूबंदी उठवून शासनाचा महसुल वाढविला व दारु भेसळपासून बचाव केला. रोजगार हमी योजना ही मुहर्तमेढ रोवून १९७२ दुष्काळ पडला, त्यावेळी ५० लाख लोकांना रोजगार हमी योजना अंतर्गत काम देऊन अन्नधान्य पुरवठा करून भुकबळी पासून जनतेचे संरक्षण केले. महाराष्ट्रात देशातील प्रथमतः त्रिस्तरीय पंचायतराजचा उगम करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले व जनतेच्या हाती सोपावून, प्रवाहात कार्यप्रणालीत आणण्याचे काम त्यांनी केले. अशा ह्या महान जानता राजा, शेतकऱ्यांचा कैवारी 'हरितक्रांती' श्वेत क्रांतीचे जनक सहकारची मुहर्तमेढ रोवणाऱ्या कृषी संशोधन केंद्र, विद्यापीठ जनक राजनिती तज्ञ, कृषीतज्ञ यांचा जन्मदिवस कृषी दिन म्हणून साजरा करून मानाचा मुजरा करून त्याचे ऋणी राहून जन्मदिनानिमित्त विनम्र अभिवादन करूयात !!

**डॉ.बंजारा दिलीप लालू**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर.



गळती लागत त्यामुळ येथील औषध तसेच आतील दुरुस्त करण्यात येतील असेही त्यानी स्पष्ट केल. ठिकाठिकाणी मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचून

# लोकनायक वसंतराव नाईक साहेब: उपयुक्त व दर्जेदार पुस्तक


पंजाबराव याडीकर लिखित लोकनायक वसंतरावजी नाईक साहेब हे पुस्तक वाचण्यासाठी माझ्या हातात पडल्यानंतर आणि हे पुस्तक वाचून झाल्यानंतर मला यावरती थोडी समीक्षा करावीशी वाटली म्हणून मी माझे मत या ठिकाणी थोडक्यात अर्थात साररुपी मांडत आहे वसंतरावजी नाईक नाईक यांचा जन्म विदर्भातील गहुली या गावी झाला. ते बंजारा समाजाचे भाग्यविधाते. गोरमाटी यांना नविन जगात प्रवेशकर्ते व्हा म्हणुन जागवणारे झोपलेल्यांना जागे करणारे, अंधळ्याना डोळे देणारे, शिक्षणातून ज्ञान, ज्ञानातून समाजसेवा, समाजसेवातून सत्ता व सत्तेतून समाजाचा विकास करण्यासाठी धडपडणारे वसंतरावजी नाईक, समाजातील अनिष्ठ रुडी परम्परा यांना मूठमाती देणारे. शिक्षणाचा प्रचार व प्रसार करणारे. यांच्या जीवनपटाचं सुंदर उलगडा या पुस्तकाच्या लेखकांनी केलेला आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन जवळपास एक तप दैदिप्यमान कारकीर्द पूर्ण केलेले पण आजही गोरमाटी समाजाला विशेष करून मराठवाडयातील माझ्यासारख्या गोरमाटीना नाईक साहेबांविषयी फारशी माहिती नाही जी माहिती आमच्याकडे उपलब्ध आहे ती जुजबी स्वरुपाची आहे. ते राज्याचे मुख्यमंत्री होते येवढं आम्ही सांगू शकतो, याडीकारानी अतिशय सोप्या सरळ सहज समजेल आशा भाषेत महानायक वसंतराव नाईक हे पुस्तक लिहीले आहे. याडीकार पुसद येथील गोरमाटी समाजातील एक आष्टपैलू व्यक्तीमत्व हरहुअरीव्यक्ती, राजकीय, सामाजिक शैक्षणिक परिस्थितीवर सडेतोड लिहीणारे लेखक, कवी, टिकाकार (समीक्षक) म्हणून ते महाराष्ट्रभर प्रसिध्द आहेत. त्यांना साहेबांची खडानखडा माहिती असल्यामुळे आदरणीय पंजाबराव चव्हाण साहेब यांना वसंतराव नाईक यांच्यावर लिहीण्याच्या अधिकार आहे. म्हणूनच त्यांनी हे माहितीपूर्ण पुस्तक लिहिले आहे. नाईक साहेबावर अनेक पुस्तके लिहीली गेली आहेत पण मला वाटते हे पुस्तक वास्तव लिहीले गेले आहे. कारण लेखक हे पुसदचेच रहिवाशी आहेत व लेखकांचे वडील नाईक साहेबाकडे कामानिमित्याने राहत होते.

याडीकारानी लोक नायक वसंतराव नाईक हे पुस्तक पोस्टाने पाठवून दिलेले आहे. ते आज मला मिळाले. पुस्तकाचं बाहयरुप पाहूनच खूप आनंद दडलाय ते मी आपल्यासमोर मांडत आहे पुस्तकाचं मुखपृष्ठ पहातानाच बसंत बहार वसंत ऋतूचा भास होतो. त्यावरचं नाईक साहेबाचं प्रसन्न स्मितहास्य असलेला फोटो पाहून निश्चितच पुस्तक वाचण्यापूर्वीच वाचकाचं मन टवटवीत व प्रफुल्लीत होणार आहे. त्या मुखपृष्ठावर जणूकाही नाईक साहेबांचं हिरवं स्वप्नच साकारलेलं आहे. प्रस्तुत पुस्तकात एकून एकोन चाळीस प्रकरण आहेत.

**पुस्तकाच्या आरंभी भागात लेखकाचे मनोगत आहे. हे मनोगत वाचताना आपण धावते वर्णन ऐकल्यासारखे वाटते. अतिशय सोप्या भाषेत सर्वांना समजेल**

असा भाषेत त्यांनी मनोगत व्यक्त केलेले आहे. गोरगरीब आणि शेतकऱ्यांची दु:खे जाणणारा नेता नाईक साहेब या वाक्याने प्रस्तावनेची सुरवात गोरमाटी समाजातील एक प्रसिद्ध लेखक अधिकारी मा. राजारामजी जाधव यांनी या पुस्तकाला सुंदर बोलकी प्रस्तावना लिहून प्रस्तुत पुस्तकांचा आरसाच वाचकांसमोर उभा केलेला आहे. महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत पत्रकार सत्ताधारी व विराधकांना आपल्या लेखनीवर नाचवनारे, राजकीय भाष्यकार आदरणीय मधुकररावजी भावे यांच्या लेखामुळे वसंतराव नाईक हे इतर नेत्यापेक्षा इतर मुख्यमंत्र्यापेक्षा वेगळे कसे होते हे त्यांनी सिदध करून दाखविले आहेत. भावेसाहेबांचा लेख कितीतरी वेळा वाचत रहावेसे वाटते. कमी जागेत त्यांनी वसंत फुलवलेला आहे. अख्ख्या जीवनपट त्यांनी उभा केलेला आहे. त्यातील एक उदाहरण १९७५ साली नाईक साहेबांना मुख्यमंत्रीपद सोडाचे लागल्यानंतर खुल्या मनाने त्यांनी मा शंकरराव चव्हाण यांना मिठी मारून शाल, श्रीफळ पुष्पहार घालून वर्षा बंगल्यावर आनंदाने मेजवाणी दिली त्यांनी दाखवलेला दिलदारपणा त्यानंतर एका तरी मुख्यमंत्र्याने दाखवले आहे का ? असे उदाहरण अतिशय प्रस्तुत पुस्तकात सुरवातीच्या प्रकरणात नाईक साहेबाचं जन्म, बालपण, शिक्षणाविषयी उदबोधक माहिती लेखकाने दिलेली आहे. त्या काळात शिक्षणात कशा भयान आडचणी महाराष्ट्रात पुन्हा कधीच पडलेले नाही आजचे राजकारण.




लोकनायक वसंतराव नाईक साहेब कार पंजाब चव्हाण पाहता भविष्यात कधी घडणार ही नाही. लेखकांनी या पुस्तकात रोचकपण सामाजिक्रांतीचे प्रवर्तक आदरणीय फुल्लासिंग नाईक / राठोड यांची माहिती दिलेली आहे भटकंतीच्या काळात त्यांनी तांडयाला स्थिरता दिली. शिक्षण किती महत्वाचे आहे हे समाजाला पटवून देण्यामाठी त्यांनी स्व:ताच्या मुलाला कसे शिक्षण दिले. माविषयीची माहिती लेखकांनी दिलेली आहे. फुलसिंग राठोड / नाईक हे करत असताना त्या काळातील बंजारा समाजाचे आद्य समाज सुधारक बंजारातीत पाहीले लेखक मांडवीकर बळीराम पाटील (राठोड यांची संगत त्यांना लाभली. या दोघांनी बंजारातील अनिश रुढी परंपरा यांना घालवण्यासाठी हयातभर झटत राहिले. बळीराम पाटील यांच्या कार्य याविषयीही लेखकाने सुंदर माहिती दिलेली आहे.

लेखकांनी नाईक साहेबांचा कॉंग्रेस प्रवेश, पुसदचे लोकप्रिय नगराधक्ष या विषयी लिहिताना त्यांनी गुन्हेगार जमातीचा कायदा व त्यासाठी नाईकसाहेब व पद्मश्री रामसिंगजी भानावत यांच्या कार्याचे वर्णन केलेले आहे. खरं तर रामसिंग भानवत कोण होते या बदल गोरमाटी समाज आजही अनभिज्ञ आहे. जुने जाणते त्याचं फक्त नाव ऐकून आहेत या पुस्तकामुळे थोडीफार का होईना भानवत विषयी माहिती सर्वांना मिळणार आहे. वसंतराव नाईक साहेब प्राण्यांची तुलना करत नाहक त्यांचं राजकारणात प्रवेशित झाल्यानंतर त्यांनी यशाची एक एक पानी कशी चढत गेले कसे सर करत गेले याचा आलेख लेखकांनी या पुस्तकातून सहज सरळ व सोप्या भाषेत उलगडून दाखविलेला आहे. हे पुस्तक वाचताना वाचक वाचण्यात गुंतत जातो. तो हातातील पुस्तक वाचल्याशिवाय सोडगारच नाही असे मला वाटते आमदार राज्यस्वमंत्री उपमंत्री, कृषीमंत्री महसूलमंत्री मुख्यमंत्री या विषयी सविस्तर उलगडा झालेता आहे. नाईकसाहेबांच्या प्रेरणेने आदरणीय भानावत यांनी महामानव डॉ बाळासाहेब अआंबेडकर यांची भेट घेवून समाजासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती आतिशय महत्वाची आहे. तसेच नाईकसाहेबांनी त्यांच्या सहकार्याच्या मदतीने समाजाच्या ऊतीसाठी प्रगतीसाठी समाजाच्या एकतेसाठी निर्माण केलेली संघटना ऑल इंडिया बंजारा सेवा संघ याचे मुख्यातीचे कार्य व आज संघटनेत आलेली मरगळ या विषयी लेखकाने कोणाचीही भाडभीड न ठेवता रोखठोक मत मांडलेले आहेत खिडीत होत्या हे त्यांनी पुस्तकात मांडलेल्या आहेत. नाईकसाहेबांचं वैवाहिक जीवन लग्नाच्या वेळी आलेल्या आडचणी आडयळा हे मांडण्याची हातोटी निश्चितच प्रसंशनिय आहेत. त्या काळात समाजाच्या रागाचा, बहिष्कार टाकण्याचा रोष पत्काशन नाईकसाहेबांचा अंतरजातीय विवाह झाला हे त्या काळातीत चमत्कारच होता.

इच्छा तेथे मार्ग. आईवडील व मोठ्या भावाची प्रबळ इछा की बसंत शिकून मोठा माणुस बनावा ही त्यांची इच्छा प्रामाणिकपणे नाईक साहेबांनी पूर्ण केली. त्यासाठी त्यांना अपार कट भोगावे लागले. लहानपणी पायपीठ करावी लागली. नाईक साहेब हे संस्कारी, निर्मळ मनाचे, शेतकऱ्यांचे कैवारी दीनदुबळ्याचे बाली होते. मानवाबरोबरच निसर्गावरही ते प्रेम करणारे होते. बकीती व्यवसाय त्यांनी पैसे कमविण्यासाठी नाही तर दीनदुबळ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केला.

नाईक साहेब वेगवेगळे पद भुषविताना मग ते उपमंत्री असोत की मंत्री असोत की मुख्यमंत्री त्यांनी केलेले कार्य हे पुढील राजकारण्यांना कसे दिशादर्शक आहे, प्रेरणादायी आहे याविषयी लेखकाने अतिशय खुबीने मांडणी या पुस्तकात केलेली आहे विशेष म्हणजे साहेबांनी १९७२ च्या भयान, भयंकर, राक्षशी दुष्काळात केलेल्या कामाची दखल लेखकाने प्रभावीपणे मांडलेली आहे. आजचे सत्ताधारी व विरोधक यांचे नाते साप मुंगूसाचे आहे. ते एकमेकाला संपविण्याची भाषा करत आहेत. वेगवेगळ्या गरीब प्राण्याला बदनाम करत आहेत नाईकसाहेब मुख्यमंत्री असताना त्यांनी विधानसभेत २८८पैकी २०० पार जागा विकलेल्या होत्या; पण त्यांनी विरोधकांना कधीच कमी लेखले नाही त्यांना हिस्वले नाही. काम आहविले नाही. विरोधक संखेने कमी होते; पण धारदार होते. मोर्चा काढण्यात तरबेज होते. सरकारला कुठे कसे गाठाचे हे त्यांना माहित होते. नाईक साहेबांना ते विरोध करीत असत तरी नाईकसाहेथ सु गवई, जांबुवंतराव धोटे, बापुसाहेब काळदाते, मृणालताई गोरे दि बा पाटील भाई केशवराव धोंडगे गमफ्तराब देशमुख हे काही उदाहरणादाखल आहेत. टोकाचा विरोध करणा-यांनाही त्यांनी नेहमीच आदरणारे वागविले. त्यांना सन्मान दिले. त्याचे काम केले.

याविषयी लेखकांनी पुस्तकात सविस्तर लिखान केलेले आहे. लेखकांनी नाईकसाहेबांच्या कौटूम्बीक जीवनाविषयी त्याच्या कन्येविषयी भटक्या विमुक्तकरच्या आरक्षणाविषयी, शिवसेनेच्या उद्याविषयी, त्यांचे भाषण, आश्रमशाळेची स्थापना, अनटोल्ड स्टोरी ऑफ वसंतराव नाईक व इतर अनेक विषय या पुस्तकांत लेखकांनी मांडलेले आहेत. हे पुस्तक वाचणीय आहे. नाईकसाहेबांविषयी अतिशय सुंदर व लिलया माहिती देणारे हे पुस्तक आहे. शाळेतील शिक्षक विद्यार्थी यांनी हे पुस्तक घेवून जरूर वाचावेत. ज्यांना नाईक साहेबांविषयी फक्त जुजची माहिती आहे त्यांनी जरुर हे पुस्तक विकत घेवून वाचावे.

**(समीक्षक डॉ.बंजारा दिलीप लालू)**

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

## लक्षवेधी....

# उपपंतप्रधान/उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री पद संविधानिक आहेत का?

प्रा. डॉ.दिलीप लालूप्रसादजी चव्हाण
रा. रूपचंद नगर ता. रेनापुर
जि. लातूर मो नं 9881090588

आज प्रत्येक व्यक्ती संविधानावर चर्चा करतो, संविधानावर आदर व्यक्त करतो, परंतु जे संविधानामध्ये नाही ते सुद्धा सर्रासपणे सुरु आहे. यासाठी कोणीही बोलायला तयार नाही. संविधानामध्ये उपपंतप्रधान, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री असे कोणतेही पद नसतांना मात्र उपपंतप्रधान, उपमुख्यमंत्री शपथ घेताना या देशाने पाहिले आहे. घटनेच्या चाकोरीत न बसणारी ही पदे सर्वांच्या डोळ्यात देखत शपथ घेतात. परंतु ज्यांच्यावर संविधान रक्षकांची जबाबदारी आहे ते मात्र काहीही बोलायला तयार होत नाही.

*1) उपपंतप्रधान*

उपपंतप्रधान पदास कोणतेही घटनात्मक पाठबळ नाही की कसलाही वैज्ञानिक दर्जा नाही. तरीही महामहीम राष्ट्रपती वेंकटरमण यांच्या कार्यकाळामध्ये त्यांनी अडवल्यानंतरही मा. देवीलाल यांनी उपपंतप्रधान पदाची शपथ घेतली होती. त्यानंतर मोरारजी देसाई, चरणसिंग, जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण, लालकृष्ण अडवाणी इत्यादी नेत्यांना उपपंतप्रधान पदाची शपथ घेताना देशाने पाहिले होते.

तरीही तत्कालीन राष्ट्रपती, उपराष्ट्रपती,पंतप्रधान, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांनी यावर कोणतेही टिप्पणी केली नव्हती. केंद्रात जसे उपपंतप्रधानपदाची गत आहे तसेच घटक राज्यात उपमुख्यमंत्रीपदाची सुद्धा आहे.

*2) उपमुख्यमंत्री*

भारतीय संविधानामध्ये उपमुख्यमंत्री असे कोणतेही पद नाही. तसेच या पदाला घटनात्मक पाठबळ नाही की कसलाही वैधानिक दर्जा नाही. तरीही राज्यपाल महोदय उपमुख्यमंत्री म्हणून शपथ देतात. ते हे पद संविधानिक नाही असे सांगत नाही. किंवा तुम्हाला उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेता येणार नाही असे सांगण्याचे धाडस सुद्धा करत नाही. महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे 'दादा' अजित पवार यांनी सहा वेळा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतलेली आहे. आणि विक्रम केलेला आहे. आज देशाची परिस्थिती बघितली तर दिवसेंदिवस राज्याराज्यात अशा महाभागांची संख्या वाढत आहे. सध्या देशातील 28 पैकी 16 राज्यांमध्ये एकूण 26 उपमुख्यमंत्री आहेत. त्यापैकी सर्वाधिक 15 उपमुख्यमंत्री एनडीएचे आहेत. त्यापैकी एकट्या भाजपाचे 13 तर काँग्रेस कडे 3 आहेत.

उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान , छत्तीसगड ,मेघालय, नागालँड आणि ओडिसा प्रत्येकी 2 उपमुख्यमंत्री आहेत. तर हिमाचल प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक, जम्मू आणि काश्मीर, तामिळनाडू आणि अरुणा चल मध्ये प्रत्येकी 1 उपमुख्यमंत्री आहे. तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिनने त्यांचा मुलगा उदयनिधी याला उपमुख्यमंत्री केले. प्रकाश सिंग बादल यांनी पंजाबचे मुख्यमंत्री असताना त्यांचा मुलगा सुखबीर सिंग बादल याला उपमुख्यमंत्री बनवले होते.

294 विधानसभेच्या जागा असलेल्या पश्चिम बंगालमध्ये एकही उपमुख्यमंत्री नाही तर 90 सदस्य असलेल्या छत्तीसगड मध्ये एकही उपमुख्यमंत्री नाही.

भारताचे सर्वाधिक काळ उपमुख्यमंत्री असलेले सुशीलकुमार मोदी हे भारतीय जनता पक्षाचे बिहारचे उपमुख्यमंत्री होते. आंध्र प्रदेशात माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी 5 उपमुख्यमंत्री केले होते. बिहारचे अनुग्रह नारायण सिंग हे देशातले पहिले उपमुख्यमंत्री होते. स्पष्ट बहुमत मिळो अथवा न मिळो युतीमध्ये असलेल्या मोठ्या पक्षाला उपमुख्यमंत्रीपद देणे आता क्रमपात्र झालेले आहे.

तसे पाहिले तर भारतीय संविधानात असे कोणतेही पद नाही आणि उपमुख्यमंत्र्याला कोणतेही अतिरिक्त अधिकार नाहीत. महाराष्ट्र सरकारने छगन भुजबळ प्रकरणात उच्च न्यायालयात स्पष्ट केले होते.

उपपंतप्रधानपद आणि उपमुख्यमंत्रीपदाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयातही चर्चा झाली पण कुणालाही पदावरुन हटविण्यात आले नाही. म्हणून आदरणीय ज्येष्ठ स्तंभ लेखक न.मा. जोशी संराच्या शब्दांमध्ये सांगायचे झाले तर सत्तेच्या भुकेल्या राजकारणाद्वारे लोकशाही आणि संविधानाची बिनधास्तपणे ऐसी तैशी होत असल्याचे चित्र आहे.

*3) पालकमंत्री पद*

भारतीय संविधानामध्ये किंवा सरकारच्या कामकाजाच्या नियमात पालकमंत्रीपदाची तरतूद नाही. तसेच पालकमंत्री पदास कोणतेही घटनात्मक पाठबळ नाही किंवा कसलाही वैधानिक दर्जा नाही. सत्ताधाऱ्यांच्या मनमानी व्यवस्थेतून हे पद आल्याचे नाकारता येत नाही.महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी जेव्हा *"महानायक वसंतराव नाईक साहेब"* होते त्यावेळी 1972 मध्ये जिल्ह्याचे प्रभारी म्हणून 'जिल्हा प्रभारी मंत्र्यांची' नियुक्ती करण्यात येत असे. त्यावेळी जिल्हा प्रभारी मंत्री हा जिल्हा बाहेरच्या मंत्र्यांना देण्यात येत असे कारण जिल्ह्यातीलच मंत्र्याकडे जर जिल्ह्याची सूत्रे दिली तर स्थानिक राजकारणावर त्याचा परिणाम पडू शकतो. आणि स्वतःच्या मतदारसंघाकडे जास्त विकास निधी वळवला जाऊ शकतो म्हणून नाईक साहेबांनी त्यावेळी जिल्हा बाहेरच्या व्यक्तीला जिल्हा प्रभारी मंत्री म्हणून नेमत होते. पुढे ही प्रथा रूढ होत गेली. त्याला नंतर 'पालकमंत्री' म्हणून संबोधण्यात येऊ लागले आणि 'पालकमंत्री पद' हे प्रथम महाराष्ट्रात अस्तित्वात आले. महाराष्ट्राचा कित्ता नंतर अन्य राज्यांनी गिरवला.

74 व्या घटना दुरुस्तीनुसार प्रत्येक जिल्ह्यात नियोजन समिती अस्तित्वात आली. परंतु देशातील बऱ्याच राज्यांमध्ये अद्यापही अशा समित्याची स्थापना झालेली नाही. महाराष्ट्रामध्ये जिल्हा नियोजन समितीचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून पालकमंत्री असतात. राज्याच्या अर्थसंकल्पात जिल्ह्यासाठी निधीची तरतूद केल्या जाते. जिल्ह्याला प्राप्त झालेल्या निधीचे विकास कामासाठी नियोजन करणे यामध्ये पालकमंत्र्याची भूमिका महत्त्वाची असते. तसेच जिल्ह्यातील प्रशासकीय व पोलीस यंत्रणेवर सुद्धा पालकमंत्र्याचे नियंत्रण असते. जिल्ह्याकरिता योजनेसाठी मिळालेला निधी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता पालकमंत्री लक्ष ठेवतात. एकंदरीत जिल्ह्याची सारी सूत्रे पालकमंत्र्याच्या हाती असतात.

*भारतात कोठे कोठे पालकमंत्री आहेत?*

भारतातील सर्वच राज्यात पालकमंत्री पद अस्तित्वात नाही. उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, आसाम ,राजस्थान, गुजरात, पंजाब, मध्य प्रदेश आदी राज्यांमध्ये पालकमंत्री किंवा जिल्हा प्रभारीपदे अस्तित्वात आहेत. अलीकडेच तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी पालकमंत्री नेमलेले आहेत.

एकंदरीत राज्यघटनेमध्ये उपपंतप्रधान, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री पदे नसताना सुद्धा शपथ दिल्या जाते हे खरोखरच आश्चर्यजनक आहे.

आज काँग्रेस पासून तर भाजपा पर्यंतचे सारे पक्ष आणि सर्वच नेते संविधान वाचवा म्हणून ओरड करतात. तर मग संविधान कोणापासून खतरे में है? असा प्रश्न सर्वांनाच पडत आहे. त्यामुळे उपपंतप्रधान, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री ही पदे संविधानिक नसतानाही या पदाची शपथ दिली जाते. "सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि अमर्याद सत्ता अमर्याद पणे भ्रष्ट करते" हे लॉर्ड ॲक्टनचे मत पटण्यासारखे आहे.

विकासासाठी ओळखल्या जाणाऱ्या दक्षिणी राज्यात पालकमंत्री ही व्यवस्था नाही. त्यामुळे महाराष्ट्राला सर्वांगीण विकासाकडे घेऊन जाणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पालकमंत्री हे पदच बरखास्त करण्याचा पायंडा पाडावा. जर असे घडत नसेल तर कमीत कमी जिल्ह्याबाहेर व्यक्तीच्या हाती तरी जिल्ह्याचे सूत्र देण्याची खबरदारी घ्यावी. एवढीच रास्त अपेक्षा जनमानसात सुरु आहे.

***माहितीचे स्तोत्र***

**1) मा. न.मा.जोशी सर ज्येष्ठ स्तंभ लेखक यांचा लेख.**

**2) मा. संतोष प्रधान यांचा लेख.**

**3) लोकसत्ता संपादकीय लेख 7 जानेवारी 2025**



# झाले गेले गंगेला मिळाले...

डिसेंबरची शेवटची सकाळ जीवन सुंदर आहे. पण ते क्षणभुंगर आहे. म्हणतील हाय हाय मी जाता राहिल कार्य काय. या कवीवर्य भा.रा.तांब्याच्या कवितेच्या ओळी आहेत.जग हे सारे पाठीमागे टाकून जाईल हे खरे आहे.परंतु स्वजनांची जाण्याने झालेली पोकळी सतत मन सतत कुरतडत राहील.तसे सर्वच माणसे दुःख लपवून जगत असतात.कोणी गेल्याचे दुःख असते.कोणी आपणापासून दुरावल्याचे दुःख असते.तर कोणी आपणासाठी झिजल्याची कृतज्ञता फेर धरून नाचू लागते.माणसे चेहऱ्यावर सुखाचा मुखवटा घालून जगत असतात.

प्रा.डॉ.दिलीप लालू चव्हाण
रा.रूपचंद-नगर ता.रेणापूर
जि.लातूर ४१३५२७,
मो.९८८१०९०५८८






बरेच जण आज सरत्या वर्षाचा लेखाजोखा मांडतील.एकांतात कडूगोड आठवणीची ऊजळणी करतील.एकांतात आपली दुःखे,वेदना आपणांस अधिक हळवे करतात.आपले काय चुकले का?आपण कोणास दुखावले का?आपण काय गमावले का?याचा मनाशी हिशोब मांडतील.असा हिशोब माणसाला अंतर्मुख करतो.मनावरची दाटून आलेली अभ्रे दूर करतो.मन प्रसन्न करतो.मग अशा प्रसन्न मनाने नव्या वर्षाचे स्वागत करायचे. क्षण, मिनिटे, तास, दिवस, रात्र, वर्षे अशीच ऊलटत जातात. कालचक्र वेगाने धावत असते.ते थकत नाही,ते थांबत नाही.मग आपण का थांबायचे? आपणही त्याबरोबर जायचे.ऊगीचच मागे कोठे रेंगाळायचे नाही.आणि बरे कोणासाठी रेंगाळायचे?

**सगे सोयरे डोळे पुसतील ।**
**पुन्हा आपल्या कामी लागतील**
**ऊठतील बसतिल हसुनी खिदळतिल।**
**मी जाता त्यांचे काय जाय ।**
**हे खरे नाही का?**

मागच्या वर्षाप्रमाणे हे वर्षही उत्तम जावो.या इहलोकी सारे काही आलबेल नाही हे त्यांस उमगले आहे.काही तासानंतर नव्या वर्षाचा सूर्योदय होणारच आहे. जुने जाऊदे मरणालागूनी जाळूनि किंवा पुरुनी टाका असे कवीवर्य केशवसूतांनी म्हटल्याप्रमाणे नव्या वर्षाची नवलाई कमी होत नाही.रात्री बारा वाजेपर्यंत तो जागा राहणार आहे.आपल्या नवीन स्वप्नांना आकार देणारी नववर्षाची प्रसन्न प्रभात काही तासांतच जन्म घेणार आहे. मध्यरात्री धुंद बेधुंद अवस्थेतील तरुणाई सरत्या वर्षाला निरोप देईल .केवढं सेलिब्रेशन ! नव्या वर्षाचा केवढा गाजावाजा ! केवढं कौतुक ! अश्मयुगातून माणूस विज्ञानयुगात केव्हाच स्थिरावला.अमर्याद सृष्टीचे गूढ उकलले. प्रचंड शोध लागले.अजस्त्र यंत्रे निर्माण झाली. सुक्ष्म अतिसूक्ष्म चिप्स निर्माण झाल्या.भ्रमणध्वनी आले. दळणवळण विलक्षण टप्प्यात आले.संवादातील अंतर केव्हाच संपून गेले.अनोळखी व्यक्तीमध्ये शुभेच्छांचा वर्षाव सुरु झाला.हजारो वर्षांचा माणसांचा इतिहास आहे . पृथ्वीवरचा तो नायक आहे.संस्कृती आल्या आणि लयाला गेल्या.काही नव्याने उदयाला आल्या.फॅशन आल्या आणि गेल्या.जुन्याच फॅशन पुन्हा नव्या म्हणून आल्या.यातही काही आता अपूर्वाई राहिली नाही.माणूस तसाच राहिला.पोशाख वेळोवेळी बदलला.मात्र माणसाचा आतला हिंसपणा चिरंतन राहिला. जुन्या परंपरांना कवटाळणारा आजचा सुटा बुटातला माणूस सत्यनारायणाच्या पूजेलाही बसतो आहे.वैज्ञानिक दृष्टिकोन ओशाळून बाजूला बसला आहे. तीच अंधश्रद्धा,तीच गुलामगिरी,तोच उद्दामपणा,तोच बेमुर्वतपणा तोच अहंकार,तसाच सनातन आहे. अविनाशी आहे.आणि भ्रष्टाचार, खून, बलात्कार, अन्याय, अत्याचार, आर्त किंकाळ्या सारे काही तसेच आहे.धर्मासाठी टीचभर जमिनीसा,वीतभर पोटासाठी पिता-पुत्र, भाऊ-भाऊ, शेजार-शेजारी यांच्यामध्ये आतंक चालू आहे. मंदिराभोवती फेऱ्या घालणा, पुजा-अर्चेत रमणार, व्रतवैकल्ये पाळणारा, उपासतापास करणारा माणूस धर्मनिष्ठ आहे ? दया, क्षमा, शांती,परोपकार ही तर सर्व धर्माची शिकवण आहे.तर मग एकमेकांचा क्षुल्लक कारणासाठी, क्षणभंगुर सुखासाठी जीवावर का उठतो बरे माणूस?तोच माज,तोच उद्दामपणा, हा सरत्या वर्षाबरोबर का बरे जात नाही? का तसाच अव्याहतपणे सरत्या वर्षाबरोबर वाहत राहणार. मग कसला सरत्या वर्षाला निरोप - आणि कशाचे स्वागत ? फक्त स्वार्थच आहे ! परमार्थ बाजूला उदासवाना कोपऱ्यात उभा आहे.संस्कृतीचा नुसता घोषच चालू आहे. पुत्र पित्याला निर्वासित करतो!,पत्नी पतीचा उपमर्द करते.बलवान मुजोरपणे वागतो.हे सारं मन विषण्ण करणारे आहे.जे काल होत ते आजही आहे,उद्याही असणार आहे.काळ अखंड चालणारा आहे.वर्षामागून वर्षे जाणार आहेत.सरत्या वर्षामागे आपण काय टाकणार आहोत . नववर्षाचे स्वागत करताना कसला संकल्प करणार आहोत . जर सरत्या वर्षाला निरोप देताना हे सारं आपल्या सोबतच राहणार असेल तर निरोप ही केवळ अर्थहीन औपचारिकता होईल. कवी कुलगुरू केशवसुत म्हणतात जुने जाऊ दे मरणा लागूनी, जाळूनी अथवा पुरुनी टाका अनिष्ट विचार , रूढी , परंपरा , अंधश्रद्धा यांना निरोप देऊन नव्याचे स्वागत केले तरच तो एक सुंदर निरोप आणि स्वागत ठरेल. एकीकडे, दैन्य, दारिद्र्य, लाचारी आणि मातीमोल जगणे आहे .काळाबरोबर ते शाश्वत आहे. दुसरीकडे मद्यधुंद , बेमान होऊन थिरकणं आहे.

मध्यरात्री जगभर नव्या वर्षाचा उत्सव होईल.दारूच्या ,मांसाहाराच्या पार्ट्या होतील , जागरणी होतील.एकच जल्लोष होईल.कारण खात्री आहे , आत्ताचा क्षण आपला आहे.उद्याची काय पर्वा.एवढी बेधुंद स्थिती आहे. सारं काही संपलेलं नाही. अजूनही संत , विचारवंत आशेवर आहेत. माणूस नावाचं अजब रसायन बदलेल.ही परिवर्तनाची,बदलून टाकण्याची कोणाकडे शक्ती आहे. ज्याने माणूस निर्माण केला त्या जगन्नियंत्याची!

माणसाचे अनेक नमुने आहेत.ही जुनाट, सनातन, चिरंतन नमुने आहेत. कोण विरक्त. कोण भोगासक्त आहे.कोण हिंसक कोण अहिंसक आहे. कोण धर्मवेडे ,कोण धर्मनिष्ठ. कोण संत आहे कोण प्रमत्त आहे. कसे सारे हे आकड्यात मोजायचे.वर्षे,शतके संख्येत मोजता येतील.वर्षे उलटतील , शतके जातील,युगे लोटतील.माणसे प्रत्येक नव्या वर्षाचे स्वागतही करतील,परंतु माणूस आहे तसाच राहील,- पूर्वीसारखा - सनातन - अपरिवर्तनीय.तरीही आपण एकमेकांना ॲडव्हान्समध्ये नववर्षाच्या शुभेच्छा देऊया.पुनश्च नव्या वर्षाच्या ॲडव्हान्समध्ये खूप खूप शुभेच्छा!

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
# संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# भारतीयांमध्ये जीवन कौशल्यांचा अभाव :-

अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी अमेरिकेतल्या एका विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना भारताविषयी एक गोष्ट सांगितली होती. भारतीय लोक जगात सर्वात बुद्धिमान आहेत हे आता जगाने मान्य केलेले आहे. मात्र एवढी बुद्धिमत्ता असून सुद्धा भारत देश वेगाने पुढे का जात नाही असा प्रश्न विचारला जातो. आणि त्याचे उत्तर आहे की, भारतीय बुद्धिमान असले तरी त्यांच्याकडे जीवन कौशल्यांचा अभाव आहे. जेव्हा भारतीयांना जीवन कौशल्ये अवगत होतील तेव्हा भारत देश वेगाने प्रगती करेल. जीवन कौशल्य म्हणजे काय याचा फारसा ऊहापोह आपल्याकडे होत नाही. परंतु आपण एकमेकांशी बोलतो तेव्हा होणाऱ्या संवाद हा सुखदायी आणि सकारात्मक व्हावा असा प्रयत्न आपण कधी करत नाही. आपण बोलतो भरपूर परंतु त्या बोलण्याचे परिणाम काय होतील यावर आपल्याला विचार करण्याची गरज वाटत नाही. आता तर सोशल मीडियामुळे आपण जे काही बोलतो ते क्षणार्धात हजारो लोकांपर्यंत पोहोचते या कल्पनेने अनेक लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून भरपूर बोलण्याच्या मनस्थितीत आलेले आहेत. परंतु आपले बोलणे व्यापक प्रमाणावर ऐकले जाणार असेल तर त्या बाबतीत आपण जबाबदारीने वागले पाहिजे आणि जबाबदारीने बोलले पाहिजे हे भान आपल्याला राहिलेले नाही. त्यामुळे सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजातल्या विविध वर्गामध्ये सामंजस्याची भावना निर्माण होण्याचे ऐवजी वैराचीच भावना वाढत चालली आहे. कारण आपला बोलण्यातला संयम संपला आहे. माजी पंतप्रधान नरसिंहराव हे विचारपूर्वक आणि कमीत कमी बोलण्याबाबत जाणले जात होते. जेव्हा तुम्हाला दहा वाक्ये बोलायची असतील तेव्हा तुम्ही दोनच वाक्ये बोला आणि दोन वाक्ये बोलण्याची गरज वाटत असेल तर बोलूच नका असे त्यांचे म्हणणे असे. पण आता स्थिती उलटी होत आहे. जेव्हा बोलायची गरज नाही तिथे आपण दोन वाक्ये बोलत आहोत आणि जिथे दोन वाक्ये बोलण्याची गरज आहे तिथे दहा वाक्ये बोलून दहा जणांची मने कलुषित करत आहोत. मुळात ज्या गोष्टींसाठी सोशल मीडिया वापरण्याची गरजच नाही तिथे आपण सर्रास सोशल मीडिया वरुन व्यक्त होत आहोत. वारकरी संप्रदायाच्या एका कीर्तनकाराच्या विरोधात सध्या सोशल मीडियावर मोठे वादंग निर्माण झालेले आहे. त्याच्या पूर्वपक्ष आणि उत्तर पक्षात आपल्याला जायचे नाही. परंतु त्या महाराजांनी आपल्या एका प्रवचनामध्ये भागवत ग्रंथाची अध्यायांची संख्या आहे त्यापेक्षा जास्त सांगितली. एवढ्या एका चुकीवरुन त्यांच्याविरुद्ध हे वादंग निर्माण करण्यात आले आहे. ही चूक जर त्या महाराजांच्या नजरेस व्यक्तिगत रित्या आणून दिली असती तर काम भागले असते. ती चूक सगळ्या जगाच्या नजरेस आणून देऊन महाराजांची फटफजिती करण्याची काहीही गरज नव्हती. परंतु माध्यम हाताशी आहे म्हटल्याबरोबर एवढ्या किरकोळ कामासाठी त्या माध्यमाचा वापर केला गेला हे बरोबर नाही. या संबंधात परस्पर विरोधी व्हिडिओ तयार करुन ते सगळे पुन्हा सोशल मीडियावर टाकण्यात आले आहेत. त्यातून किती वेळ आणि किती शक्ती खर्च झाली याचा कोणी हिशोब मांडत नाही. विशेषतः त्यातून परस्परविरोधी विधाने केली गेली आणि परस्परांना दुषणे देऊन शेकडो लोकांचे मानसिक आरोग्य बिघडवण्यात आले. त्याचे परिणाम व्यापक प्रमाणावर होत असतात. याचा कोणी विचार करत नाही. सध्या सोशल मीडियावर मनसेच्या कार्यकर्त्यांचा एक व्हिडिओ असाच व्हायरल झालेला आहे. त्यात लोणावळा येथील महाराष्ट्र बँकेच्या शाखेमध्ये ग्राहकांशी मराठीतून बोलण्यावरुन जो वाद झाला आणि त्या वादाच्या शेवटी मनसे कार्यकर्ते बँकेतल्या कर्मचाऱ्यांशी कसे अद्वातद्वा बोलत आहेत उगारले त्याचे चित्रण आलेले आहे. मुळात या बँकेतले कर्मचारी ग्राहकांशी हिंदी मधून बोलतात या गोष्टीला मनसेच्या कार्यकर्त्यांची हरकत होती. आणि त्यांची हरकत योग्यच आहे. कारण महाराष्ट्र सरकारचे धोरण असे आहे की ज्याला महाराष्ट्रात काही व्यवहार करायचा असेल त्याला मराठी बोलता आले पाहिजे. मात्र मराठी ऐवजी कोणी हिंदीतून किंवा अन्य भाषेतून बोलण्याचा अट्टाहास करत असेल तर तो चालणार नाही. हे योग्यच आहे. परंतु एखाद्या कार्यालयात जाऊन मराठीचा आग्रह धरण्याचे निवेदन सादर करणे हा विषय किंवा ही कारवाई सोशल मीडिया बरुन जगाला सांगण्याची काय गरज होती? एक निवेदन देणे आहे आणि तिथल्या कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांनी मराठीतच बोलले पाहिजे अशी ताकीद त्यांना देणे असा तो स्थानिक विषय आहे. मात्र आपण फार मोठे काम करत आहोत असा आव आणून अशा छोट्या घटनेचा व्हिडिओ तयार करुन तो सोशल मीडियावर सांगायची गरज नव्हती. मात्र या निवेदनाला प्रतिसाद देताना त्या कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी यांनीही संयम ठेवला नाही. समन्वयाची भूमिका घेतली नाही. आपण महाराष्ट्रात मराठीतच बोलण्याचा प्रयत्न करु, आपली भाषा ती नसली तरी आपण ते अवगत करु असे आश्वासन त्यांनी नम्रपणे दिले असते तर वाद होण्याचे काही कारणच नव्हते. परंतु त्या कार्यालयातील महिलांसह सर्वच कर्मचारी आम्ही हिंदीतूनच बोलणार असा अट्टाहास करायला लागले. त्यांना कोणी संवाद कौशल्य शिकवलेले नाही त्याचा हा परिणाम होता. आपण बोलण्यातून समन्वय साधण्याऐवजी वाद वाढवत आहोत



**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.**
**ता. अहमदपूर जि. लातूर-41 35 15**
**9881090588**



परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

भारतीयांमध्ये जीवन कौशल्यांचा अभाव :-

अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी अमेरिकेतल्या एका विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना भारताविषयी एक गोष्ट सांगितली होती. भारतीय लोक जगात सर्वात बुद्धिमान आहेत हे आता जगाने मान्य केलेले आहे. मात्र एवढी बुद्धिमत्ता असून सुद्धा भारत देश वेगाने पुढे का जात नाही असा प्रश्न विचारला जातो. आणि त्याचे उत्तर आहे की, भारतीय बुद्धिमान असले तरी त्यांच्याकडे जीवन कौशल्यांचा अभाव आहे. जेव्हा भारतीयांना जीवन कौशल्ये अवगत होतील तेव्हा भारत देश वेगाने प्रगती करेल. जीवन कौशल्य म्हणजे काय याचा फारसा ऊहापोह आपल्याकडे होत नाही. परंतु आपण एकमेकांशी बोलतो तेव्हा होणाऱ्या संवाद हा सुखदायी आणि सकारात्मक व्हावा असा प्रयत्न आपण कधी करत नाही. आपण बोलतो भरपूर परंतु त्या बोलण्याचे परिणाम काय होतील यावर आपल्याला विचार करण्याची गरज वाटत नाही. आता तर सोशल मीडियामुळे आपण जे काही बोलतो ते क्षणार्धात हजारो लोकांपर्यंत पोहोचते या कल्पनेने अनेक लोक सोशल मीडियाच्या माध्यमातून भरपूर बोलण्याच्या मनस्थितीत आलेले आहेत. परंतु आपले बोलणे व्यापक प्रमाणावर ऐकले जाणार असेल तर त्या बाबतीत आपण जबाबदारीने वागले पाहिजे आणि जबाबदारीने बोलले पाहिजे हे भान आपल्याला राहिलेले नाही. त्यामुळे सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजातल्या विविध वर्गामध्ये सामंजस्याची भावना निर्माण होण्याचे ऐवजी वैराचीच भावना वाढत चालली आहे. कारण आपला बोलण्यातला संयम संपला आहे. माजी पंतप्रधान नरसिंहराव हे विचारपूर्वक आणि कमीत कमी बोलण्याबाबत जाणले जात होते. जेव्हा तुम्हाला दहा वाक्ये बोलायची असतील तेव्हा तुम्ही दोनच वाक्ये बोला आणि दोन वाक्ये बोलण्याची गरज वाटत असेल तर बोलूच नका असे त्यांचे म्हणणे असे. पण आता स्थिती उलटी होत आहे. जेव्हा बोलायची गरज नाही तिथे आपण दोन वाक्ये बोलत आहोत आणि जिथे दोन वाक्ये बोलण्याची गरज आहे तिथे दहा वाक्ये बोलून दहा जणांची मने कलुषित करत आहोत. मुळात ज्या गोष्टींसाठी सोशल मीडिया वापरण्याची गरजच नाही तिथे आपण सर्रास सोशल मीडिया वरुन व्यक्त होत आहोत. वारकरी संप्रदायाच्या एका कीर्तनकाराच्या विरोधात सध्या सोशल मीडियावर मोठे वादंग निर्माण झालेले आहे. त्याच्या पूर्वपक्ष आणि उत्तर पक्षात आपल्याला जायचे नाही. परंतु त्या महाराजांनी आपल्या एका प्रवचनामध्ये भागवत ग्रंथाची अध्यायांची संख्या आहे त्यापेक्षा जास्त सांगितली. एवढ्या एका चुकीवरुन त्यांच्याविरुद्ध हे वादंग निर्माण करण्यात आले आहे. ही चूक जर त्या महाराजांच्या नजरेस व्यक्तिगत रित्या आणून दिली असती तर काम भागले असते. ती चूक सगळ्या जगाच्या नजरेस आणून देऊन महाराजांची फटफजिती करण्याची काहीही गरज नव्हती. परंतु माध्यम हाताशी आहे म्हटल्याबरोबर एवढ्या किरकोळ कामासाठी त्या माध्यमाचा वापर केला गेला हे बरोबर नाही. या संबंधात परस्पर विरोधी व्हिडिओ तयार करुन ते सगळे पुन्हा सोशल मीडियावर टाकण्यात आले आहेत. त्यातून किती वेळ आणि किती शक्ती खर्च झाली याचा कोणी हिशोब मांडत नाही. विशेषतः त्यातून परस्परविरोधी विधाने केली गेली आणि परस्परांना दुषणे देऊन शेकडो लोकांचे मानसिक आरोग्य बिघडवण्यात आले. त्याचे परिणाम व्यापक प्रमाणावर होत असतात. याचा कोणी विचार करत नाही. सध्या सोशल मीडियावर मनसेच्या कार्यकर्त्यांचा एक व्हिडिओ असाच व्हायरल झालेला आहे. त्यात लोणावळा येथील महाराष्ट्र बँकेच्या शाखेमध्ये ग्राहकांशी मराठीतून बोलण्यावरुन जो वाद झाला आणि त्या वादाच्या शेवटी मनसे कार्यकर्ते बँकेतल्या कर्मचाऱ्यांशी कसे अद्वातद्वा बोलत आहेत उगारले त्याचे चित्रण आलेले आहे. मुळात या बँकेतले कर्मचारी ग्राहकांशी हिंदी मधून बोलतात या गोष्टीला मनसेच्या कार्यकर्त्यांची हरकत होती. आणि त्यांची हरकत योग्यच आहे. कारण महाराष्ट्र सरकारचे धोरण असे आहे की ज्याला महाराष्ट्रात काही व्यवहार करायचा असेल त्याला मराठी बोलता आले पाहिजे. मात्र मराठी ऐवजी कोणी हिंदीतून किंवा अन्य भाषेतून बोलण्याचा अट्टाहास करत असेल तर तो चालणार नाही. हे योग्यच आहे. परंतु एखाद्या कार्यालयात जाऊन मराठीचा आग्रह धरण्याचे निवेदन सादर करणे हा विषय किंवा ही कारवाई सोशल मीडिया बरुन जगाला सांगण्याची काय गरज होती? एक निवेदन देणे आहे आणि तिथल्या कार्यालयातल्या कर्मचाऱ्यांनी मराठीतच बोलले पाहिजे अशी ताकीद त्यांना देणे असा तो स्थानिक विषय आहे. मात्र आपण फार मोठे काम करत आहोत असा आव आणून अशा छोट्या घटनेचा व्हिडिओ तयार करुन तो सोशल मीडियावर सांगायची गरज नव्हती. मात्र या निवेदनाला प्रतिसाद देताना त्या कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी यांनीही संयम ठेवला नाही. समन्वयाची भूमिका घेतली नाही. आपण महाराष्ट्रात मराठीतच बोलण्याचा प्रयत्न करु, आपली भाषा ती नसली तरी आपण ते अवगत करु असे आश्वासन त्यांनी नम्रपणे दिले असते तर वाद होण्याचे काही कारणच नव्हते. परंतु त्या कार्यालयातील महिलांसह सर्वच कर्मचारी आम्ही हिंदीतूनच बोलणार असा अट्टाहास करायला लागले. त्यांना कोणी संवाद कौशल्य शिकवलेले नाही त्याचा हा परिणाम होता. आपण बोलण्यातून समन्वय साधण्याऐवजी वाद वाढवत आहोत



डॉ. बंजारा दिलीप लालू
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.
ता. अहमदपूर जि. लातूर-41 35 15
9881090588

www.parlisangharshneta.in | Mo - 9881265102
05 Apr 2025 - Page 2 | Powered by softisky - 9764331134

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता..
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन कावळे

# श्री प्रभू रामचन्द्र यांचा आज जन्मोत्सव सोहळा.

श्री प्रभू रामचन्द्र हे भगवान विष्णुचे सातवे अवतार असून आयोध्येचे राजा होते. ते नेहमीच आपल्या मर्यादांचे पालन करत होते, म्हणून ते मर्यादा पुरुषोत्तम म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म त्रेतायुगात, चैत्र शुक्ल नवमीला आयोध्येत राजा दशरथ आणि राणी कौशल्या यांच्या घरी झाला. भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न हे त्यांचे भाऊ होते.

माता कौसल्या सतत भगवंताचे नाम स्मरण व अविरत विधायक प्रामाणिक कार्य करत होत्या, म्हणून त्यांना प्रभू रामचंद्रसारखे रत्न लाभले. जनक राजाची मुलगी सीता माय आणि श्री प्रभू रामचन्द्र यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. राज्य अभिषेक करण्यासाठी तयारी सुरु झाली. सगळीकडे आनंदाचे वातावरण पसरले होते. तेवढ्यात कैकयी मातेचा स्वार्थ आडवा आला. तिच्या मनात विकल्प निर्माण झाला. माझा मुलगा गादीवर बसला पाहिजे,आणि श्री प्रभू रामचन्द्र वनवासात गेले पाहिजे. जेथे स्वार्थ असतो, तेथे विकल्प असतो. वाईट बुद्धी निर्माण होते. अविवेकी विचार सुरु होतो. दुष्कृत्य आपोआप होत जाते. त्यातून घराची अधोगती होते. हा निसर्ग नियम आहे. हा सिद्धांत आहे. तसे दशरथ राजाच्या घरी घडले. जेथे स्वार्थ तेथे वासना, विकार,अपेक्षा वाढत जातात. जेथे वासना ,विकार,अपेक्षा आहेत, तेथे दुःख आहे, कारण त्याची पूर्तता कधीच होत नाही. हे सत्य आहे. जेथे परमार्थ आहे. तेथे सत्कृत्य, सद्विचार, सत्यवादी, संयमी ,न्यायप्रिय, विवेकवादी, कृतिशील, परोपकारी कृतज्ञता, सेवाधारी, वृत्ती आणि कृती धारण होते, तेथे निस्वार्थ , निष्काम भाव असतो. तेथे आनंद असतो. जेथे आनंद तेथे भगवंत असतो. हे सत्य आहे. सत्य आणि असत्य याची जाणीव कैकयी मातेला



नव्हती, म्हणून राम वनवासाला निघाले. सोबत सीतामाय,भाऊ लक्ष्मण वनवासात जातात. सगळीकडे शोकाकूल वातावरण निर्माण होते. दशरथ राजा व्याकुळ होऊन क्षीण होतात, आणि राम राम म्हणत प्राण सोडतात. कौसल्या माता खूप दुःखी होऊन क्षीण होतात. प्रभू रामचन्द्र सर्व माता - पित्याचे दर्शन घेऊन आनंदाने वनवासात जातात. अंगावरचे भरजरी वस्त्र काढून वल्कले नेसतात. कंद मुळे,फळे भक्षण करून लक्ष्मण तन्मयतेने आवडीने प्रेमाने माता, सीता आणि श्री रामचन्द्र प्रभू यांची सेवा करतात. सतत भगवंताचे नामस्मरण घेत अविरत विधायक प्रामाणिक प्रयत्न करतात. जी माणसं सतत भगवंताचे नामस्मरण घेत अविरत विधायक प्रामाणिक कार्य करतात. सेवा, भाव परोपकार त्याग, संयम विवेक विचार आणि कृतज्ञता धारण करून तशी कृती करतात, तेथे खूप संकटे, आव्हाने अडचणी येतात, ती पेलण्याची क्षमता निर्माण होते,आणि उच्च प्रतीचा आनंद मिळतो हे सत्य आहे. हनुमानजी सतत भगवंताचे नामस्मरण करत होते, म्हणून श्री प्रभू रामचन्द्र यांची भेट झाली. त्यांची सेवा करण्याचा योग आला. श्री प्रभू रामचन्द्र यांच्या नाम स्मरणात किती ताकद होती. हनुमंत सीता शोधण्यासाठी समुद्रातून उड्डाण करून लंकेत गेले. सीता मातेचा शोध घेतला. लंकेत जाण्यासाठी समुद्रात श्री प्रभू रामचन्द्र यांच्या नावाची घोषणा करत दगड फेकले, आणि दगडाचा सेतू बांधला. ही शक्ती नामस्मरणात आहे. विधायक प्रामाणिक प्रयत्न करण्यात आहे.

सतत वाचन, चिंतन, मनन करत सतत भगवंताचे नाम स्मरण घेत अविरत विधायक प्रामाणिक कार्य केल्यामुळे शक्ती आणि युक्ती प्राप्त होते. बुध्दीचे वैभव वाढते. तसे हनुमानजी यांचे बुध्दीचे वैभव वाढत गेले, आणि सेवा कृतज्ञता विवेक विचार शक्ती केंद्रित करून तन्मयतेने भगवंताचे नामस्मरण केले, म्हणून हनुमानजी प्रभू रामचन्द्र यांचे प्रिय भक्त बनले. आपणही सर्वांनी सतत वाचन, चिंतन आणि मनन करत भगवंताचे नामस्मरण केले की, यश प्राप्त होते. जीवनात उच्च प्रतीचा आनंद मिळतो. तो आनंद आपल्या सर्वांना प्राप्त व्हावा. प्रत्येकाच्या जीवनात आणि जगण्यात राम यावा. श्री प्रभू रामचंद्र आपणास आरोग्य, सुख, शांती,वैभव भरभरुन प्रदान करो.एवढी ईश्वर चरणी प्रार्थना करतो, माझे मार्गदर्शक, हितचिंतक मित्र व नातेवाईकांना श्रीराम नवमीच्या हार्दिक शुभेच्छा............!!

**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**रा. रेणापूर**
**जि. लातूर**



परळी संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# पोटगीबाबत पुनर्विचार होणे गरजेचे

**घटस्फोटामुळे अन्याय झालेल्या स्त्रियांना न्याय मिळावा, त्यांचे व मुलांचे हाल होऊ नयेत म्हणून कायद्यात पोटगीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु आजच्या काळात घटस्फोटाचा आणि पोटगीचा बाजार मांडला गेला आहे. महिला म्हणून मिळालेल्या तरतुदीचा लाभ घेत दोन-तीन महिन्यांत /वर्षांत संसार मोडायचा आणि नवऱ्याकडून पोटगीची रक्कम वसूल करायची असे प्रकार हल्ली सर्रास दिसून येत आहेत. याबाबत कायद्याच्या दृष्टिकोनातून विचार केला गेला पाहिजे. मुलांची बाजूदेखील विचाराल घेतली पाहिजे. कायद्यानुसार हुंडा घेणे ना देणे हा जसा गुन्हा आहे तसाच कायदा पोटगीबाबतही व्हायला हवा.**

पूर्वी मुला बाळाचा संसार सुखाचा व्हावा यासाठी आईवडील मुलीला पूर्वी जावयाला हुंडा द्यायचे. पण लोभ इतका वाईट असतो हुंडा न मिळाल्यामुळे त्या स्त्रीवर अत्याचार व्हायचे अत्याचार इतका वाढला की समाजाची हिंमत हुंडाबळीपर्यंत गेली. त्यामुळे माणसाची हावरट विकृती समोर आली. आता शहरात हुंडा देभ्याघेण्याची प्रथा जकामास नष्ट होत आली आहे. कारण मावर कायद्याने बंदी घातली आहे. आताच्या बदलाचा काळात घटस्फोटांचे प्रमाण वाढले. त्यामुळे आता एक नवीन प्रथा जन्माला आली आणि ती महणजे पोटगी। फरक इतकाच की हुंडाबी मुली अलगध्रा आणि आता पोटगीचे बळी ठरले आहेत मुलगे।

खारे तर घटस्फोटामुळे अन्याय झालेल्या स्त्रियांना न्याय मिळावा, त्यांचे व मुलांचे हाल होऊ नयेत महणून कायद्यात ती तरतूद करण्यात आली. परंतु आजच्या काळात काही (विकृत) मुलींनी त्याचा बाजार मांडला आहे. दोन-तीन महिन्यांत वषोत संसार मोडायचा आणि मुलांकडून पोटगीची रक्कम वसूल करायची जर तुम्ही हुंडा न मागता जगू शकता तर मुलींनी पोटगीशिवायही जगायला हवे.* ]

समाजात कायम स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबाबत बोलले जाते. आज थोडा पुरुषांचाही विचार करायला हवा. गेल्या काही दशकांत स्त्रियांवर झालेल्या अत्याचारामुळे प्रसंगी त्यांना प्राण गमवावेगाले असल्याने कायद्यात स्त्रियांसाठी बरीच तरतूद करण्यात आली आहे. परंतु तशी तरतूद पुरुषांसाठी नाही. ज्या स्त्रियांवर अन्याय झाला आहे त्यांना न्याय मिळायलाच हवा. पण मग ज्या पुरुषांवर अन्याय होतोय त्यांनी काय करावे? घटस्फोट घेताना पोटगीला समाजमान्यता आहे पण तेच लग्न करताना हुंडा घेतला तर तो गुन्हा ठरतो. समाजात असे दुहेरी मापदंड का? मुलगा आणि मुलगी जर समान असतील, दोघेही सक्षम असतील तर मग कुणाचेही आर्थिक शोषण योग्य नाही.हल्ली तिथे किंवा त्याचे लग्न काही महिने टिकते आणि आता ते वेगळे होत आहेत, असे फरर ऐकायला येऊ लागले आहे. तसेच मुलीने तिच्या उदरनिर्वाहासाठी 20 लाख रुपये मागितले आहेत. हा कुठला उदरनिर्वाह आहे? मुलाला उदरनिर्वाह नाही का? खरोखरच जिथे अन्याप झाला असेल तिथे शिशा अपेक्षित किया अनिर्वाय मागायला हवी. सध्या अभी अल्पकाळ लग्न टिकलेली अनेक जोडपी दिसतात. लग्नाच्या बोहल्यावर चढले नाहीत ती घटस्फोटाना उंबरठ्यावर उभे राहतात खरेतर लग्नानंतर एकमेकांना एकमेकांच्या नातेवाईकांना समजून घेण्यासाठी थोडा वेळ देणे अपेक्षित असते. धोवधा संगमाची,स्थानाची गरज असते काही मुली लग्नानंतर अगदी वर्षभर किंवा कधी कधी काही महिने एकत्र राहिल्यानंतर मग पटत नाही माणून घटस्फोट घेतात. त्यासाठी भरपूर पोटी घेतात. पन मुजात मुद्दा हा आहे जर हुंडा घेणे चुकीचे आहे

तर पोटगी धोंगेही चूकच आहे आणि ज्या मुलींना लानातून फक्त त्रालय मिळाला आहे त्या मुली पोटगीसाठी अनेक वर्ष मांडत बसण्यापेक्षा सरळ सोडचिठ्ठी देऊन आयुष्याला नव्याने सुरुवात करतील पण ज्या मुलीने कायदा चुकीच्या पद्धतीने हाताळत्य आहे वा न्यायालयीन नियमांचा चुकीचा वापर केला आहे तर अशा मुलींना शिक्षा व्हायला हवीच.

स्त्री-पुरुष समान आहेत ना, मग नियम पण तमानच असावेत. याच मुदयाला अनुसरुन सध्याचीच काही ज्वलंत उदाहरणे पाहायला मिळतात. स्वबळावर मी माझे नाव, पैसा, प्रसिद्धी कमावली आहे असे सामगाया धनश्री वर्माने न्यायालयात पती यजुवेंद्र चहलच्या विरोधात घटस्फोटाचा खटला लढताना पाच कोटी रुपयांची मागणी केली आणि चहलला ती मागणी मान्य करावी लागली. धनश्री तर स्वतः कमावती आहे प्रसिद्ध आहे. मग हे लाड जाता जाता तरी चहलने का पुरवावे? चहल तरी त्या मानाने स्वस्तात तुटला मानावे लागेल जर पण इतिक रोशनने त्याची पत्नी सुझान खानला दिलेली पोटगीची किंमत पहिली तर आता नुसताच्रारताना बोबडी कळेल.



नुकतीच प्रकाशझोतात आलेली घटना म्हणजे एका तरुण युवकाने बायकोषमा जाचाला कंटाळून आत्महत्या केली तेही मोबाइलवर वेडिंग करून

केली. कारण जगाला खरे काय ते कळावे यासाठी त्याने तसे केले होते. एकूण काय तर न्यायालयाने यावर अधिक अभ्यास करावा आणि या मुदचाला गांभीर्याने घेऊन समतोल तोड़ना काढावा एवढीच आशा करतो.

**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**सहायक प्राध्यापक**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर. ता. अहमदपूर**
**जि. लातूर 41 35 15**
**9881090588**



परळी संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



# 14 एप्रिल उत्सव समतेचा, तुमच्या आमच्या जगण्याचा



भारताच्या पावन भूमीवर अनेक महापुरुषांनी जन्म घेऊन देशासाठी व समाजासाठी अहोरात्र कार्य करुन सामाजिक बांधिलकी व राष्ट्रनिष्ठा जोपासली आहे. त्यांचा सेवेचा वारसा आजही देशवासियांसाठी आदर्श, मार्गदर्शक व दिशा दर्शक ठरलेला आहे. अशा या थोर महापुरुषात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वात वर आहे.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी 14 एप्रिल 1891 रोजी झाला. बाल भीमाचे वडील रामजी आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून दक्ष असत, त्यांना स्वतः वाचनाची आवड असल्यामुळे घरात ग्रंथसंग्रह हा होताच. मुलांना ही ते चांगली पुस्तके वाचावयास आणून देत असत. म्हणून बाबासाहेबांच्या आयुष्याच्या अंतिम क्षणापावेतो वाचनाची व अभ्यासपूर्ण चिंतनाची सवय त्याच्या ठायी आढळते. तुकाराम व कबीर बाबासाहेबांच्या अभ्यासाचे विषय भावी आयुष्यात झालेले दिसतात.

डॉ. बाबासाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तीमत्व होते. त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक धार्मिक, पत्रकारिता, कायदे अशा विविध क्षेत्रात आपल्या अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या, श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला.

गलितगात्र झालेल्या मनामनांतून समाजक्रांतीचे स्फुलींग चेतवून डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले.

डॉ. आंबेडकर म्हणजे प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती होय:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मनुष्य मात्रांच्या जीवनातील दुःख, दारिद्रय आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले आणि रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्री वर्गाच्या शेतकरी, मजूर वर्गाच्या आणि पददलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणाला लावून समतेची मंगलवाट दाखविते आणि मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीय नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.

शैक्षणिक विचार:

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्याची जाणीव व्हावी या साठी त्यांनी शिक्षणाचे महत्व समाजात विशद केले. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. ते जो पिल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही," असे ते समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून हे शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. "प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की, ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करुनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे हाते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिक दृष्टा सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करुणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखडी शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनवावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे. शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बनविणारे कारखाने आहेत. याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापन 1946 साली करुन त्यांनी मुंबइला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलींद महाविद्यालय सुरु केले. राष्ट्रहीत व समाजहीताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत.

सामाजिक क्रांतीचे रणशिंग फुंकले:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनीति, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली किड ते मानत असत. ही सामाजिक किड नष्ट केल्याशिवाय समाज एकसंघ होणार नाही असे ते समजत. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागळातील लोकांना बौद्धिक व समाजिक गुलामगिरीतून मुक्त करुन त्यांना मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकले.

प्रखर राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा :

डॉ. बाबासाहेबांच्या आचार विचारांत राष्ट्रप्रेम व राष्ट्रनिष्ठा भरलेली होती. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तात्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली त्यांना वाटले डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार परंतु डॉ. आंबेडकरांनी सांगितले, " आम्ही या भारतदेशाची संतान आहोत, आम्हाला राष्ट्रीयत्वाची जाणीव आहेच, राष्ट्रावर संकट आल्यास प्राणपणाला लावून देशाचे रक्षण केले व करु सुद्धा " यात डॉ. आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनिष्ठा समावलेली आहे.

स्त्रियाचे शेतकरी, शेतमजूर श्रमजीवी, व दलितांचे कैवारी :

स्त्रियांना पुरुषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरी डॉ. आंबेडकरांनी दूर केली. 1927 ते 1956 पर्यंतच्या काळात बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि राजकीय दर्जा, वाढावा म्हणून सतत प्रयत्न केला. 1942 साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, स्वच्छता पाळा, सर्व दुर्गुणांपासून दुर रहा, मुलामुलींना शिक्षण द्या त्यांना महत्वाकांक्षी बनवा, त्यांचा न्यूनगंड दूर करा असा महत्वाचा उपदेश केला. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजिवीच्या साठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे म्हणून ते सातत्याने संघर्ष करीत राहीले. केवळ दलितासाठीच नव्हे तर शेतकरी व मजूर यांच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला.

अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महान देणगी होय. अशा या महामानवाने 6 डिसेंबर 1956 साली अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या कार्याचा ठसा मागे उमटवला.



**प्रा. डॉ. बंजारा/ चव्हाण दिलीप लालू**
**रा. रुपचंद नगर, ता. रेणापूर**
**जि. लातूर.-9881090588**

# गोरमाटी समाजाला जागा करणारा झुंझार नेता: काशिनाथ नायक!

१९एप्रिल हा तमाम गोरमाटी गणाला जागा करणाऱ्या एक सच्चा समाज सेवक काशिनाथ नायक यांचा स्मृतिदिन! गोरसिकवाडी,गोरसेनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर भारतातील अनेक राज्यांमध्ये हा दिवस स्मृतिदिन म्हणून साजरा करण्यात येत आहे.

गोर बंजारा समाजात अनेक महापुरुष जन्माला येऊन गेले त्यांनी आपापल्या कालखंडामध्ये जोरदार संघर्ष करून त्यांनी गोरमाटी समाजाला पुढे आणण्याचा प्रयत्न केला. एकविसाव्या शतकात काशिनाथ नावाचा एक जबरदस्त ध्येयवेडा माणूस गोर बंजारा समाजाला एकसंध करण्यासाठी पेटून उठला आणि गोरसिकवाडीच्या माध्यमातून भारत भ्रमण करून त्यांनी गोरमाटी गणाला लढण्याचे बळ दिले.त्यामुळे गोरसिकवाडीचे मुखीया म्हणून काशिनाथ नायक यांचे नाव आज महाराष्ट्रातच नाही तर देश विदेशात मानाचे मानले जात आहे. काशिनाथ नायक यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून,आपल्या जीवनातील सुखसोयींना बगल देऊन संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर भारतातील बंजारा बहुल भागातील तमाम गोरमाटी गणाला जागवण्याचे काम त्यांनी अहोरात्र केलेले आहे. गोरसिकवाडी संघटनेची स्थापना करून त्यांनी गोरमाटी समाजाचे अस्तित्व टिकवण्यासाठी नवतरुणांना प्रवृत्त केले असून तमाम गोरमाटी गणाला संघटित करण्याचे त्यांचे हे अद्भुत काम कोणालाही विसरता येत नाही.गोरबंजारा चळवळीमध्ये काशिनाथ नायक यांचे काम महत्त्वपूर्ण आहे.

माझा आणि काशिनाथ नायक यांचा पहिला परिचय पुसद येथील कार्यक्रमात झाला होता. मी त्यावेळी महाराष्ट्र बंजारा कर्मचारी सेवा संस्थेचा यवतमाळ जिल्हा सचिव होतो आणि जिल्हा सचिव या नात्याने महाराष्ट्रात प्रथमतः वधू वर परिचय मेळावा,वसंतराव नाईक जयंती,संत सेवालाल महाराज जयंती,तांडा चलो अभियान असे अनेक कार्यक्रम आम्ही घेत होतो.त्यावेळी माझ्यासोबत अध्यक्ष म्हणून नवलकिशोर राठोड हे कार्यरत होते.महाराष्ट्र बंजारा कर्मचारी सेवा संस्थेच्या माध्यमातून मा दिगंबरभाऊ राठोड यांनी महाराष्ट्रातील बहुतांश कर्मचारी बांधव संघटनेशी जोडले गेले होते, त्यामध्ये काम करणारे काशिनाथ नायक नांदेड,प्रा डॉ पंडित चव्हाण आणि मारतीया रामचंद्रिया भुकिया या तिघांनी मिळून गोरसिकवाडी नावाची नवीन संकल्पना पुढे आणली. जेथे जेथे महाराष्ट्र बंजारा कर्मचारी सेवा संघटनेच्या सभा होत असत,त्या संघटनेच्या सभेदरम्यान रात्री गोरसिक वाडीचे फलक लावून ते प्रशिक्षण घेत असत.त्या नंतर अमर राठोड अकोला यांनी वेगळ्या संघटनेची चूल मांडल्यामुळे म्हणा किंवा इतर काही कारणामुळे म्हणा काशिनाथ नायक,प्रा डॉ पंडित चव्हाण आणि मारतीया रामचंदीया भुकीया यांनी गोरसिकवाडीची संकल्पना पुढे आणून गोरसिकवाडी नावाची चळवळ स्थापन करण्यात आली. त्यामधून कालांतराने प्रा पंडित चव्हाण आणि मारतीया रामचंदीया भुकिया हे बाहेर पडले तो इतिहास वेगळा आहे. गोरसिकवाडी नावाची चळवळ काशिनाथ नायक यांनी पुढे नेली.

मी महाराष्ट्र बंजारा कर्मचारी सेवा संस्थेमध्ये काम करत होतो आणि काशिनाथ नायक हे गोरसिकवाडी मध्ये काम करत होते.तरीही आमचे संबंध अत्यंत सलोख्याचे,प्रेमाचे राहिले.मी माझ्या लिखाणा मधून अनेक वेळा गोरसिकवाडी आणि गोरसेना बाबत लेख लिहिले. परंतु काशिनाथ नायक यांनी कधीही त्या लेखाचा वेगळा अर्थ काढला नाही.ते फार मोठ्या मनाचे आणि समजदार व्यक्तिमत्व होते.एक चांगला समाजसेवक कसा असावा त्याचा पायंडा काशिनाथ नायक यांनी आपल्या कार्यकाळात गोरमाटी समाजासमोर ठेवलेला आहे.बऱ्याच ठिकाणी गोरमाटी समाजातील मोठे मोठे अधिकारी कार्यालया मध्ये आलेल्या गोरमाटी बांधवांना मराठीत बोलत नाहीत.परवानगी शिवाय आत घेत नाही.परंतु काशिनाथ नायक याला अपवाद होते ते एक मेकॅनिकल असताना एसटीचे नट बोल्ट कसता कसता त्यांनी गोरमाटी गणाचे नट कसण्याचा चंग बांधला.मेकॅनिकल असलेला माणूस अल्पकाळा मध्ये लाखो माणसे कशी जोडली हे भल्या भल्यानाही न सुटणारी कोडे आहे.काशिनाथ नायक यांनी लाखो माणसे जोडली परंतु केवळ एका क्षेत्रातील नाही तर ते अनेक क्षेत्रातील मातब्बर माणसं एका जागी आणून,त्यांना संघटित करून विषमतावादी व्यवस्थे विरुद्ध, प्रस्थापित राजकीय व्यवस्थे विरुद्ध त्यांनी मोठे आव्हान उभे केले होते. काशिनाथ नायक यांनी एकाच वेळी डॉक्टर ,इंजिनिअर,प्राध्यापक,शिक्षक,वकिल,मोठे मोठे अधिकारी एवढेच नव्हे तर कलेक्टर,कमिशनर,तहसिलदार,बिडिओ,पत्रकार,प्रबोधनकार, कलाकार,अनेक व्यावसायिक,उद्योगपती यांना आणि अनेक क्षेत्रातील स्त्री-पुरुषांना गोरसिकवाडीच्या छत्राखाली आणून या ध्येयवेड्या समाज सेवकाने भले मोठे आणि मजबूत संघटन निर्माण केले होते. राजकीय प्रस्थापिता विरोधा मध्ये फार मोठी टक्कर देणारे काशिनाथ नायक म्हणून जिवंतपणीच एक संशोधनाचा विषय ठरले होते.आज गोर सिकवाडी आणि गोरसेना ही चळवळ महाराष्ट्रातलिच नाही तर इतर राज्यातही मातृसंघटना म्हणून आघाडीवर आहे.ऑल इंडिया बंजारा सेवा संघ आणि आदरणीय हरीभाऊ राठोड यांच्या बंजारा क्रांतिदलाचे तिन तेरा वाजल्यानंतर आज संपूर्ण भारतामध्ये एकमेव मजबूत संघटन जर कोणते असेल तर ते गोरसिकवाडी आणि गोरसेना आहे.ग्रामीण भागात गोरसेना आणि गोरसिकवाडीचे बहुसंख्येने कार्यकर्ते आजही कार्यरत आहेत.जसे महानायक वसंतराव नाईक साहेब यांनी कॉंग्रेस पक्ष तांड्या-तांड्यात पोहोचवला होता.अगदी त्याच धर्तीवर काशिनाथ नायक यांनी गोरसिकवाडी संघटन महाराष्ट्रातलि जवळपास१००० तांड्यां मध्ये आणि इतर राज्यातील अनेक तांड्यां मध्ये पोहोचवलेला आहे.आपल्या कुटुंबाची किंवा स्वतःच्या जीवनाची काहीही पर्वा न करता त्यांनी गोरमाटी गणाला एकत्र करण्यासाठी रान उठवले होते . मान-अपमानाची पर्वा न करता ते सतत समाजाला जागवण्या मध्ये कार्यरत राहिले. कित्येकदा त्यांना एसटी डिपार्टमेंट कडून शोकाज,मेमो आणि कारवाईला सामोरे जावे लागले.परंतु मी शिकलो पण माझ्या समाजाचे काय?अशी मनाशी खुणगाठ बांधून त्यांनी आपला झोला उचलून ते सुरुवातीला शनिवारी,रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्र फिरायचे.त्यानंतर त्यांनी कधीही आपल्या पगाराची पर्वा केली नाही आणि सतत ते महाराष्ट्रात आणि इतर राज्यात फिरतीवर असायचे.त्यांच्या सोबत१०गोर सैनिक सदैव तत्पर असायचे.त्यांनी गोर बंजारा समाज एकत्र करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले अनेक उपक्रम राबविले. अनेक लोकांना त्यांनी प्रोत्साहन दिले.त्यांच्या समाज सेवेच्या कार्याला प्रेरित होऊन जवळपास १०तरणीबांड मुले आपल्या आयुष्याची राख रांगोळी करून त्यांच्यासोबत जोडल्या गेली. ते आज समाजसेवेचे व्रत घेऊन केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतामध्ये फिरत आहे. या सर्वांच्या कार्या मुळे गोरसिक वाडी आणि गोरसेना भारताच्याही पलीकडे विदेशा पर्यंत पोहोचलेली आहे.याचे सर्व श्रेय काशिनाथ नायक यांना जाते.


काशिनाथ नायक

काशिनाथ नायक यांनी एक समाज सेवक म्हणून केलेले काम उत्तम आहे.परंतु ते हे सर्व करत असताना जवळपास गोरबोली भाषेत त्यांनी१६पुस्तके लिहिली आणि गोरमाटी गणाच्या कानठाळ्या खाडकन उघडल्या. विषमतावादी समाज व्यवस्थेवर, आणि प्रस्थापित राजकिय परिस्थितीवर त्यांनी आपल्या लिखाणातून सडकून टीका केली. गोरसिकवाडीचा मुखीया म्हणून काशिनाथ नायक यांनी ती जबाबदारी समर्थपणे पार पाडलेली आहे.गोरमाटी समाजाला जागे करण्यासाठी त्यांनी गोरबोली मधून केलेले लेखन महाराष्ट्रातील जवळपास बहुतांश जिल्ह्यामध्ये पोहोचलेले असून आज काशिनाथ नायक यांच्या नावावर जेवढी पुस्तके आहेत तेवढी पुस्तके गोर बंजारा समाजातील कोणत्याही चळवळीच्या अध्यक्षाच्या नावावर नाहीत.ही तेवढीच मोठ खरी आहे.मला समाज घडवायचा आहे हे व्रत घेऊन एक मेकॅनिकल पदावर असलेला माणूस स्वतःजवळ फुटी कवडीही नसता नाही गोरसिकवाडी नावाचे फार मोठे संघटन उभे केले.हे खरंच संशोधनात्मक कार्य आहे. एवढेच नव्हे तर गोरसिकवाडीच्या माध्यमातून महाराष्ट्रा मध्ये अनेक ठिकाणी प्रचंड मोठे मोठे कार्यक्रम घेऊन समाजाला जागवण्याचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे. जालना येथे झालेल्या१४ राज्याच्या गोर मळाव्यादरम्यान मी त्या गोरमळाव्यावर एक लेख लिहिला होता.त्या लेखाची दखल घेऊन काशिनाथ नायक तडक पुसद येथे माझ्यासमवेतशी सुंदल निवासालाभेट दिली. आम्ही रात्री दोन वाजेपर्यंत त्या लेखातील काही बाबींवर चर्चा केली आणि त्या नंतर ते सकाळी निघून गेले.पुसदला किंवा पुसद परिसरामध्ये जेव्हा जेव्हा कार्यक्रम व्हायचे तेव्हा तेव्हा ते हमखास माझ्या घरी यायचे.मातोश्री सुंदल यांच्याशी हितगुज करायचे.आम्ही गोर बंजारा समाजाच्या आर्थिक,सामाजिक,राजकीय,आणि सांस्कृतिक विषयावर नेहमीच चर्चा करायचो.महानायक वसंतराव नाईक साहेब यांच्यानंतर बंजारा समाजाची अस्मिता जागे करण्याचे काम जर कोणी केले असेल तर ते काशिनाथ नायक यांनी केले आहे.असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.बुलढाणा जिल्हा मध्येसेवाग्राम ठिकाणी फार मोठा मेळावा घेऊन त्यांनी बंजारा समाज एकत्र करण्याचा खूप चांगला प्रयत्न काशिनाथ नायक यांनी केला होता.गोर बंजारा समाजातील तरुण मुलांना गोरबोली विषयीचे प्रेम, गोरसंस्कृती,वेषभाव,लडी, कांजणा,अशा गोरमाटी बाबतची संपूर्ण माहिती देण्याकडे त्यांचा फार मोठा कल होता.संस्कृती टिकली तर समाज टिकेल या भावनेतून ते सतत कार्यरत असायचे.काशिनाथ नायक हे बोलायला स्पष्ट वक्ते होते.पोटात एक आणि ओठावर एक हा त्यांचा मुळीच स्वभाव नव्हता.त्यांच्या स्पष्टवक्तेपणा मुळे काही लोक अनेकदा दुखावल्या गेले.परंतु जेव्हा त्यांची कालमीमांसा करण्यात आली तेव्हा काशिनाथ नायक यांचे हे स्पष्ट बोलणे समाज हिताचे असल्याचे दिसून आले.फटन आवो चाय तुटन आवो खरे तेच बोलणार,असा त्यांचा स्वभाव होता.काशिनाथ नायक जे बोलायचे ते करायचे. त्यांच्या बोलण्या-वागण्यामध्ये कधीही फरक नसायचा.गोरसिकवाडी गोर सेनेच्या माध्यमातून आज गोरमाटी गणातील तरुणयुवक,प्राध्यापक,डॉक्टर,इंजिनियर,आणि इतर अनेक माणसे जागी झालेली आहेत.गोरसिकवाडी त्यानंतर गोरसेना आणि इतर वेगवेगळ्या शाखा ओपन करून त्यांनी गोरबंजारा समाज संघटित करण्याचा फार मोठा प्रयत्न केलेला आहे.ही गोरबंजारा समाजासाठी फार मोठी उपलब्धी मानावी लागेल.आज गोरसिकवाडी आणि गोरसेनेच्या महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राच्या बाहेरही अनेक शाखा असून काशिनाथ नायक यांनी आपल्या घरादारावर पाणी सोडून त्यांनी आपले पूर्ण आयुष्य गोर समाजाला संघटित करण्यासाठी वेचले हे कोणालाही नाकारता येत नाही.त्यांना त्यांच्या धर्मपत्नी श्रीमती राठोड ताईची सुद्धा समर्थपणे साथ मिळालेली आहे.काशिनाथ नायक जेव्हा बाहेर दौऱ्यावर असायचे तेव्हा त्यांचे नांदेड येथील घर हे सर्वांसाठी खुले असायचे.येणाऱ्या जाणाऱ्यांना चहापाणी,शेवटी जेवणा पर्यंतची व्यवस्था त्यांच्या घरची मंडळी करायची.त्या मुळे त्यांचे नांदेड येथील घर हे सर्वांना आपलेसे वाटायचे. शेकडो खोटे-नाटे आरोप सहन करून जराही विचलित न होता प्रस्थापित राजकीय नेत्यांना पूर्णपणे पुरुन उरणारा आणि त्यांच्याशी समर्थपणे टक्कर देणारा२१व्या शतकातील हा महायोद्धा म्हणजे समस्त गोरमाटी गणातील तरुणांसाठी प्रेरणा स्तोत्र आहे.



काशिनाथ नायक यांचे अनमोल कार्य हे केवळ बंजारा समाजालाच नव्हे तर तमाम बहुजन समाजासाठी फार मोठी उपलब्ध आणि अभिमानाची बाब आहे.त्यांची आणि माझी शेवटची भेट पुसद येथील माझ्या मातोश्री सुंदल निवासाला झाली. मी सेवानिवृत्त होणार होतो.हे हेरून त्यांनी माझी भेट घेतली होती आणि ते मला म्हणाले की तुम्ही सेवानिवृत्त झाल्या बरोबर माझ्यासोबत काम करा.आपण महाराष्ट्र पिंजून काढू.ती आमची शेवटची भेट ठरली.त्या नंतर ते बिमार पडले.आणि अचानक आपल्यातून निघून गेले.त्यामुळे फार मोठे समाजाचे नुकसान झालेले आहे.ते नुकसान कधीही न भरण्यासारखे आहे.आपले संपूर्ण आयुष्य वेचणाऱ्या काशिनाथ नायक यांच्या स्मृतिदिनानिमित्त मी याडी परिवारातर्फे विनम्र अभिवादन करतो!आणि थांबतो!

जय गोर...!


---

प्रा डॉ चव्हाण बंजारा रूपचंद नगर
ता रेणापूर
जि लातूर९८८१०१०५८८



# बाबासाहेबांनी दलितांना नव्हे तर आम्हाला माणसात आणलं....

गावगाड्या बद्दल वाटणारं अप्रूप मला दिवसें दिवस कमी होत गेलं.गावगाडा गोंडस दिसत असला तरी तो असंख्य लोकांच्या रक्तावर पोसलेला आहे हे लक्षात येत गेलं.शोषणाच्या संस्कृतीचे शेवटचे अवशेष गावगाड्यानेच जपले.शहरं त्या मानाने लय दिलदार असतात.गावा बद्दल उगं रोमँटिक लिहणारे कवी आणि लेखक लोकं तद्दन भामटे असतात.कारण गावगाडा मांडताना ते आम्हा पाटलांच्या घरांमध्ये देवळीत ठेवलेला फुटक्या बाळीचा कप,आणि सालगडी माणसांची वेगळी ताटं आणि ग्लास कधीच मांडत नाहीत.आमच्या गढ्या आणि वाड्यांच्या मोठमोठाल्या मातीच्या भिंती उभारायला अख्खा महारवाडा जनावरां सारखा राबला.रेड्याच्या पाठीवर लादलेल्या



पखालीतून पाणी वाहून कैक माणसांचे पाय वाकडे झाले.आमच्या माड्यांचे अवजड नक्षीदार खांब बनवण्यासाठी लागणारे लाकडं डोंगरातून खांद्यावर वाहून आणल्याने कित्येक खांद्यांना मरणांतिक कळ लागली असेल.आम्ही त्याच्या बदल्यात माणशी शेरभर ज्वारी दिली आणि मोकळे झालो.आज पर्यंत शाबूत असलेल्या आमच्या डौलदार माड्या आणि तिच्यावरून दिसणारे कुडाचे,छपराचे महारवाडे पाहत आलो.आता आता महारवाड्यांचे बौद्धवाडे झाले. कुडाची घरं जाऊन पक्की घरं आली.वेगळा असलेला बौद्धवाडा गावात मिसळून गेलेला दिसतो.ते पाहिलं की मनातला गिल्ट काहीअंशी कमी होतो आणि म्हणून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते. मोठमोठे झाडं आणि दगड उकरून याच महारवाड्यातल्या माणसांनी आमचे शेकडो एकरांचे मळे तळहाता सारखे सपाट आणि सुपीक तयार करून दिले.त्या बदल्यात आम्ही त्यांना डाळींचा चुरा,अन कळणा कोंडा खायला दिला. हे कुणीच मांडलं नाही.पन्नासेक जनावरांच्या, म्हशींच्या शेणाच्या पाट्या वाहून त्यांच्या टाळूचे केस गेले. वासरांनी पायावर पाय देऊन अनेकदा रक्ताचे बुरबुडे आले. नखं उचकटली.त्या बदल्यात तपीलं भरून ताक देऊन आम्ही पाटीलकी दाखवत त्यांची बोळवण केली. ते सगळं डोळ्यासमोर उभं राहिलं की मरुन मेल्यासारखं वाटलं.आज ते सगळं आठवून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते. बाबासाहेबांनी दलितांना माणसात आणलं हे फार चुकीचं वाक्य आहे.बाबासाहेबांनी दलितांना नाही,त्यांच्या वर अन्याय करणाऱ्या सवर्णांना माणसात आणलं.दलित माणसंच होते.आम्ही माणसा सारखं वागत नव्हतो.त्यामुळे बाबासाहेबांचं ऋण आमच्या कातडीचा जोडा शिवूनही फिटणार नाही. कारण दलितांना आमच्या पासून वेगळं केलं नसतं तर आम्ही अजूनही त्यांचं रक्त शोषतच राहिलो असतो.म्हणून वाटतं सगळा भम्पक माज बाजूला ठेऊन बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावी. लय जुना काळ नाही,गावातल्या शाळेत बौद्धवाड्यातल्या पोरांची रांग वेगळी बसत होती. म्हणजे तसं कम्पलशन नव्हतं पण सामाजिक कंपूबाजपणा आणि हजारो वर्षांची डीएनएच्या जीनमध्येरुजलेली/ठासूनभरलेलीशिकवणनकळत आपली विकृती दाखवायची. चौथीच्या मराठीच्या पुस्तकातल्या बाबासाहेबांच्या चित्राला पेनाने चित्र विचित्र मिशा काढून विद्रूप करायचो.आज ते हटकून आठवतं.अपराधी वाटतं. आणि त्यांच्या प्रायश्चित्त म्हणून बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते. जवळच्या निमशहरात शिकायला होतो. एक कार येऊन गह्रीत उभी राहिली.त्यातले माणसं उतरून कुणाच्या तरी घरात जातात.कारच्या मागच्या काचेवरभीमा तुझ्या जन्मामुळे लिहलेलं.आमच्यातला एक थोडा प्रौढ मुलगा गेला आणि खाली त्या धूळ बसलेल्या काचेवर लिहून आलाआम्ही माजलो....आज ते सगळं आठवलं की वाटतं बाबासाहेबांनी आपल्या पर्यंत पोहोचायला किती उशीर केला. नंतर कळतं आपणच त्यांच्या जवळ जायला उशीर केला.शेवटी अपराधी फील झाल्यावर पुन्हा बाबासाहेबांच्या पायाला घट्ट मिठी मारावी वाटते. वर्ण व्यवस्थेचं खापर ब्राम्हणांवर फोडून मोकळे होणारे आम्ही खरे लबाड होतो.व्यवस्था ब्रम्हणांनी तयार केली असली तरी ती आम्ही उपभोगली,राबवली.कधी कोणता ब्राह्मण गावात अस्पृश्यता किंवा जाति व्यवस्था राबवण्याचं ट्रेनिंग द्यायला आल्याचं आठवत नाही. पण आज त्यांच्यावर सगळे आरोप ढकलून आम्ही सेफ झोनमध्ये राहण्याचा प्रयत्न करतो.सगळं सगळं साफ समोर दिसतं. पूर्ण पणे गंडलोय आम्ही.दिशा दाखवणारे,आम्हाला माणसात आणणारे बाबासाहेब समजून घ्यायला आम्ही उशीर केला. आता समजून घेतोय. बाबासाहेबांचं बोट धरून एक एक पाऊल टाकतोय.माणसात येण्याची प्रक्रिया किचकट असते. हळूहळू प्रयत्न सुरू आहे.भारी फील असतो हा...म्हणून बाबासाहेबांना घट्ट मिठी मारावी वाटते.... ...कारण आम्ही खातो त्या भाकरीवरबी बाबासाहेबांची सही आहे र...!!



---

प्रा डॉ दिलीप लालु,बंजारा रा रेणापूर जि लातूर

परळी
संघर्षनेता
9881265102

# धक्काबुक्कीच्या जीवनात आयुष्यमान 60 ते 70 वर्ष आणि त्यातही आत्महत्या....!

सोलापूर येथील मेंदू विकार तज्ञ डॉक्टर शिरीष वळसंगकर साहेब यांनी केलेली आत्महत्या तसेच लातूर येथील आयुक्त अधिकारी यांनी केलेली आत्महत्या आणि अशी अनेक बुद्धिजीवी वर्ग यांच्यामध्येच अशा प्रकारची विचारधारणा का आली असावी? यासाठी माझ्या मनामध्ये डॉक्टर वळसगकर यांच्या आत्महत्या नंतर माझ्या मनात बऱ्याच काही शंका निर्माण झाल्या मला खरोखरच हे आवरले नाही म्हणून लिहून का असेना मन मोकळे करावे असे वाटले म्हणून हा लेख रुपी वृत्तांत थोडक्यात या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. आत्महत्या आज गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. सुक्ष्म चिकित्सा केली तर असे निदर्शनास येते की बुद्धिमान लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढतच चालले आहे. त्यावर टाकलेला दृष्टिक्षेप

या धकाधकीच्या जीवनामध्ये पूर्वीपेक्षा मनुष्याचं आयुष्मान घटत चाललंय. पूर्वी सुख, शांती, समाधान या सगळ्या गोष्टीला धरुन माणूस जीवन जगायचा. अलीकडच्या काळात ते चित्र दिसत नाही. अगदी धावपळीचे जीवन, वाढत्या गरजा, पैशाच्या पाठीमागे धावणार मन, अनेक समस्यांना तोंड देत असताना अनेक वेळा झालेली गळचेपी आणि त्यातून वाढलेला मानसिक तणाव या सगळ्या बाबींचा विचार केला, तर मनुष्य मानसिक दृष्टिकोनातून अलीकडच्या काळात समाधानी नाही. त्याच अनुषंगाने बुद्धिवंत लोकांमध्ये काय तणाव निर्माण होत आहे हा एक संशोधनाचा भाग पुढे आलाय. कारण अलीकडच्या काळात स्वतः गोळी घालून बुद्धिवंतांनी केलेल्या आत्महत्या या विचार करायला लावणार्या आहेत. लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केलेला आत्महत्येचा प्रयत्न त्याचबरोबर समाजकारण आणि अध्यात्म यांची सांगड घालून समाज प्रबोधन, समाज परिवर्तन करणारे भय्यूजी महाराज यांनी केलेली स्वतः गोळी घालून केलेली आत्महत्या आणि आता सोलापूरचे नामवंत न्यूरोलॉजिस्ट डॉक्टर शिरीष वळसंगकर यांनी स्वतः गोळी मारून केलेली आत्महत्या हे सगळं चित्र डोळ्यासमोर उभा राहिलं.

या जीवनामध्ये काय करायला पाहिजे, काय केलंय आणि काय करणार आहात या सगळ्या गोष्टीचा विचार करुन त्या प्रश्नांची उत्तरं शोधत असताना एक लक्षात येतं की, या जगामध्ये गरिबातला गरीब असो मध्यमवर्गीय असो श्रीमंत असो अडाणी असो बुद्धिजीवी असो तो त्या त्या दृष्टिकोनातून जीवनाच्या समस्येसाठी झगडत असतो आणि झगडत असताना वेगवेगळ्या कारणांच्या अनुषंगाने त्याच्या मनावर ताण असतोच. पण तो ताणतणाव सहन नाही झाला तर अशा पद्धतीने त्यांच्या मनाचे धाडस हे आत्महत्या करायला लावतो. आत्महत्या करणं हे सोपं नाही त्याला पण धाडसच लागतं. असं धाडस का निर्माण होते याचाही विचार करणे गरजेचे आहे.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून असं म्हणतात की, श्रीमंत लोकांना काही ताण वाटत नसतो. बुद्धिजीवी लोकांना काही ताण नसतो. परंतु एक लक्षात घेतलं पाहिजे जे श्रीमंत असतात ते अनेकांची कुटुंब जगवतात, जे बुद्धिजीवी असतात ते अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये त्यांच्या बुद्धीचा वापर करुन परिवर्तन घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतात आणि या सगळ्या गोष्टी विचार करण्यासाठी असं वाटतं की,

"इतक्या ही गोष्टी साचू नयेत मनात

की संपवून टाकावे जीवन एका क्षणात

इतकाही नसावा मनावर ताण

की सोडून द्यावा क्षणभरात प्राण

तेव्हा असावं एखादं कोणीतरी

मनातलं ऐकणार

मनावरच मळभ दूर झटकून टाकणार"

अगदी या पंक्तींचा अर्थ जर पाहिला तर एक लक्षात येतं की, जीवनामध्ये इतकाही ताण नसावा, मनावर दबाव नसावा की असा क्षण येतो की क्षणात स्वतः ला संपवून टाकावं असं वाटतं. पण त्यावेळी आपण जर आपल्या जवळच्या माणसाजवळ बोललं, व्यक्त झालो तर कुठेतरी मार्ग निघू शकतो. आपल्या मनावरचं दडपण, मळभ दूर झटकून टाकता येते. परंतु त्यासाठी माणसाजवळ माणुसकीचं नातं जपणार कोणीतरी असावं लागतं.

आज तेच समाजामध्ये दिसत नाही. समाज विखुरला जातोय. कुटुंब विभागली जात आहेत. कुटुंबामध्ये माणसा माणसांमध्ये स्नेह, आदरभाव, प्रेम, एकसंगता कोणत्याही ठिकाणी दिसून येत नाही. बुद्धिजीवी अधिकारी असतील तर त्यांना कार्यालयातील कामकाजाचा ताण असेल, वरिष्ठांचा ताण असेल. राजकारणी, समाजकारणी, अध्यात्म क्षेत्रात काम करणारे आणि समाज परिवर्तनाच्या समाजसेवेच्या दृष्टिकोनातून काम करणारे या प्रत्येकाचा जरी विचार केला, तर त्यांच्याकडेसुद्धा हेच चित्र आपणाला दिसतं.

म्हणून प्रथम शिक्षणाच्या माध्यमातून मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून सुरुवातीपासून अर्थात कुटुंबातल्या वरिष्ठ सदस्यांपासून त्या कुटुंबातल्या लहान बालकाला संस्काराचे बाळकडू, माणुसकीचे धडे दिले गेले पाहिजे. तरच कोणीतरी आपलं ऐकायला भविष्यात भेटेल अन्यथा हे बुद्धिजीवींमध्ये आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच जाईल. जर हे थांबवायचं असेल, याचं प्रमाण कमी करायचं असेल तर प्रत्येकाने इमानेइतबारे आपल्या कामात मन गुंतवले पाहिजे, आपल्या कर्तव्याने, जबाबदारीला न्याय दिला पाहिजे. कोणीही गैरमार्गाच्या वापरासाठी कोणावरही, कशाही पद्धतीचा दबाव टाकता कामा नये. जर अशा पद्धतीने काही घडलं तर आत्महत्या करणार्यांचे प्रमाण कमी होईल.

यावर समाजातल्या प्रत्येक घटकाने, राज्यकर्त्यांनी, शासनकर्त्यांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे. आत्महत्यांचं हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सध्याच्या घडीला आयुष्मान 60-70 पर्यंत आलेले आहे, भविष्यात ते 50 ते 60 च्या दरम्यान येऊ शकतं. फक्त जन्माला यायचं आणि जायचं एवढंच जीवन आहे का, हाही प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. त्यामुळे अशा चिंताजनक परिस्थितीमध्ये प्रत्येकाने चिंतन करावं आणि योग्य असा पद्धतीचा मार्ग अवलंबावा. आत्महत्या हा कोणत्याही समस्येला उत्तर नाही हे लक्षात घेतलं पाहिजे आणि हाच संदेश आपण सर्वांनाच दिला पाहिजे. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही. आत्ता जे आपण जीवन जगत आहोत ते सुखी, आनंदी आणि परोपकारी वृत्तीने जगावं हीच अपेक्षा.

**: प्रा. डॉ. दिलीप बंजारा /चव्हाण**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.**

# बंजारा समाजाची दिवाळी आगळी–वेगळी!!

डॉ. बंजारा दिलीप लालू
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

भारत देश हा अनेक संस्कृतीनी संपन्न असलेला देश आहे. आपल्या देशाच्या संस्कृती चा बोलबाला आनेक देशात पसरलेला आहे.यात दिवाळी सोबतच अनेक सनांचा आनंद खुप मोठ्या ऊल्हासाने घेत आसतात. आपली सामाजिक, शैक्षणिक ,संस्कृतीक, आर्थीक व पारंपारीक ही ईतर देशातील लोकांना भावत आसते. यात मी माझे ऐक अनुभव मी करीत आहे. ऐके दिवशी मी सत्य साईबाबा (पट्टीपुर्ती )कर्नाटक या राज्यात बाबांचे दर्शन घेण्यासाठी गेली आसतात.त्या ठीकाणी परदेशातील मान्यवरांचे आगमन खुप मोठ्या प्रमाणात दिसुन येते. तेंव्हा मला ऐक परदेशी महीलाला सारी परीधान करण्याची ईच्छा खुप दिसुन आली. ति महीला ऐका भारतीयान महीला कडुन साडी परीधान केल्यानंतर ईतकी खुश झाली की तिचे आनंद गगनात महात नव्हते.यावरून आपली संस्कृती काय आहे हे आपणांस समजुन येते. तेव्हा मी केवळ दिपावली या सनावरच लिहिणार आहे.ऊपरोक्त विवेचन केवळ माहितीस्व लिहीलेले आहे. खरी आपली संस्कृती ही. बंजारा समाजाची दोन दिवसांची आगळीवेगळी दिवाळी! हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण पाच दिवस साजरा केला जातो. मात्र बंजारा संस्कृतीमध्ये दोन दिवस हा सण अगदी पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण पाच दिवस साजरा केला जातो. मात्र बंजारा संस्कृतीमध्ये दोन दिवस हा सण अगदी पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो.

बंजारा समाजामध्ये दिवाळी या सणाला 'दवाळी' हा शब्द रूढ झाला आहे. या दिवशी तांड्यातील सर्व मुली नायकाकडे जाऊन दिवाळीची ओवाळणी करण्याची परवानगी मागतात. गावातील वातावरण आनंदाचे असेल तर नायक परवानगी देतात. परवानगी मागून घरी परतल्यावर संध्याकाळी बंजारातील बोली भाषेमध्ये सर्व मुली गाणी गातात. या दिवशी तांड्यातील सर्व मुली सकाळी एकत्रित जमून कळपाने पणती आणि दिवा घेऊन नायकाच्या घरी मेरा मागतात. मेरा मागताना त्या मुली पुढीलप्रमाणे गीत गातात - 'वर्षेदनेरी कोट दवाळी, याडी तोन मेरा'.. असे गाणे गात मुली मेरा मागतात. त्या निमित्ताने तांड्यातील मुली कोणाच्या आहेत, काय करत आहेत याची ओळख नायकाला आणि अन्य व्यक्तींना होते. अगदी गावातील गरिबाच्या घरी देखील हा कळप जातो. आपल्या कुवतीप्रमाणे गावातील मंडळी या मुलींना दक्षिणा देतात.

यावरून असे लक्षात येते की, बंजारा समाज हा कष्ट करणारा आहे आणि कष्ट करून दुस-यांना देण्याची वृत्ती आहे. बंजारा गावातील संपूर्ण लोकांच्या समूहाला एकत्रितपणे 'तांडा' म्हणतात. या तांड्याचा एक व्यक्ती प्रमुख असतो, त्या प्रमुखास 'नायक' म्हणून संबोधतात. नायकानंतर 'कारभारी' आणि त्याखालोखाल 'डाव' असतो. डाव नंतर 'आसमी' हे पद येते. सर्व गावातील प्रतिष्ठित मंडळींना आसामी म्हणून संबोधतात. दिवाळीच्या पहिल्या दिवशी तांड्यातील सर्व मुली नायकाच्या असतात किंवा कारभारीच्या असतात किंवा डावच्या असतात किंवा आसामीच्या असतात. अशा प्रतिष्ठित मंडळीच्या सर्व मुली या दिवशी पारंपरिक वेशभूषा परिधान करतात. दिवाळीच्या या पहिल्या दिवशी पारंपरिक पेहरावाचे दर्शन घडते. बंजारा समाजात दिवाळीचे हे दोन दिवस अगदी उत्सव म्हणून उत्साहाने साजरे केले जातात. दिवाळीच्या पहिल्या दिवशी अश्विन महिन्याची अमावस्या येते. या अश्विन अमावस्येला तेथे 'काळीमावस' असे म्हणतात. याठिकाणी मी मात्र मी बंजारा समाजातील भाषा वापरतोय तिला अद्भुत आहे. गोरमाठी र यीतीहास लगभग ५००० –१०००० वरस आंगाडीयार छ गोरमाठी आजेर घडीम भारतेर काणा कोपराम वसरोच भलेही लोक हामेण नाळी नाळी राजेम नाळी नाळी नामेती वळकच पण गोरमाठी रेणू, खाणू , बोली, बाणो, तीज तेवार से सारखोच छ पण गोरमाठीर रीती रीवाज खतम करेर दणीया घणो जोरेती काम चालरोच येक वीदवाण कच जे जातेर संस्कृती मर जावछ, वू जातच मरजाव छ करण गोरूर सन तेवारेर रीते खतम करेर काम जोरेम चालू छ कायी रीते खतम करेर कामेम लोकूण येश भी मळगो आब दवाळी (काळीमावस) च देखलो गोरमाठी काळीमावसेर दण कणायी लकसीमी पूजण कोणी कीदे गोरमाठी देव धरमेकण पीसा मेलण पूजा कोणी कीदे गोरमाठी काळीमावसेर दन चोको पूजण काळ पाट काटे भीयाव आन हीसा पाडे नीत येक जाग लंगाण रांधण खादे भीयाव वोरे बाद हामार छोरीय हातेम ढाकणी(दीवो) लेण मेरा मांगी भीयाव गोरूर नंगरीम घर घर जाण बजाळो कीदे आण जातू जातू कायी गीद बोल वाटेप झूपडा ये, वीराबाळी आयेळंद आयेळंद ये बायी जायेळंद झरी झकोळ पाळी पीयेण दन्नटाटकेरी थीगळी बेसेण द बाळीया घोडलो बेसेण द बोलतू बोलतू जाण पच नायके घर जाण मेरा मांग कू मांग वरसे दनेरी कोट दवाळी सेवाभाया तोन मेरा, वरसे दनेरी कोट दवाळी मरियामा याडी तोन मेरा, वरसे दनेरी कोट दवाळी नायक व नायकन तोन मेरा, वरसे दनेरी कोट दवाळी गराश्या तोन मेरा, वरसे दनेरी कोट दवाळी बापू तोण मेरीया, भीयाव आरे वोरे बाद दूसरे दाड गोदण करतेते आण कर जणा भी छोरी गीद बोल हार हार करतू मूंडो सूकावे तीर तीर करतू टांगे सूकावे मान्या बोकड्या मॉव मॉव घळ घळ देशे दवाळी माता मारे वीरारी टांगे रूची करेश गोरमाठी भीयाव आण छोरी रमती रमतू गीद बोलतू बरू लेयेण जाव भीयाव बरू लाण सांजपडी गोदण पूजतीती मारे भेण गोधण पूजतू भी गीद बोल खेवडीया मेवडीया, रींढी सोटरी, बांडीया बूचीया घोडेरी घसाळे, हूटेरी कटारे, लांबी लारे, धोळी हारे, पीळी फोजे, बाड कूंदिया, दामळी तोडीया टोकळीस मातेर, छादळास कानेर, डोडीभरी गावडी तलावडी भरो छाच कूडाभरो घी अन, धन, दूध, पूत लावलसकर गळ गळ देसये दवाळी माता नंगरीन हारो भरो रेयेदेश ये दवाळी माता, मारे वीरारी टांगे रूची करेस,,,ह्नह्नआसे परकारेती गोरमाठी दी दनेर दवाळी मणातोतो भीयाव पण आज हामारच कायी सीकेसाके वेल कॉलीफायीड आनपड गोर संस्कृतीण यीरोध करे लाग घरेम लकसीमी घालण पूजा पाती करेलाग छोरीवूण मेरा मागेकोणी देरे आरे तम सीकण मोठे वेगे वेणू सेरेम रेयेण चलगे वेणू पण तू जे जातेर भरोसेप नोकरी प छी जे जातेर नामेती तोण बोळकच वोदूर येथीबाट प आंगळी वतारोची जे याडीर पेट जलम लीदो वोणच गाळी देरोची से सोभीमाणी गोरूर नंगरी र नायक, कारभारी, हासाबी, आसामी, डायेसांळे मारोजा छ क नंगरीम गोर कूळीर हासाबेर काळीमावस(दवाळी) मणावा दिवाळीच्या दुस-या दिवशी बंजारा गावात गोधनपूजन केले जाते. गोधनपूजन म्हणजेच गायीची पूजा. या दिवशी गाईच्या शेणाचे वर्तुळ बनवतात व त्या वर्तुळामध्ये फूल, गवत यांद्वारे सजावट केली जाते. तांड्यातील मुली असे प्रत्येक घरासमोरील अंगणात काम करतात. या शेणाच्या वर्तुळाला लागणा-या सजावटीसाठी मुली सकाळी १०.०० च्या दरम्यान जंगलात जातात. जंगलात जाऊन बरूचे गवत, तिकाडीचे गवत, लांबडीचे गवत, फुलं आदी साहित्य आणतात. जंगलात जाताना देखील मुली गाणी गात–गात जातात. या प्रक्रियेला बंजारी बोलीभाषेत 'गोधन' असे म्हणतात.

तिस–या दिवशी भाऊबीज असते. भाऊबीज मात्र हिंदू चालीरितींप्रमाणेच साजरी केली जाते. या वेळी स्वतःच्या हाताने शिवलेले आणि सजावट केलेले पारंपरिक ड्रेस भेटवस्तू म्हणून दिली जाते. दिवाळी या सणाला आमच्या बंजारा संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही दिवाळी बंजारा समाजातील मुलींची दिवाळी म्हणून ओळखली जाते. साधारणतः शेकडो वर्षांपूर्वीपासूनच्या परंपरेप्रमाणेच अजूनही हा सण बंजारा समाजामध्ये साजरा केला जातो. तांड्यातील मुलींचा जगाशी फारसा संबंध नसतो. केवळ त्यांचा निसर्गाशी संबंध असतो. त्यामुळे या मुली जास्त कुणाच्या घरीदारी जात नाहीत. मात्र दिवाळीचे हे दोन दिवस सगळ्या मुली बाहेर पडून हा सण अगदी उत्साहाने साजरा करतात.

# वर्षे दनेरी कोट दवाळी,याडी तोन मेरा!!

दीपावळी सण म्हटले की,विद्युतची अपार रोषणाई, स्नेहाचा सुगंध, सौख्य, समृध्दी यांची भरमसाठ उधळण त्यातच नवे स्वप्न,नवे क्षितिजे यांच्या ध्येय पुर्ण प्रयत्नाना मिळणारे सोनेरी किरणाची पहाट,अशा अनेक स्वप्नाचा दिवस म्हणुन आपण सारे हे नाविन वर्ष साजरे करतो,परंतु या पलीकडेही या सणाचे एक आगळे वेगळे असे स्थान बंजारा सामाजात असल्याचे पहावयास मिळते.या समाजामध्ये या सणाला जणु पर्वणी असल्याचे यांच्या नायकाचे म्हणने आहे.



महाराष्ट्र तसेच राजस्थान गुजरात,आंध्रप्रदेश ई.या सारख्या सर्वच राज्यात या समाजाचे वास्तव्य आहे.एकट्या महाराष्ट्राचा विचार केला तर,जवळपास १ कोटी च्या घरात यांची लोकसंख्या आहे.या सर्व लोंकाचा मुख्यत्वेकरुन सण म्हटले की,होळी व दवाळी (दीवाळी) या सणाची साजरी करण्याची पध्दत ही फार वेगळी आहे,याचे कुतुहल पाहण्यासाठी लांब वरुण लोक येत असतात.या बंजारा समाजातील बाहेरगावी किंवा नोकरीसाठी असलेले सर्वच तरुणवर्ग व खास करून महिला हा सण साजरा करण्यास आवर्जुन उपस्थित असतात.या सणास हिंदू धर्मानुसार पहिला पाऊस असा काही प्रकार वेगळाच असतो,यावेळी हे लोक सकाळ पासुन यांच्या तयारीस लागतात.

थोडक्यात काळी (काळ) अमावस्या या दिवसा पासुन यांचा सणाची तयारी होते.या समाजातील मुली या दवाळीचे मुख्य वैशिष्ट असतात,या मुली लहाणातील–लहाण की ज्या मुलीचे लग्न झाले नाही असाच मुलींना या सणास साजरे करण्यास परवानगी दिली जाते.या मुली संध्याकाळ पासुन सर्व आपल्या जुन्या धुळींवर (मंदीर) एकत्र येतात व तेथुन सर्वच्या सर्व हातात एक ढाकळीं (वाटी) घेऊन त्यात वाती टाकुन त्याचा उजेड करुन एका पाठोपाठ एक गाणे म्हणत नायका च्या घरापासुन या सणाची शुरुवात केली जाते.

कारण नायक हा या समाजातील मुख्य कर्ता असतो,यांच्या परवानगी शिवाय किंवा दुसरे कोणताही घर घेता येत नाही,येथुन यांच्या कार्यक्रमांस खरी शुरुवात होते.मग नायक तोन मेरा!!काका तोन मेरा!!याडी तोन मेरा!! भाया तोन मेरा!! दादी तोन मेरा!! या स्वरुपात रात्रभर गाणे म्हणत या सर्व मुली पैशाची मागणी करतात,गाणे ऐकत ऐकत वडील–धारी व याडी हे त्या सर्व मुलींना पैसे वाटतात,व या पैशाचे त्या सर्व जणी आपपसात वाटुन घेतात हा प्रकार रातभर चालतो.

या सर्व प्रकारात या समाजातील याडी या रातभर त्या मुली समवेत गाणी म्हणत नाचत असतात.

नंतर या मुली रात्री सर्व तांडा एक ही घर न सोडता पैसे मागणे झाल्यास झोपी जातात.सकाळी या सर्व मुली त्या धुळींवर एकत्र येऊन गावाबाहेरच्या पाणंदकडे मार्गस्थ होतात,पुर्ण शेतामध्ये या फिरुन काशी नावाच्या झाडाची पालवी तोडली जाऊन त्यांना पोत्यात भरुण या मुली दिवस मावळता घराकडे येतात,नंतर या रात्री ज्या–ज्या घरी मेरा मागितला,ता–त्या घरी गाणे म्हणत व नाचत असुन,काळी आव,काळी जाव!!,काळी माई,ज्योत सवई,याडी घंळ–घंळ देस,घर–दार,छोरी!–छप–छपच्यार सेन साथी हे जाय याडी!!हे गाणे म्हणत त्या गोबर व त्यात त्यानी आणलेल्या काशी यांची पूजा केली जाते. असा प्रकारे सलग दोन दिवस हा कार्यक्रम आनंदात व नाचत–गाजत सर्व बहिण–भाऊ व मिया सोबत पार पाडला जातो.अशा पारंपारीक पध्दतीने सण साजरा करण्यारया सर्व बंजारा समाजास या दवाळीच्या हार्थीक शुभेछा !!!

परळी
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102

# धक्काबुक्कीच्या जीवनात आयुष्यमान 60 ते 70 वर्ष आणि त्यातही आत्महत्या....!

सोलापूर येथील मेंदू विकार तज्ञ डॉक्टर शिरीष वळसंगकर साहेब यांनी केलेली आत्महत्या तसेच लातूर येथील आयुक्त अधिकारी यांनी केलेली आत्महत्या आणि अशी अनेक बुद्धिजीवी वर्ग यांच्यामध्येच अशा प्रकारची विचारधारणा का आली असावी? यासाठी माझ्या मनामध्ये डॉक्टर वळसगकर यांच्या आत्महत्या नंतर माझ्या मनात बऱ्याच काही शंका निर्माण झाल्या मला खरोखरच हे आवरले नाही म्हणून लिहून का असेना मन मोकळे करावे असे वाटले म्हणून हा लेख रुपी वृत्तांत थोडक्यात या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. आत्महत्या आज गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. सुक्ष्म चिकित्सा केली तर असे निदर्शनास येते की बुद्धिमान लोकांमध्ये आत्महत्येचे प्रमाण वाढतच चालले आहे. त्यावर टाकलेला दृष्टिक्षेप

या धकाधकीच्या जीवनामध्ये पूर्वीपेक्षा मनुष्याचं आयुष्मान घटत चाललंय. पूर्वी सुख, शांती, समाधान या सगळ्या गोष्टीला धरुन माणूस जीवन जगायचा. अलीकडच्या काळात ते चित्र दिसत नाही. अगदी धावपळीचे जीवन, वाढत्या गरजा, पैशाच्या पाठीमागे धावणार मन, अनेक समस्यांना तोंड देत असताना अनेक वेळा झालेली गळचेपी आणि त्यातून वाढलेला मानसिक तणाव या सगळ्या बाबींचा विचार केला, तर मनुष्य मानसिक दृष्टिकोनातून अलीकडच्या काळात समाधानी नाही. त्याच अनुषंगाने बुद्धिवंत लोकांमध्ये काय तणाव निर्माण होत आहे हा एक संशोधनाचा भाग पुढे आलाय. कारण अलीकडच्या काळात स्वतः गोळी घालून बुद्धिवंतांनी केलेल्या आत्महत्या या विचार करायला लावणार्या आहेत. लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केलेला आत्महत्येचा प्रयत्न त्याचबरोबर समाजकारण आणि अध्यात्म यांची सांगड घालून समाज प्रबोधन, समाज परिवर्तन करणारे भय्यूजी महाराज यांनी केलेली स्वतः गोळी घालून केलेली आत्महत्या आणि आता सोलापूरचे नामवंत न्यूरोलॉजिस्ट डॉक्टर शिरीष वळसंगकर यांनी स्वतः गोळी मारुन केलेली आत्महत्या हे सगळं चित्र डोळ्यासमोर उभा राहिलं.

या जीवनामध्ये काय करायला पाहिजे, काय केलंय आणि काय करणार आहात या सगळ्या गोष्टीचा विचार करुन त्या प्रश्नांची उत्तरं शोधत असताना एक लक्षात येतं की, या जगामध्ये गरिबातला गरीब असो मध्यमवर्गीय असो श्रीमंत असो अडाणी असो बुद्धिजीवी असो तो त्या त्या दृष्टिकोनातून जीवनाच्या समस्येसाठी झगडत असतो आणि झगडत असताना वेगवेगळ्या कारणांच्या अनुषंगाने त्याच्या मनावर ताण असतोच. पण तो ताणतणाव सहन नाही झाला तर अशा पद्धतीने त्यांच्या मनाचे धाडस हे आत्महत्या करायला लावतो. आत्महत्या करणं हे सोपं नाही त्याला पण धाडसच लागतं. असं धाडस का निर्माण होते याचाही विचार करणे गरजेचे आहे.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून असं म्हणतात की, श्रीमंत लोकांना काही ताण वाटत नसतो. बुद्धिजीवी लोकांना काही ताण नसतो. परंतु एक लक्षात घेतलं पाहिजे जे श्रीमंत असतात ते अनेकांची कुटुंब जगवतात, जे बुद्धिजीवी असतात ते अनेक वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये त्यांच्या बुद्धीचा वापर करून परिवर्तन घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतात आणि या सगळ्या गोष्टी विचार करण्यासाठी असं वाटतं की,

"इतक्या ही गोष्टी साचू नयेत मनात

की संपवून टाकावे जीवन एका क्षणात

इतकाही नसावा मनावर ताण

की सोडून द्यावा क्षणभरात प्राण

तेव्हा असावं एखादं कोणीतरी

मनातलं ऐकणार

मनावरच मळभ दूर झटकून टाकणार"

अगदी या पंक्तींचा अर्थ जर पाहिला तर एक लक्षात येतं की, जीवनामध्ये इतकाही ताण नसावा, मनावर दबाव नसावा की असा क्षण येतो की क्षणात स्वतः ला संपवून टाकावं असं वाटतं. पण त्यावेळी आपण जर आपल्या जवळच्या माणसाजवळ बोललं, व्यक्त झालो तर कुठेतरी मार्ग निघू शकतो. आपल्या मनावरचं दडपण, मळभ दूर झटकून टाकता येते. परंतु त्यासाठी माणसाजवळ माणुसकीचं नातं जपणार कोणीतरी असावं लागतं.

आज तेच समाजामध्ये दिसत नाही. समाज विखुरला जातोय. कुटुंब विभागली जात आहेत. कुटुंबामध्ये माणसा माणसांमध्ये स्नेह, आदरभाव, प्रेम, एकसंगता कोणत्याही ठिकाणी दिसून येत नाही. बुद्धिजीवी अधिकारी असतील तर त्यांना कार्यालयातील कामकाजाचा ताण असेल, वरिष्ठांचा ताण असेल. राजकारणी, समाजकारणी, अध्यात्म क्षेत्रात काम करणारे आणि समाज परिवर्तनाच्या समाजसेवेच्या दृष्टिकोनातून काम करणारे या प्रत्येकाचा जरी विचार केला, तर त्यांच्याकडेसुद्धा हेच चित्र आपणाला दिसतं.

म्हणून प्रथम शिक्षणाच्या माध्यमातून मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून सुरुवातीपासून अर्थात कुटुंबातल्या वरिष्ठ सदस्यांपासून त्या कुटुंबातल्या लहान बालकाला संस्काराचे बाळकडू, माणुसकीचे धडे दिले गेले पाहिजे. तरच कोणीतरी आपलं ऐकायला भविष्यात भेटेल अन्यथा हे बुद्धिजीवींमध्ये आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच जाईल. जर हे थांबवायचं असेल, याचं प्रमाण कमी करायचं असेल तर प्रत्येकाने इमानेइतबारे आपल्या कामात मन गुंतवले पाहिजे, आपल्या कर्तव्याने, जबाबदारीला न्याय दिला पाहिजे. कोणीही गैरमार्गाच्या वापरासाठी कोणावरही, कशाही पद्धतीचा दबाव टाकता कामा नये. जर अशा पद्धतीने काही घडलं तर आत्महत्या करणार्यांचे प्रमाण कमी होईल.

यावर समाजातल्या प्रत्येक घटकाने, राज्यकर्त्यांनी, शासनकर्त्यांनी वेळीच लक्ष दिले पाहिजे. आत्महत्यांचं हे चित्र बदलण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. सध्याच्या घडीला आयुष्मान 60-70 पर्यंत आलेले आहे, भविष्यात ते 50 ते 60 च्या दरम्यान येऊ शकतं. फक्त जन्माला यायचं आणि जायचं एवढंच जीवन आहे का, हाही प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. त्यामुळे अशा चिंताजनक परिस्थितीमध्ये प्रत्येकाने चिंतन करावं आणि योग्य असा पद्धतीचा मार्ग अवलंबावा. आत्महत्या हा कोणत्याही समस्येला उत्तर नाही हे लक्षात घेतलं पाहिजे आणि हाच संदेश आपण सर्वांनाच दिला पाहिजे. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही. आत्ता जे आपण जीवन जगत आहोत ते सुखी, आनंदी आणि परोपकारी वृत्तीने जगावं हीच अपेक्षा.

: प्रा. डॉ. दिलीप बंजारा /चव्हाण
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.

www.parlisangharshneta.in | Mo - 9881265102
23 Apr 2025 - Page 2 | Powered by softisky - 9764331134

दैनिक
अजिंठा टाईम्स
ajinthatimes2021@gmail.com
संपादक : संजय कांबळे, (माकेगावकर) मो.नं. ९८६०२०८१४४
लातूर वर्ष ४ थे अंक २१० शनिवार, दि.०३ मे २०२५ किंमत ५ रूपया पाने ०४ RNI NO.: MAHMAR/2015/62827

# नक्षलवाद्यांचा खात्मा करणे आवश्यक

३१मार्च२०२६पर्यंत देशातला नक्षलवाद पूर्ण पणे निपटून काढण्याची प्रतिज्ञा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केली असून ही केवळ शपथ न रहता नियोजन बद्ध पणे आखलेली मोहीम झाली पाहिजे अशा सूचना देशातल्या नक्षल विरोधी यंत्रणांना दिल्या आहेत.अमित शहा यांनी२०२६ची तारीख निश्चित केली असली तरी सध्या देशांमध्ये तेलंगणा आणि छत्तीसगडच्या सीमेवरील छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातील करीगुट्टा या गावां मध्ये असलेल्या विस्तीर्ण डोंगरावर एक मोठी नक्षल विरोधी मोहीम सुरु असून ती निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.निर्णायक म्हणजे या मोहिमेत नक्षलवादी चळवळीतील सर्वोच्च नेत्यांची धरपकड किंवा हत्या झाली तर यानंतर देशात कोठेही नक्षलवादी डोके वर काढू शकणार नाहीत. कारण या डोंगरावर नक्षलवाद्यांचे सर्वोच्च नेते एका बैठकीच्या निमित्ताने एकत्रित आलेले आहेत.आणि त्यांनी तिथे मोठी रसद जमा करून ठेवलेली आहे.त्या ठिकाणी सातशे नक्षलवादी एकत्रित झालेले असून त्यांना दहा हजार जवानांनी वेढा घातलेला आहे. हा वेढा एवढा बळकट आहे की नक्षलवाद्या पैकी एकालाही तिथून निसटून जाण्याची संधी राहिलेली नाही.त्यांचे पाण्यावाचून हाल होत आहेत.आणि उपासमार होत आहे.कारण हा वेढा आठ दिवसा पासून सुरू आहे.नक्षलवादी नेत्यांना हे ठिकाण अतिशय सुरक्षित वाटत होते त्यामुळे त्यांनी तिथे आपले हेडक्वार्टर केलेले होते. आता या हेडक्वार्टर वरच जवानांनी हल्ला चढवला असून नक्षलवादी नेते हतबल झाले आहेत.त्यांनी जवानाकडे आणि सरकारकडे शांती वार्ता करण्यासाठी पत्रे पाठवायला सुरुवात केलेली आहे.खरे म्हणजे ते गुन्हेगार लोक आहेत.कसलीही चर्चा न करता गुपचूप पोलिसांच्या हवाली होणे हे त्यांच्या वर बंधनकारक आहे.नक्षलवादी चळवळ म्हणजे काही दुसरा देश नाही.पण हे नक्षलवादी वेगळाच आव आणून सरकारला चर्चेला बोलवत आहेत.सरकारने त्यांच्याशी कसलीही शांती वार्ता करण्याचा मुद्दाच येत नाही.एक तर सर्वांना जेरबंद करावे आणि तुरुंगात डांबून त्यांच्या वर खटले चालवावेत पण ते अटक होण्याच्या ऐवजी चर्चेची तयारी दाखवत आहेत ती फेटाळून ते ताब्यात येत नसतील तर त्यांना गोळ्या घालून संपून टाकावे. देशात नक्षलवादी संघटनांना कायमचा धडा शिकवण्याची प्रतिज्ञा करून त्यांच्या विरोधात अनेकदा मोहिमा उघडल्या जातात.त्यात काही नक्षलवादी मारले जातात तर पोलिसांच्या बाजूने सुद्धा काहींना हौतात्म्य पत्करावे लागते.आणि अशी एखादी मोठी चकमक किंवा मोहीम संपली की जवानां कडून नक्षलवाद्यांचा निर्णायक पराभव झाल्याचे दावे केले जातात.मात्र अशा एखाद्या मोठ्या हल्ल्या नंतर सुद्धा नक्षलवादी संघटना काही दिवस लपून-छपून राहतात आणि काही विशिष्ट कालावधी नंतर पुन्हा डोके वर काढतात.त्यांच्या कडे अतिशय आधुनिक शस्त्रे असतात,त्यांच्या लपायच्या जागावर अनेक दिवस पुरेल एवढे रेशन असते,आणि त्यांच्या लपायच्या जागा त्यांच्या दृष्टीने सुरक्षित आणि जवानांच्या दृष्टीने प्रतिकूल असतात.त्यामुळे काही दिवसांच्या विश्रांती नंतर नक्षलवादी पुन्हा आपल्या कारवाया सुरू करतात.मात्र आता करिगुट्टा येथील डोंगरावर जी नक्षलवाद विरोधी कारवाई सुरू आहे ती भारतातल्या नक्षलवाद विरोधी कारवाईतील सर्वात मोठी आणि निर्णायक कारवाई समजली जात आहे.या कारवाईत सरकारला यश आले तर नक्षलवाद नावाची चळवळ जवळपास संपुष्टात येईल असा दावा जवाना कडून केला जात आहे.एका अर्थाने ही विक्रमी कारवाई असेल आणि निर्णायक असेल.याचे कारण म्हणजे भारताच्या अनेक राज्यातील नक्षलवादी चळवळ जवळपास संपलेली आहे.आंध्र प्रदेश,ओदिशा,तेलंगणा,बंगाल,बिहार,झारखंड या राज्यां मध्ये नक्षलवादी चळवळ ही शिल्लक राहिलेली नाही.तिचे अस्तित्व आता महाराष्ट्राचे दोन जिल्हे,छत्तीसगड आणि तेलंगणाच्या काही छोटसा भाग एवढ्या पुरते राहिलेले आहे.याच भागात ही मोहीम सुरू आहे.एकदा ही मोहीम यशस्वी झाली की उरलेल्या नक्षलवादी संघटनेचे सगळे वरिष्ठ आणि वरच्या स्तरावरचे नेते संपून जाणार आहेत.आणि विशेष म्हणजे ही कामगिरी यशस्वी होण्याची खूप शक्यता आहे.प्रत्येक वेळी अशा कारवाया आणि त्याविरुद्ध पोलिसांची कारवाई होते तेव्हा पोलिसांच्या बाजूने काहीतरी कमतरता राहिलेली असते.तिथे नक्षलवादी आक्रमक असतात आणि पोलीस बचावाच्या पवित्र्यात असतात.कारण ती कारवाई जवाना साठी अनपेक्षित असते.काही वेळेला नक्षलवाद्यांनी पोलिसांना घेरलेले असते.पण आताची करीगुट्टा इथली कारवाई पोलिसांनी नियोजन बद्ध पणे आखलेली आहे.प्रत्येक वेळी असे लक्षात येते की या कठीण परिस्थितीमध्ये जवांनाची संख्या मोठी असती तर नक्षलवाद्यांचे खूप नुकसान झाले असते.पण तसे नेहमीच होत नाही.आता मात्र वेढा घालणारे१००००जवान मोठ्या धैर्याने कारवाई करत आहेत.नक्षलवाद्यांना कुठूनही पळून जाण्याची संधी मिळून नये एवढा कडेकोट बंदोबस्त तिथे झालेला आहे. वेढा घालून बसलेल्या पोलिसांना मोठ्या प्रमाणावर रसद पुरवली जात आहे.आणि ते काम करण्यासाठी हेलिकॉप्टर्स चा वापर केला जात आहे.मोहीम पोलिसांच्या बाजूने यशस्वी होणार आणि नक्षलवाद नावाचे प्रकरण देशाच्या इतिहासातून संपून जाणार.



डॉ. बंजारा दिलीप लालू
महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर तालुका अहमदपूर जिल्हा लातूर

परळी संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# जय जय महाराष्ट्र माझा.. गर्जा महाराष्ट्र माझा..

महाराष्ट्र दिन हा दिवस महाराष्ट्राच्या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. राज्याच्या स्थापनेच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. 1 मे 1960 रोजी झालेल्या मुंबई राज्याच्या विभाजनापासून महाराष्ट्र दिन हा सामान्यतः परेड आणि राजकीय भाषणे तसेच समारंभांशी संबंधित आहे. तसेच इतर विविध सार्वजनिक आणि खाजगी कार्यक्रमांबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास आणि परंपरा या दिवशी साजरे करतात. राज्य पुनर्रचना कायदा, 1956 सार भाषांच्या आधारे भारतातील राज्यांसाठी सीमा परिभाषित केल्या गेल्या. या कायद्याचा परिणाम म्हणून जे मुंबई राज्य निर्माण झाले, ते मात्र वेगवेगळ्या मराठी, गुजराती, कच्छी आणि कोकणी भाषा बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या क्षेत्रांचे मिळून बनले होते. संयुक्त महाराष्ट्र समिती मुंबई राज्याचे दोन राज्यात विभाजन करण्याच्या चळवळीत आघाडीवर होती; एक भाग जेथे लोक प्रामुख्याने गुजराती आणि कच्छी बोलतात आणि दुसरा भाग जेथे लोक प्रामुख्याने मराठी आणि कोकणी बोलतात. 25 एप्रिल 1960 रोजी

भारतीय संसदेने लागू केलेल्या बॉम्बे पुनर्रचना कायदा, 1960 नुसार या चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांची निर्मिती झाली. हा कायदा 1 मे 1960 रोजी अंमलात आला.




21 नोव्हेंबर 1956 दिवशी फ्लोरा फाउंटनच्या परिसरात तणावाचे वातावरण होते कारण राज्य पुनर्रचना आयोगाने महाराष्ट्राला मुंबई देण्याचे नाकारले त्यामुळे मराठी माणसे चिडली होती. सर्वत्र छोट्यामोठ्या सभांमधून या निर्णयाचा निषेध होत होता. या संगठनामुळे कामगारांचा एक विशाल मोर्चा सरकारचा निषेध करण्यासाठी फ्लोरा फाऊंटनासमोरील चौकात येण्याचे नियोजन झाले. त्यानंतर प्रचंड जनसमुदाय एका बाजूने चर्चगेट स्थानकाकडून व दुसऱ्या बाजूने बोरीबंदरकडून गगनभेदी घोषणा देत, फ्लोरा फाउंटनकडे जमला. मोर्चा पोलिसी ताकद वापरुन उधळून लावण्यासाठी लाठीचार्ज करण्यात आला. मात्र अढळ सत्याग्रहीं मुळे पोलिसांचे हे प्रयत्न अयशस्वी झाले आणि पोलिसांना गोळीबाराचा आदेश मुंबई राज्याचे

तत्कालीन मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याद्वारे देण्यात आला. गोळीबार झाला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात 106 आंदोलक हुतात्मे झाले. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे सरकारने नमते घेऊन 1 मे, 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली. त्यानंतर 1965 मध्ये त्या जागी हुतात्मा स्मारकाची उभारणी करण्यात आली. जय जय महाराष्ट्र माझा.. गर्जा महाराष्ट्र माझा.. सर्व मराठी बांधवांना आणि महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाला महाराष्ट्र आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

"आम्हाला अभिमान आहे महाराष्ट्रीय असण्याचा,

आम्हाला गर्व आहे मराठी भाषेचा

आम्ही जपतो आमची संस्कृती

आमची निष्ठा आहे मातीशी."

**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**सहाय्यक प्राध्यापक**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर**





परळी संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान बुद्ध



परिचय: बौद्ध धर्माचे संस्थापक भगवान बुद्ध आहेत. हिंदूंसाठी महात्मा बुद्ध हे भगवान विष्णूचे नववे अवतार आहेत. गौतम बुद्ध हे भारतात जन्मलेले महान व्यक्ती होते. त्यांचे बालपणीचे नाव सिद्धार्थ होते. त्यांना गौतम बुद्ध म्हणूनही ओळखले जाते. हिंदू धर्मानुसार वैशाख शुक्ल पौर्णिमा हा भगवान बुद्धांचा जन्मदिवस आहे. हा दिवस गौतम बुद्धांची जयंती आणि निर्वाण दिन दोन्ही आहे. खूप. त्याच दिवशीत्याला आत्मज्ञान प्राप्त झाले होते. वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात.

बुद्धाचे प्रारंभिक जीवन: भगवान गौतम बुद्ध यांचा जन्म 563 वर्षांपूर्वी कपिलवस्तुची राणी महामाया यांच्या येथे नेपाळच्या लुंबिनी जंगलात झाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव शुद्धोदन होते. बुद्धाच्या जन्मानंतर एका पैगंबराने राजा शुद्धोदनाला सांगितले की हा बालक चक्रवर्ती सम्राट होईल, पण वैराग्यभाव निर्माण झाला तर त्याला बुद्ध होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही आणि त्याची कीर्ती जगात कायम राहील. त्यांच्या जन्मानंतर 7 दिवसातच त्यांच्या आईचे निधन झाले. सिद्धार्थ यांच्या मावशीने त्यांचे संगोपन केले. सिद्धार्थने गुरु विश्वामित्र यांच्याकडे केवळ वेद आणि उपनिषदांचाच अभ्यास केला नाही तर राजकारण आणि युद्धशास्त्राचे शिक्षणही घेतले. कुस्ती,घोडदौड, धनुर्विद्या, रथ चालवणे यात त्याची बरोबरी कोणी करु शकत नाही.लहानपणापासूनच सिद्धार्थ यांच्या मनात सहानुभूती होती. त्यांना कोणत्याही प्राण्याचे दुःख बघवत नसायचे. हे या उदाहरणांवरून स्पष्ट होते घोड्यांच्या शर्यतीत, जेव्हा घोडे धावू लागले आणि त्यांच्या तोंडातून फेस येऊ लागला, तेव्हा सिद्धार्थ त्यांना थकवा समजून त्यांना थांबवायचे आणि जिंकलेली पैज हरत असे. या खेळात सिद्धार्थ स्वतः हरणे आवडले कारण कोणाला हरवणे आणि दुःखी होणे हे त्याच्याकडून पाहिले जात नव्हते.

कुटुंब: शाक्य वंशात जन्मलेल्या सिद्धार्थ यांचा विवाह दंडपाणी शाक्य यांची कन्या यशोधरा यांच्याशी वयाच्या 16 व्या वर्षी झाला. राजा शुद्धोदन यांनी सिद्धार्था यांना सुख-विलास दिले. तीन ऋतूंसाठी तीन सुंदर राजवाडे बांधले गेले. तेथे नृत्य, गायन आणि मनोरंजनाचे सर्व साहित्य होते. त्यांच्या सेवेत गुलाम ठेवले होते पण या सगळ्या गोष्टी सिद्धार्थ यांना संसारात बांधून ठेवू शकल्या नाहीत.

त्यांचे मन विषयात अडकून राहू शकले नाही आणि एके रात्री त्यांची पत्नी यशोधरा आणि मुलगा राहुल यांना पाहून त्यांच्या डोक्यावर हात ठेवून ते हळूच राजवाड्यातून बाहेर पडले. ते घोड्यावर स्वार झाले आणि रातोरात गोरखपूरजवळ असलेल्या आमोना नदीच्या काठी 30 योजनांवर पोहोचले आणि शाही वस्त्रे काढले, केस कापले आणि संन्यासी झाले आणि आयुष्यभर धम्माचा प्रचार करत राहिले.

प्रेरक संदर्भ: एकदा सिद्धार्थ यांना जंगलात शिकारीच्या बाणाने जखमी झालेला हंस दिसला, तेव्हा त्यांनी त्याला उचलले, बाण काढला, त्याला मिठी मारली आणि पाणी प्यायला दिले. त्याच वेळी सिद्धार्थ यांचा चुलत भाऊ देवदत्त तेथे आला आणि म्हणाला की हा शिकार माझा आहे, मला द्या. सिद्धार्थ यांनी हसून नकार दिला आणि म्हणाले की तुम्ही या हंसाला मारून टाकाणार होता आणि मी त्याचे प्राण वाचवले आहे आता मला सांगा की मारणाऱ्याला त्याचा हक्क हवा की वाचवणाऱ्याला? देवदत्तने याची तक्रार सिद्धार्था यांच्या वडील राजा शुद्धोदन यांच्याकडे केली. शुद्धोदन सिद्धार्थ यांना म्हणाले की तू हा हंस देवदत्तला का देत नाहीस? शेवटी, तो बाण त्याने चालवले होते?

यावर सिद्धार्थ म्हणाले - मला सांगा, आकाशात उडणाऱ्या या निष्पाप हंसावर बाण मारण्याचा त्याला काय अधिकार होता? हंसने देवदत्तचे काय केले? मग त्यावर बाण का मारला? त्याला का दुखावले? या प्राण्याचे दुःख मी पाहिलेले नाही. म्हणून मी बाण काढून त्याची सेवा केली. त्याचा जीव वाचवला. त्यावर माझा हक्क आहे. सिद्धार्थ यांच्या बोलण्याने राजा शुद्धोदन प्रसन्न झाले. ते म्हणाले तुझं बरोबर आहे. मारेकऱ्यापासून वाचवणारा श्रेष्ठ आहे. यावर तुमचा हक्क आहे.

महात्मा बुद्धांचे महापरिनिर्वाण: सुजाता नावाच्या एका महिलेने वटवृक्षाकडे नवस केला होता की मला मुलं झाल्यास मी प्रसाद अर्पण करेन. तिचा नवस पूर्ण झाल्यावर सोन्याच्या ताटात गाईच्या दुधाची खीर घेऊन ती वटवृक्षाजवळ पोहोचली आणि सिद्धार्थ त्या झाडाची पूजा करत असल्याचे तिला दिसले. सुजाताने हे आपले भाग्य मानले आणि तिला वाटले की वटदेवता स्वयं तिथे आहे, म्हणून सुजाताने सिद्धार्थ यांना मोठ्या आदराने खीर दिली. आणि म्हटले, 'जशी माझी इच्छा पूर्ण झाली, तुम्हीही इथे काही इच्छा घेऊन बसला असाल तर तुमचीही इच्छा पूर्ण होईल.' भगवान बुद्धांनी महापरिनिर्वाण प्राप्त केले, म्हणजे वैशाखी पौर्णिमेच्या दिवशी म्हणजे बुद्धाचा जन्म आणि बोधी प्राप्तीच्या दिवशी शरीर सोडले. शरीर सोडण्यापूर्वी त्यांचे शेवटचे शब्द होते 'अप्प दिपो भव:...सम्मासती म्हणजे स्वतःचा दिवा स्वत: बना...' लक्षात ठेवा तुम्ही पण बुद्ध आहात. त्यामुळे वैशाख पौर्णिमेचा दिवस हिंदूंसाठी पवित्र मानला जातो.



**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.**

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकाराचा नेता..
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे

# पाश्चिमात्य संस्कृतीचा हिंदू मुलीवर वाढता प्रभाव- कारणे आणि परिणाम

मुसलमान मुलींना अंगभर कपडे पाहीजेत

आणि हिंदु मुलींना अंगभर कपडे नकोत...

आधुनिकतेच्या नावाखाली 99 टक्के हिंदु मुली वाया जात चालल्यात...आज रोजी कमीत कमी कपडे घालुन फिरत असलेल्या 99% मुली या हिंदु आहेत... अश्लिलतेमुळे बलात्काराला बळी पडत असलेल्या 99% मुली हिंदु आहेत... मुसलमान मुलींना त्यांची संस्कृती जपायची आहे पण हिंदु मुलींना पाश्चात्य संस्कृती जवळ करायची आहे.. मी हिजाब आणी बुरख्याच्या विरोधातच आहे शंभर टक्के परंतु हिजाबवरुन पेटलेल्या मुस्लीम मुली बघुन वाईट वाटलं की, हिंदु मुलींना स्वधर्माबाबत कसलीही आपुलकी नाही. परकीय ख्रिश्चनांचे अनुकरण करण्यातच धन्यता मानत असलेल्या हिंदु मुली साडी, पंजाबी ड्रेस घालणं कमी पणाचं समजतात हे दुर्दैवच आहे...

हिंदु मुलींनी सुद्धा धर्मनिष्ठा जपली पाहीजे. आपले संस्कार जपले पाहिजेत. मुसलमान मुलींना बुरखा घालुन फिरायला लाज वाटत नाही पण हिंदु मुलींना कपाळी कुंकु, टिकली लावायला लाज वाटते हे सत्य आहे, दुर्दैव आहे....

कुठतरी चुकतय ते सुधारलं पाहीजे...

हा बदल नक्की केव्हा झाला?

वीस पंचवीस वर्षांपूर्वी नोकरी करणारा मुलगा पगार निमूटपणे वडिलांच्या हातात देत होतो..! मग वडील त्यातून घरातला काही खर्च करायचे, थोडी बचत केली जायची आणि मुलाला येण्याजाण्याच्या



तिकीटापुरते आणि दिवसाला फार तर एक चहा पिता येईल इतके पैसे दिले जात होते. आता मुलाला पगार किती मिळतो हे विचारायला आई-वडील कचरतात. मुलगा त्या पैशाचे काय करतो हे विचारायची हिम्मत/इच्छा आई-वडिलांकडे नसते. हा बदल केव्हा झाला....?

क ॉ ले ज म ध्ये जाताना साडी ऐवजी पंजाबी ड्रेस घालायला मिळतो याचा आनंद मानणारी मुलगी आता तिच्या मुलीला हाफ पॅन्टमध्ये फिरताना बघते. मनातल्या मनात चरफडते पण स्पष्टपणे मुलीला अंगभर कपडे घाल असे म्हणायची हिंमत करत नाही....! हा बदल केव्हा झाला....?

वयात आलेली मुलगी संध्याकाळच्या आत घरात असायची, घरकामात मदत करायची. आता एकदा स्वयंपाक घरात येऊन खायला काय आहे ते बघते आणि स्वतःच्या खोलीत जाऊन परस्पर ऑर्डर करून खाणं मागवते. हा बदल केव्हा झाला......?

लग्नाअगोदर मुला-मुलीने एक-दोन वेळा भेटणे म्हणजे पुढारलेपण मानणारे आता नातवंडांचे लिव इन रिलेशनशिप स्वीकारतात. हा बदल केव्हा झाला.....?

वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठ्या लोकांपासून लपून भांग पिण्याचा कार्यक्रम ठरवणारी आता प्रौढ झालेली माणसं घरातल्या तरुण मुलापुढे सहज ग्लास भरु लागली. हा बदल कधी झाला....?

नातवंडांना जवळ घेणारी, नातीच्या केसांना तेल लावून देणारी, गोष्टी सांगणारी आजी, आता सकाळी योगा क्लास नाहीतर लाफ्टर क्लासला जाते आणि नातवंडांशी टीव्हीच्या रिमोटसाठी भांडते. हा बदल केव्हा झाला.....?

घरातल्या कोणाशी बोलत नाहीत अशांना कौन्सिलर जवळचा वाटतो. त्याला पैसे देऊन त्याचा सल्ला मानतात. पण स्वतःच्या भावंडांवर विश्वास ठेवायला तयार नसतात. तोच प्रकार पैशाच्या व्यवहाराबद्दल. नवरा-बायको दोघेही कमावतात. पण कुठे खर्च झाले, किती गुंतवले, कुठे गुंतवले, ते फक्त सीएला माहित असते. मुलीच्या संसारातले सगळे लहानसहान तपशील जाणून घेणारे आई-वडील, मुलगा आणि सुनेच्या बाबतीत मात्र अलिप्त राहतात. असं का होतंय.....?

वडीलधा-यांचा मान ठेवणा-यांच्या मुली नवऱ्याचा येता-जाता अपमान करतात, सगळ्यांसमोर उणं-दुणं काढतात. अशा वेळी मुलींचे आई-वडील कसनुसं हसतात आणि मुलाचे आई-वडील हतबुद्ध होतात. हा बदल कधी झाला.......?

तरुण मुले एक नोकरी सोडतात, दुसरी धरतात. राहत्या गावातून दुसऱ्या गावी जातात. सगळे ठरल्यावर आई-वडिलांना फक्त सांगितलं जातं. त्याच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या गोष्टींमध्ये तर आई-वडिलांना सांगण्याचीही गरज नसते. मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, ब्रेकअप होणे, सिनेमाला जाणे, पार्टी करणे, स्वतःसाठी नवीन वस्तू, फोन, कपडे वगैरे खरेदी करणे, अशा गोष्टीत आई-वडिलांनी दखल दिलेली मुलांना आवडतं नाही. असं का होतं..? हा बदल कधी झाला.......?

नातेवाईकांकडे जाणं, शेजाऱ्यांकडे वेळप्रसंगी जाणं, लग्न समारंभात सहभागी होणं, कुळाचार पाळणे, देवळात जाणे, पूजा करणे, इत्यादी गोष्टींवर आता काही घरात नाराजी नाही तर भांडणे होतात. असं का होतं...? हा बदल कधी झाला.......?

मान्य आहे, दोन पिढ्यांमध्ये अंतर असतेच. पाचवारी नेसणाऱ्या सुनेबद्दल नऊवारी नेसणाऱ्या सासूने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती. पण आता पन्नाशी पार केलेल्या पिढीत आणि त्यांच्या मुलांच्या पिढीत अंतर नाही दरी निर्माण झाली असं वाटतं. हा बदल नक्की केव्हा झाला......?

खरंच विचार करायला हवा. समाज प्रगतीकडे नव्हे तर अधोगतीकडे चालल्याचे हे भयंकर वास्तव आहे. आणि ते सहजासहजी पचनी पडणारेही नाही हे मोठे _दुर्दैव_ आहे.



**डॉ.बंजारा दिलीप लालू**
**लोकप्रशासन विभाग प्रमुख,**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.**

# उदारमतवादी आणि सर्जनशील कलांच्या माध्यमातून उच्च शिक्षणाचे रूपांतर– डॉ.दिलीप बंजारा



अहमदपूर(प्रतिनिधी): भारताची उच्च शिक्षण व्यवस्था झपाट्याने विकसित होत आहे. जॉब मार्केट बदलत असताना आणि तंत्रज्ञानाने भविष्याची नव्याने व्याख्या केल्यामुळे, लिबरल आणि क्रिएटिव्ह आर्ट्स विद्यार्थ्यांना केवळ करिअरसाठीच नव्हे तर जीवनासाठी तयार करण्यासाठी शक्तिशाली साधने म्हणून उदयास येत आहेत. लिबरल आणि क्रिएटिव्ह आर्ट्सचे शिक्षण हे केवळ शैक्षणिक ज्ञानापुरतेच नाही. ते गंभीरपणे विचार करणे, सखोल विचार करणे आणि जगाशी अर्थपूर्णपणे गुंतून राहणे शिकणे आहे असे, अहमदपूर येथील महात्मा गांधी महाविद्यालय येथील डॉ.दिलीप बंजारा यांनी आपले मत व्यक्त केले.

या गतिमान क्षेत्रात इंग्रजी, लोकप्रशासन, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, वाणिज्य, व्हिज्युअल यासारख्या विषयांचा समावेश आहे. कम्युनिकेशन, फॅशन डिझाईन आणि व्हिज्युअल आर्ट्स. एकत्रितपणे, ते एक समृद्ध, बहु–अनुशासनात्मक अनुभव देतात जे सहानुभूती, सर्जनशीलता आणि धोरणात्मक विचार यासारखी कौशल्ये विकसित करतात. साहित्याचा विद्यार्थी मीडिया किंवा प्रकाशनात भरभराट करू शकतो, तर लोकप्रशासन आणि राज्यशास्त्रात प्रशिक्षित व्यक्ती सार्वजनिक धोरणाला आकार देऊ शकते. लिबरल आर्ट्स पदवीधर डिजिटल उद्योजकतेपासून नागरी सेवा आणि जागतिक NGO पर्यंतच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करत आहेत. एकात्मिक कार्यक्रम आज हँड्स–ऑन लर्निंग, इंटर्नशिप आणि करिअरची तयारी वाढवण्यासाठी इंडस्ट्री एक्सपोजरवर लक्ष केंद्रित करतात.

परळी **संघर्षनेता**
https://www.parlisangharshneta.in 9881265102

# समान परिस्थिती, वेगळा न्याय : महाराष्ट्रातील बंजारा समाज अनुसूचित जमाती (S.T.) आरक्षणाचा हक्कदार

 ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि राज्य पुनर्रचनेतील अन्याय :

भारतातील बंजारा, गोर बंजारा अथवा लमाण, लमाणी समाज हा पूर्वीपासूनच वंचित, पीडित व सतत स्थलांतरित जीवन जगणारा समुदाय राहिलेला आहे. या समाजाचा मागोवा घेतला तर निजामशाहीच्या काळातही त्यांच्या अस्तित्वाची स्पष्ट नोंद सरकारी गॅझेटमध्ये दिसून येते. निजामाच्या हैदराबाद संस्थानातील अधिकृत नोंदींमध्ये बंजारा समाजाला स्वतंत्र जमात म्हणून मान्यता होती. त्याचप्रमाणे तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या अहवालांत व विविध जिल्ह्यांच्या गॅझेट नोंदींमध्येही या समाजाचा उल्लेख अनुसूचित व मागासवर्गीय म्हणून केला गेला आहे. म्हणजेच, बंजारा समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची मागासलेपणाची जाणीव तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनाही होती, हे निर्विवादपणे सिद्ध होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1950 मध्ये भारतीय संविधानाची अंमलबजावणी झाली. त्यातील कलम 366(25) व अनुसूची 342 अंतर्गत अनुसूचित जमातींची यादी जाहीर करण्यात आली. या यादीत तत्कालीन हैदराबाद संस्थानाचा भाग असलेल्या आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यात बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती ( S.T.) प्रवर्गात करण्यात आला. आजही त्या राज्यांत बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळतो. याउलट, महाराष्ट्रात मात्र राज्य पुनर्रचनेच्या प्रक्रियेदरम्यान मोठा अन्याय घडला.

1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मराठवाडा विभाग हा हैदराबाद संस्थानाचा भाग म्हणून महाराष्ट्रात सामील झाला. राज्य पुनर्रचनेच्या या प्रक्रियेत, इतर राज्यांत अनुसूचित जमाती म्हणून मान्यता असलेला बंजारा समाज महाराष्ट्रात मात्र 'विमुक्त जाती अ' प्रवर्गात टाकण्यात आला. हा निर्णय पूर्णतः विसंगत व अन्यायकारक होता. कारण सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती सारखी असूनही, शेजारील राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळतो, आणि महाराष्ट्रातील बंजारा समाज मात्र त्याच अधिकारापासून वंचित राहतो.

ही विसंगती संविधानातील समानता तत्त्वाच्या (Equality Principle – कलम 14 व 15) स्पष्ट उल्लंघनासमान आहे. एकाच समाजाला, एकाच वंशपरंपरेला, वेगवेगळ्या राज्यांत वेगळा दर्जा देणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत संकल्पनेलाही बाधक आहे. "समता हीच खरी लोकशाहीचा आत्मा आहे" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते, परंतु बंजारा समाजाच्या प्रश्नाकडे मात्र शासनाने व कायदेमंडळाने पूर्णपणे दुर्लक्ष केले.

आज महाराष्ट्रातील बंजारा समाज या ऐतिहासिक अन्यायाच्या छायेत जगत आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रश्न अजूनही तेवढ्याच तीव्र आहेत, जितके इतर राज्यांतील बंजारा समाजाचे होते. परंतु आरक्षणातील अन्यायामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला प्रगतीची दारे बंद झाली. त्यामुळेच या प्रश्नाचा ऐतिहासिक संदर्भ, घटनात्मक तरतुदी व सामाजिक स्थिती लक्षात घेऊन समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देणे अपरिहार्य ठरते.

 शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वातील मागासलेपणा :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या शैक्षणिक स्थितीकडे पाहिले तर ती अत्यंत चिंताजनक व मागासलेली आहे. आजही ग्रामीण व दुर्गम भागात या समाजातील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षणाची सुविधा अपुरीच आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, बंजारा समाजातील साक्षरता दर महाराष्ट्रात केवळ सुमारे 52 टक्क्यांच्या आसपास आहे, तर राज्याचा सरासरी साक्षरता दर 82 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. उच्चशिक्षणाच्या दृष्टीने ही तफावत अधिकच गंभीर ठरते. महाविद्यालयीन शिक्षणात बंजारा समाजाचा प्रवेश अत्यल्प असून अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमात तर हा आकडा नगण्य आहे. अनुसूचित जमातींना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक आरक्षणाचा लाभ न मिळाल्यामुळे या समाजातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे स्वप्न दहावी-बारावी नंतरच थांबते.

रोजगाराच्या क्षेत्रातही बंजारा समाजाला प्रचंड वंचितपणाचा सामना करावा लागतो. राज्यातील बहुतांश बंजारा युवक पारंपरिक हातमजुरी, शेतमजुरी, लहान-मोठे धंदे किंवा स्थलांतरित मजुरीवर अवलंबून असतात. शासकीय नोकऱ्यांमध्ये या समाजाचे प्रमाण अत्यल्प असून, तेही ओबीसी प्रवर्गातील स्पर्धेमुळे मागे पडते. महाराष्ट्र सरकारच्या कर्मचारी आकडेवारीनुसार, गट-अ आणि गट-ब पदांवर बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व जवळजवळ नगण्य आहे. गट- क आणि गट-ड मध्ये काही प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या असल्या तरी त्या टिकाव धरु शकलेल्या नाहीत. याउलट, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटकात अनुसूचित जमाती आरक्षणामुळे बंजारा समाजातील मोठा वर्ग शासकीय सेवेत पोहोचला असून, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रगती करत आहे.

राजकीय प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने बंजारा समाज महाराष्ट्रात नेहमीच उपेक्षित राहिला आहे. अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या मतदारसंघांत या समाजाला उमेदवारी मिळत नाही, कारण त्यांना ओबीसीमध्ये गणले जाते. दुसरीकडे, ओबीसी प्रवर्गातील प्रमुख जातींच्या राजकीय वर्चस्वामुळे बंजारा समाजाचे नेतृत्व दुय्यम ठरते. त्यामुळे विधानमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा संसदेत समाजाचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. "लोकशाही ही संख्येवर नाही तर प्रतिनिधित्वावर उभी असते" असे म्हटले जाते, परंतु बंजारा समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

या शैक्षणिक, रोजगार व राजकीय वंचितपणाचे मूळ कारण म्हणजे समाजाला अनुसूचित जमातींचा दर्जा न मिळणे हे होय. कारण राज्यघटनेतील कलम 46 नुसार, अनुसूचित जाती व जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे विशेष रक्षण करण्याची जबाबदारी राज्यावर टाकलेली आहे. परंतु महाराष्ट्रातील बंजारा समाज या संरक्षणापासून वंचित आहे. "समाजाच्या सर्वात दुर्बल घटकांना बळकट केल्याशिवाय खरी लोकशाही फुलू शकत नाही" हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आजही तितकाच लागू होतो.

 न्यायालयीन लढा, आयोगांचे अहवाल व धोरणात्मक शिफारसी :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाने अनुसूचित जमाती प्रवर्गातील हक्क मिळविण्यासाठी गेली अनेक दशके न्यायालयीन आणि प्रशासकीय स्तरावर लढा दिला आहे. 1950 मध्ये भारतीय संविधान लागू झाल्यावर तत्कालीन हैदराबाद राज्याच्या गॅझेटमध्ये बंजारा/लंबाडी/सुगाळी समाजाचा समावेश अनुसूचित जमाती यादीत होता. परंतु 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यानंतर मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला आणि नवीन तयार झालेल्या बॉम्बे राज्याने अनुसूचित जमातींची यादी तयार करताना बंजारा समाजाला वगळले. याविरुद्ध समाजाने आंदोलन, निवेदने, खटले अशा विविध मार्गांचा अवलंब केला.

न्यायालयीन स्तरावर पाहिले तर, बंजारा समाजाचे अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले. यामध्ये समाजाने हेच अधोरेखित केले की, "राज्याचे पुनर्रचनेनंतर फक्त प्रशासकीय सीमा बदलल्या, पण समाजाचे सामाजिक-आर्थिक वास्तव तेच राहिले. त्यामुळे हैदराबादमधील ST दर्जा महाराष्ट्रातही कायम राहायला हवा होता." न्यायालयांनी काही ठिकाणी राज्य व केंद्र सरकारला समाजाच्या मागणीचा गांभीर्याने विचार करण्याचे निर्देश दिले असले तरी, अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही.

विविध आयोगांच्या अहवालांमध्येही बंजारा समाजाच्या मागणीस आधार मिळतो. खास करून मंडल आयोग (1980) यांनी बंजारा समाजाच्या मागासलेपणाचे सविस्तर वर्णन केले होते. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने (काका काळेलकर व नंतरचे आयोग) देखील बंजारा समाजाच्या सामाजिक-शैक्षणिक मागासलेपणाची नोंद केली आहे. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने (2010, 2015) केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालांमध्ये, "समान समाजाला एका राज्यात ST आणि दुसऱ्या राज्यात OBC/VJNT मध्ये टाकणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वाला विरोधी आहे" असे नमूद केले आहे.

धोरणात्मक स्तरावर पाहता, महाराष्ट्र सरकारने अनेक वेळा केंद्र सरकारला बंजारा समाजाच्या ST दर्जासाठी शिफारस केली आहे. 2008, 2013 मध्ये राज्य मंत्रिमंडळाने ठराव पारित करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु केंद्र सरकारकडून "संपूर्ण देशभर एकसमान धोरण" या कारणावरुन तो प्रस्ताव अजूनही प्रलंबित ठेवण्यात आला आहे. दुसरीकडे, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या राज्यांमध्ये बंजारा समाज आजही ST प्रवर्गात आहे आणि तिथे त्यांना शैक्षणिक, रोजगार व राजकीय लाभ मिळत आहेत.

न्यायालयीन आणि आयोगांच्या निष्कर्षांवरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, बंजारा समाजाची मागणी ही केवळ भावनिक किंवा राजकीय नाही, तर घटनात्मक व न्यायसुसंगत आहे. राज्यघटनेतील कलम 14 (समानतेचा हक्क) आणि कलम 15(4), 16(4) (आरक्षणाच्या तरतुदी) याच्या आधारे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गाचा हक्क मिळणे अपरिहार्य आहे. "ज्या समाजाला इतिहासाने वंचित केले, त्याला भविष्याने संधी द्यावी" हा न्यायनिवाड्याचा मूलभूत विचार आजही लागू होतो.

 निष्कर्षात्मक सारांश :

महाराष्ट्रातील बंजारा समाजावर झालेला ऐतिहासिक अन्याय केवळ प्रशासकीय निर्णयाचा परिणाम आहे, समाजाच्या सामाजिक-आर्थिक वास्तवाचा नव्हे. निजामशाही काळात व नंतर हैदराबाद राज्यात बंजारा समाजाला अनुसूचित जमाती म्हणून मान्यता होती. 1956 च्या राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावर या समाजाचा ST दर्जा काढून टाकण्यात आला आणि त्यांना VJ/NT प्रवर्गात टाकण्यात आले. परिणामी, शैक्षणिक आरक्षण, शासकीय नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्व क्षेत्रात समाजाची पिढ्यान्पिढ्या हानी झाली आहे. समान सामाजिक-आर्थिक स्थितीत असताना शेजारच्या आंध्र प्रदेश, तेलंगणा S.T. आणि कर्नाटकातील बंजारा समाज SC म्हणून प्रगत होत असताना महाराष्ट्रातील बंजारा समाज मागे राहिला आहे.

घटनात्मक दृष्ट्या ही परिस्थिती कलम 14 (समानतेचा हक्क), कलम 15(4) व 16(4) (आरक्षणाची तरतूद) आणि कलम 46 (मागासवर्गीयांच्या हितसंरक्षणाची जबाबदारी) या तरतुदींना विरोधी ठरते. संविधानाने दिलेले समान हक्क एका समाजाला फक्त राज्यांच्या सीमांच्या आधारावर हिरावून घेणे हे अन्यायकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा ठरवले आहे की, आरक्षण व प्रतिनिधित्वाचा उद्देश "सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे" हा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही ST दर्जा देणे हेच न्यायसंगत ठरते. किंबहुना तो कायदेशीर हक्क ठरतो.

आज बंजारा समाज शिक्षणात मागे आहे, शासकीय सेवेत त्यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे, राजकीय क्षेत्रात त्यांचा आवाज दडपला गेला आहे. न्यायालयीन खटले, विविध आयोगांचे अहवाल आणि राज्य मंत्रिमंडळाचे ठराव यामध्ये वारंवार समाजाच्या मागणीची वैधता अधोरेखित झाली आहे. परंतु केंद्र सरकारकडून अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित आहे. "ज्यांना इतिहासाने वंचित केले, त्यांना भविष्याने न्याय द्यावा" हा विचार आता प्रत्यक्षात उतरवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला ST दर्जा देणे म्हणजे फक्त आरक्षणाचा लाभ नव्हे, तर त्यांचा हरवलेला सामाजिक-सांस्कृतिक सन्मान परत मिळवून देणे आहे.

यामुळे आता धोरणकर्त्यांनी धाडसी निर्णय घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दर्जा द्यावा. हा निर्णय घेतल्यास समाजाला शिक्षण, रोजगार व राजकारणातील संधी समानतेने उपलब्ध होतील आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले जाईल.



**डॉ. चव्हाण दिलीप लालू**
**रुपचंद नगर,तालुका रेनापुर,जिल्हा लातूर**

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता..
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# हुंडा घेणे कायदेशीर गुन्हा की समाजातील प्रतिष्ठित लोकांची प्रतिष्ठा.....!

"विवाह" हे एक पुरुष व स्त्री अश्या दोन व्यक्तीमधील सामाजिक बंधन आहे. हिंदू धर्मीयांत हा संस्कार आहे, तर अन्य धर्मीयांत हा कायदेशीर करार असतो. विवाह हा संतती किवा वंश पुढे नेण्यासाठीचा कायदेशीर व सामाजिक मार्ग आहे. विवाह संस्था ही संस्कृतीस आणि उपसंस्कृतीस अनुलक्षून विविध पद्धतींनी पतिपत्नींमधले जवळकीचे आणि लैंगिक नाते मान्य करते. विवाहामुळे दोन व्यक्तींचे नव्हे तर दोन कुटुंबे आणि त्यांचे नातेवाईक नात्याने जोडले जातात. या नात्यास लग्नगाठ म्हणतात. लग्न हे पवित्र बंधन आहे.मिळते. याचे दोन मुख्य प्रकार आहेत पहिले प्रकारात एका स्त्रीचे आपसात सख्खे किंवा सावत्र असतात याला भ्रातृक बहुभर्तृता म्हणतात द्रौपदीचे पाची पति भाऊ होते. आजकल या प्रकारच्या बहुभर्तृता देहरादून जिल्ह्यातील जौनसार बावरच्या खस लोकांमध्ये आणि नीलगिरिच्या टोडों मध्ये आहे. मोठ्या भावाचे लग्न झाल्यावर त्याची पत्नी सगळ्या भावांची पत्नी समझली जाते याच्या दूसऱ्या प्रकारात एका स्त्रीच्या अनेक पतिंमध्ये भावाचे संबंध किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे घनिष्ठ संबंध नाही होत याला अभ्रातृक किंवा मातृसत्ताक बहुभर्तृता म्हणतात. मलावारचे नायर लोकांमध्ये पहिले या प्रकार बहुभर्तृताचे प्रचलन होते.

बहुभर्तृताचे उत्पादक कारणांविषयी समाजशास्त्रज्ञ आणि नृवंशशास्त्रज्ञांमध्ये प्रबल मतभेद आहेत. वैस्टरमार्क ने याचे प्रधान कारण पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या कमी असणे हे सांगितले होते. उदाहरणार्थ नीलगिरिच्या टोडोंमध्ये बालिकावधाची कुप्रथा मुळे एका स्त्री मागे दोन पुरुष झाले, म्हणून तेथे बहुभर्तृताचे प्रचलन स्वाभाविक रुपाने झाले परंतु राबर्ट ब्रिफाल्ट ने हे सिद्ध केले की स्त्रियांची कमी या प्रथेचे एक मात्र कारण नाही आहे. तिब्बत, सिक्किम, लद्दाख, लाहौल इत्यादी बहुभर्तृक प्रथांच्या प्रदेशात स्त्री पुरुषांची संख्या मध्ये जास्त मोठा फरक नाही आहे. कर्निंगहॅमच्या मतानुसार लडाखमध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त आहे म्हणून सुमनेट, लोर्ड, बेल्यू इत्यादी विद्वान लोकांनी याचे प्रधान कारण निर्धनता हे मानले आहे. सुमनेरने याला तिब्बतच्या उदाहरणाची पुष्टी करत म्हणले आहे की तेथे पैदाइश इतनी कमी होते की एका पुरुषाला कुटुंबाचे पालन संभव होत नाही म्हणून अनेक पुरुष मिळून पत्नी ठेवतात या मुळे संतती पण कमी होते आणि जनसंख्या मर्यादित राहते याचे दोन मुख्य प्रकार आहेत पहले प्रकारात एका स्त्रीचे आपसात सख्खे किंवा सावत्र असतात इसे भ्रातृक बहुभर्तृता म्हणतात द्रौपदीचे पाची पति भाऊ होते.

हुंड्याची कारणे:-

भारतातील हुंडा प्रथेची विविध कारणे सांगितली गेली आहेत. यामध्ये आर्थिक घटक आणि सामाजिक घटकांचा समावेश होतो.

हुंडा व्यवस्थेला हातभार लावणारे अनेक आर्थिक घटक आहेत. यापैकी काहींमध्ये वारसा प्रणाली आणि वधूची आर्थिक स्थिती यांचा समावेश होतो.

वारसाबाबत कमकुवत कायदेशीर संस्था स्त्रियांना गैरसोयीच्या आहे आणि वारसा फक्त मुलांकडेच राहतो. यामुळे स्त्रिया त्यांच्या पतींवर आणि सासरच्या लोकांवर अवलंबून रहावे लागते ज्यासाठी हुंडा देतात.1956 पूर्वी, ब्रिटिश राजवटीच्या काळात, मुलींना त्यांच्या कुटुंबाच्या संपत्तीवर वारसा हक्क नव्हता. 1956 मध्ये, भारताने हिंदू उत्तराधिकार कायद्यांतर्गत, हिंदू, शीख आणि जैन कुटुंबांमधील मुली आणि पुत्रांना समान कायदेशीर दर्जा दिला. नवीन वारसा कायदा असूनही, पालकांच्या मृत्यूनंतर पालकांच्या संपत्तीचे वाटप सामाजिक प्रक्रियेद्वारे मुलीला तिच्या लग्नाच्या वेळी केले जाते अशी प्रक्रिया म्हणून हुंडा चालू ठेवला आहे.

हुंड्याने, किमान सैद्धांतिकदृष्ट्या, स्त्रियांना त्यांच्या लग्नात जंगम वस्तूंच्या रुपात आर्थिक सुरक्षा दिली जाते. यामुळे कौटुंबिक संपत्तीचे तुकडे टाळण्यास मदत झाली आणि त्याच वेळी वधूला सुरक्षा प्रदान करण्यात आली.

हुंडा, सामाजिक रीतिरिवाज किंवा विधींवर प्रभाव टाकणाऱ्या विवाह प्रथांव्यतिरिक्त, पालकांच्या हुंड्याची अपेक्षा असल्याने सुरु आहे. 1995 च्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की हुंड्याबद्दल लोकांचा दृष्टीकोन बदलत असतानाही हुंडा प्रचलित आहे. 1980 च्या एका अभ्यासात, 75% विद्यार्थ्यांनी असा प्रतिसाद दिला की लग्नासाठी हुंडा महत्त्वाचा नाही, परंतु त्यांच्या पालकांपैकी 40% पालकांना हुंडा अपेक्षित आहे.

गुन्हे:-

नवविवाहित स्त्री हुंड्याशी संबंधित हिंसाचाराचे लक्ष्य असू शकते कारण ती तिच्या नवऱ्याशी आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या बांधली जाते. काही प्रकरणांमध्ये, वधूच्या कुटुंबाकडून अधिक मालमत्ता मिळविण्यासाठी हुंडा ही धमकी किंवा ओलिस प्रकारची परिस्थिती म्हणून वापरली जाते. हुंड्याचे गुन्हे धमकी किंवा हिंसाचाराने घडू शकतात, त्यामुळे वधूच्या कुटुंबाला त्यांच्या मुलीच्या संरक्षणासाठी अधिक हुंडा देण्याशिवाय पर्याय राहत नाही. भारताच्या उत्तरेकडील आणि पूर्वेकडील राज्यांमध्ये हुंडा-संबंधित हिंसाचाराचे प्रमाण जास्त आहे.



डॉ. बंजारा दिलीप लालू
महात्मा गांधी महाविद्यालय,
अहमदपूर, तालुका अहमदपूर जिल्हा
लातूर

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
परळी संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# छत्रपती शिवाजी महाराजांचे महसूल प्रशासन आणि आजचे महसूल प्रशासन

प्रो. डॉ. श्री. दिलीप बंजारा
तालुका रेनापुर जिल्हा लातूर

भारतीय प्रशासनाच्या उत्क्रांतीमध्ये मानवाच्या उत्पत्तीपासून ते आजपर्यंत राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांकडून शासनाची व प्रशासनाची चौकट स्वातंत्र्योत्तर काळात राज्यकर्त्यांना प्राप्त झाली.

त्याप्रमाणेच आजच्या समाजाच्या उंचावलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांचे सक्षमीकरण झाले. मॉरीस जोन्स म्हणतो दोन राजांच्या वारशांमधील क्रिया-प्रतिक्रियांमध्ये भारतीय शासन व प्रशासनातील अनेक समस्यांची स्पष्टीकरणे मिळू शकतात. भारतीय प्रशासनाची पोलादी चौकट निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळातील राज्यकर्त्यांनी दिलेले योगदान आपण नाकारु शकत नाही. कारण आज तागायत ही चौकट टिकाऊपणाच्या व राज्यकारभार स्थिर स्वरुपात चालवण्याच्या दृष्टीने सक्षम आहे. आधुनिक युगाच्या प्रारंभापासून परिवर्तनाची गती वाढत गेली. आज आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केलेला असताना या बदलाकडे पाहून मानवच स्तिमित होऊन जावा अशी परिस्थिती आहे.

महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासात एक गोष्ट आपल्याला लक्षात घ्यावी लागेल, विशाल, समृद्ध आणि प्रत्तापी मोगल साम्राज्याविरुद्ध सतत पंचेवीस वर्षे टक्कर देऊन शौर्य, साहस, उदारता, परधर्माविषयी संहिष्णुता, पारदर्शकता, न्याय या गुणांच्याआधारे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. भारतीय प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी या गुणांची जोपासना करणे पूर्वी होते तितकेच आजही महत्त्वपूर्ण आहे. शेती हा भारतातील बहुसंख्य जनतेच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. त्याप्रमाणेच राजेशाही शासनव्यवस्थेत सारा हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत होता. पाच हजार वर्षांपूर्वीची संस्कृती आमच्या पाठीशी उभी आहे ही जमेची पहिली बाब आहे. मानवी विचार वैभवाचे अत्युच्च शिखर अशी या संस्कृतीची मंहती राल्फ वाल्डो इमर्सन यांनी वर्णन केली आहे. इथे माणसाची गुणसूत्रे पाच हजार वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडामध्ये विकसित होत गेल्यामुळे आम्ही अनेक अवघड कौशल्य आणि प्रगल्भ बुद्धी यांचे वारसदार ठरलो आहोत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा एका लेखात आढावा घेणे म्हणजे रात्रीच्या वेळी विजेच्या एका झोतात हिमालय पाहण्यासारखे आहे. छत्रपतींनी स्वराज्य दिर्घकाळ टिकण्यासाठी उत्कृष्ट स्वरुपाची प्रशासन यंत्रणा निर्माण केली. शिवाजी महाराजांच्या महसूल प्रशासनाची वैशिष्ट्ये- सतराव्या शतकातील राजकीय स्थित्यंतराचा शेतकरी, गावकरी व व्यापारी यांच्या जीवनावर परिणाम झालेला दिसून येतो. सततच्या युद्धाचे प्रसंग, पावसाची अनिश्चितता, आर्थिकसाह्याचा अभाव, जुलमी राजवट इत्यादी मुळे अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत होते. याची जाणीव छत्रपती शिवाजी धोरण आखत असताना प्रजेला दिलासा देणारे धोरण स्वीकारले. आपल्या प्रशासनात केंद्रसत्ता प्रबळ करून, आर्थिक आणि प्रशासकीय सुधारणा घडवून आणल्या त्यामुळेच छत्रपती शिवाजींच्या महसूल प्रशासनाची खालील वैशिष्ट्ये दिसून येतात.

जमिनीची प्रत पडीक जमीन जंगले कुरण इत्यादी जमिनी गावाच्या मालकीची असतील. जेव्हा डोंगराळ व पडीजमीन लागवडीखाली प्रथम आणली जाईल तेव्हा काही वर्ष कर आकारला जात नसे. मात्र नंतर कर आकारणीत केली जाईल. जमिनीस पाण्याचा स्त्रोत - सरकारी कालव्याचे पाणी घेतले तर एका बौध्याप्त अडीच होन सारा आणि विहिरीचे पाणी वापरले असेल तर दोन होन सारा, का वर्षात किती व कोणती पिके खरीप, रब्बी आणि नगदी असे पिकांचे वर्गीकरण केले जाई. निरनिराळ्या प्रकारच्या पिकांवर निराळे दर आकारले जात असत. सकस जमिनीमध्ये जो तांदूळ पिकतो त्या प्रत्येक बीच्याला दहा मन तांदूळ तर मध्यम जमिनीसाठी आठ मन तांदूळ कर म्हणून द्यावा लागेल. एका बिध्यामागे उत्पादनाचे पाचभाग करून दोनभाग सरकारने घ्यावेत तीनभाग रयतेला द्यावे. त्यामुळे साऱ्यांचे प्रमाण हे बहुदा उत्पन्नाच्या 40% इतके होते

महसुल आकारणी प्रक्रिया: जमीन महसुलाच्या सुधारणा संदर्भात दादोजी कोंडदेव यांनी-1636, मोरोपंत पिंगळे यांनी 1649, अण्णाजी दत्तो यांनी 1678 मध्ये यांचे कार्य उल्लेखनीय आहेत. अण्णाजी दत्तो यांनी हे काम देशमुख, देशकुलकर्णी पाटील व कुलकर्णी आणि गावचे चार प्रतिष्ठित रयत यांच्याकडे दिले होते. त्यांनी एक विचाराने गावात फिरुन सारा निश्चित करावी. अण्णाजी दत्तोच्या या सारा आकारणी

पद्धतीला लोकांची धारा पद्धती असे म्हटले आहे. मलिक अंबर पद्धतीत किती उत्पन्न येत होते याची नोंद केली जात होती. त्यानंतर पीक पाहणी मध्ये गावकऱ्यांचा सहभाग आणि सारा आकारणीनंतरही त्यामध्ये बदल करण्याची व्यवस्था असल्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत नव्हता. नंतर निश्चित झालेला सारा वरिष्ठ मंत्र्यांकडे पाठविला जात असे. मंत्री त्याची योग्य ती तपासणी करण्यासाठी तीन गावांची निवड करीत असत. परत परीक्षणानंतर मंत्री आपला निर्णय देऊन सारा वसुलीस परवानगी देत. असत. सारा आकारणी प्रक्रियेत बीघावनी, पिक पाहणी आणि सारा आकारणी हे तीन महत्त्वाचे टप्पे होते. एक किस्सा मालवण दाभोळ येथे सरकारी अधिकाऱ्यांनी 53 हजार मांडावर कर आकारणी करण्याचे ठरविले. तेथील ग्रामस्थांना ही आकारणी जास्त वाटल्याने त्यांनी सरकारात तक्रार दिल्यावर, अण्णाजीने चौकशी करून ती केवळ 20 हजार मांडावर कर आकरायला सांगितले. अण्णाजी कर वसुलीच्या बाबतीत कठोर असला तरी जबरदस्तीने व अन्यायकारक कर वसुली होऊ नये यासाठी जागृत होता.

मांगटका हा कर साळी, कोष्टी, मोमीन या विणकराकडून वस्तू किंवा रोख रकमेच्या स्वरुपात गोळा केला जात असे. पायपोसी चर्मकाराकडून हा कर वसूल करावयाचा होता. स्वराज्याचा मुख्य आधार शेती व शेतकरी हे लक्षात घेऊन प्रशासनाच्या माध्यमातून निरंकुश वतनदारांचा बंदोबस्त करून, राष्ट्राच्या होतातच आपले हित सामावलेले आहे असा विश्वास रयतेच्या मनामध्ये निर्माण केला. आधुनिक खाजगी उद्योग व्यवस्थापनातील एफ.डब्ल्यू.टेलर यांनी सांगितलेला मानसिक क्रांतीचा सिद्धांत छत्रपती शिवाजी महाराजांना मो राज्याच्या व्यवस्थापनात ज्ञात होता काय अशी शंका मनात येते. मुलकी म अधिकारी जुलमी आणि भ्रष्ट असेल तर त्याचा परिणाम राज्याच्या महसुलावर आणि यंत्रणेवर होतो. म्हणून याबाबत माहाराजांनी काटेकोर नियमन केले आ होते. प्रशासकीय कारभारावर बारीक लक्ष ठेवले होते. प्रजेला होणारा उपद्रव नाहीसा करणे, प्रजेला अभय देणे आणि देशात सुव्यवस्था निर्माण करणे यावर त्यांचा कटाक्ष होता. अशाप्रकारे धनदांडग्या वतनदारांच्या भू तिडाख्यातून रयतेस मुक्त करून महाराजांनी आपल्या प्रशासनाचा पाया अधिक लोकाभिमुख केला.

स्वराज्य सुजलाम सुफलाम कसे होईल, त्याचा सु आर्थिक पाया कसा बळकट होईल, हे राज्य कसे टिकून राहील याचाही त्यांनी विबार केला होता. सर्व जनतेला कर्तव्याचा घड़ा महाराजांनी घालून दिला. प्र त्यामुळे महाराजांना जनतेने हृदयसिंहासनावर बसवले. त्यांनी विचार केला होता. सर्व जनतेला कर्तव्याचा घडा

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी..?

डॉ. बंजारा दिलीप लालू सहाय्यक प्राध्यापक
महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर.

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला. 27 सप्टेंबर 1951 रोजी कायदेमंत्री पदा-चा राजीनामा दिला त्यावेळी हिंदू कोड बिलाविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, समाजातल्या वर्गावर्गातली असमानता, स्त्री-पुरुष यांच्यातली असमानता तशीच अस्पर्शित राहू देऊन, आर्थिक समस्यांशी निगडित कायदे संमत करीत जाणे म्हणजे आमच्या संविधानाची चेष्टा करणे आणि शेणाच्या ढिगारावर राजमहाल बांधण्यासारखे होय. याचा विचार देशातील प्रत्येक नागरिकांनी करणे आवश्यक आहे. तेव्हा राज्यात असो वा देशात अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी होताना दिसून येत आहे. ही पुरुषांची मानसिकता थांबणे गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेमुळे आपल्या देशातील महिला देशाच्या राष्ट्रपती पद-ावर विराजमान जरी झाल्या तरी देशात अजूनही महिला नेतृत्वाची गळचेपी दिसतच आहे. काही ठिकाणी महिला नेतृत्व करीत असल्या तरी त्याचा कारभार नवरोबा किंवा पुरुष करीत असतात. मागील वीस ते पंचवीस वर्षांत बऱ्याच महिला गावच्या सरपंच आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष झाल्या. त्यावेळी सर्व कामे नवरोबा करायचे, एकदा नवरोबाच्या हातात फाईल दिली की काम झाले अशी चर्चा हॉटेल व बस डेपोत लोक एकत्र झाल्यावर बोलत असत. हे मी स्वतः एकले आहे. मग सांगा, महिला निर्णय कशी घेणार? तेव्हा महिलांनी सुद्धा सही बहाद्दर होऊ नये. आपण आपला हक्क मिळवावा. असे होताना अजूनही दिसत नाही. त्यामुळे याला जबाबदार कोण? याचे उत्तर आपणा सर्वांना शोधावे लागेल.तरच खऱ्या अर्थाने महिला स्वतःचा निर्णय स्वतः घेऊन सक्षम बनू शकतात.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या 18 फेब्रुवारी, 2025 च्या परिपत्रकानुसार आपल्या महाराष्ट्र राज्यात 44 राष्ट्र पुरुष थोर व्यक्ती यांची जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करण्यात येत आ हेत. त्याप्रमाणे राज्यातील विविध संस्था/मंडळे यांच्या वतीने विविध कार्यक्रमांनी जयंती महोत्सव साजरे केले जात आहे. दुःखाची बाब म्हणजे, मंडळाचे सभासद पुरुष असो वा महिला समान वर्गणी काढत आहेत. त्याच प्रमाणे काही मंडळी स्वतःहून मंडळाला आर्थिक मदत करीत असतात. अगदी कार्यक्रम ठरवल्यापासून कार्यक्रम होईपर्यंत महिला पदाधिकारी व सभासद उत्साहाने काम करतात.

मात्र कार्यक्रमाच्या दिवशी महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची नावे व त्यांचे फोटो मंडळाच्या बॅनरवर दिसत नाही. मग खरच महिलांचे सक्षमीकरण होणार का? महिला मंडळ नोंदणीकृत असून सुद्धा पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिलांची नावे व फोटो बॅनरवर दिसत नसतील, तर महिला मंडळ असून नसल्या सारखी आहेत. तेव्हा असे

किती दिवस चालणार आहे. त्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले होणे आवश्यक आहे. त्यांच्या तत्त्वांचे पालन करावे ला-गेल. त्यासाठी महिलांनी एकत्रित येऊन पुरुषांना धडा शिकविला पाहिजे. तरच महिलांना सन्मानि मळेल. सन 2025 मध्ये सुद्धा पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यात अशी परिस्थिती पाहायला मिळते, हीच खरी शोकांतिका आहे. म्हणजे अजूनही महिला स्वतंत्र झालेली दिसत नाही हे दुर्दैवाने लिहावेसे वाटते. तेव्हा महिलांनी एकत्र येऊन आपल्या स्वातंत्र्यावर गदा येणार नाही यासाठी लढा दिला पाहिजे. कारण आपण सावित्रीबाईंच्या लेकी आ-होत. आम्ही आता रडणार नाही तर लढणार आहोत.बाबासाहेबांनी आम्हांला आमचे न्याय हक्क मिळवून दिले आहेत. त्यामुळे आपल्या देशातील महिला देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत जाऊन पोहोचली आहे. मंडळांच्या घटनेमध्ये मंडळाचे स्वतंत्र महिला मंडळ असावे असे असताना जर महिलांची नावे मंडळाच्या बोर्डवर छापली गेली नसतील, तर अशा विरोधात आ-वाज उठविला पाहिजे. कारण भारतीय राज्यघटनेने देशातील प्रत्येक महिलेला मूलभूत अधिकार दिले आहेत. इतकेच नव्हे तर मंडळाच्या बैठकीच्या वेळी सुद्धा महिला पदाधिकारी यांना विचार पीठावर बसविले जात नाही. त्यांचा सन्मान केला, तर केला नाही. आणि असे जर होत असेल तर स्त्री पुरुष समानता राहिली कुठे हे या लेखात मला खूपच खेदपूर्वक सांगावेसे वाटते



परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# समाधानी पिढी आता आपल्याला सोडून जातेय....!



येत्या दहा-पंधरा वर्षांमधे एक आधीची पिढी हे जग सोडणार आहे. कटू असलं तरी हे सत्य आहे, कारण हे जग कोणी थांबवू शकत नाही. या पिढीतले लोकं थोडे वेगळेच आहेत !

सकाळी लवकर उठणारे, रात्री वेळेवर झोपणारे, पाणी वाया न घालवता झाडाला घालणारे, फुलं देवासाठी तोडणारे, रोज पूजा करणारे, मंदिरात एखादी फेरी मारणारे, रस्त्यातून भेटणाऱ्याची आस्थेने चौकशी करणारे, दोन्ही हात छातीशी नेऊन नमस्कार करणारे, अन्न धान्य वाया जाऊ नये म्हणून बेतानेच स्वयंपाक करणारे; आणि तरीही उरलं तर गरीबाला देणारे किंवा दुसऱ्या दिवशी त्याला नटवून मिटक्या मारत खाणारे ! पाहुणे-रावळ्यांची स्वतःची गैरसोय असूनही पाहुणचार करणारे, आपापले सण धांगडधिंगा न करता साधेपणाने साजरे करणारे, व्यसन करताना लाजणारे आणि समाजाच्या नजरेची भीड बाळगणारे, जुना झालेला चष्मा तुटला तर चिकटवून, जुनी चप्पल फाटली तर शिवून आणि जुना बनियन गलितगात्र होईपर्यंत वापरणारे, उन्हाळ्यात पापड वाळवणारे, हात दुखेपर्यंत - कुटून मसाला घरी बनवणारे, फक्त बाहेर घालायच्या कपड्यांनाच इस्त्री करणारे, खिशातला पैसा जपून वापरणारे आणि शक्यतो घरीच जेवणारे !

प्रा. डॉ. चव्हाण दिलीप लालू
रा. रुपचंद नगर ता. रेनापुर
जी. लातूर- *9881090588

असे लोकं आता हळूहळू हे जग सोडून चालले आहेत ! ते जातील तेव्हा एक महत्वाची शिकवण त्यांचेबरोबरच जाईल !

समाधानी, साधे, अर्थपूर्ण, दुसऱ्यांना प्रेरणा देणारं आणि समोरच्याची काळजी करणारं जीवन जगायचं असतं ही शिकवण ह्या जगातून कायमचीच नाहीशी होईल ! नेतृत्व कर्तृत्व व स्वाभिमान ही त्याच्या बरोबर च संपेल की काय ?

त्यानंतर राहील फक्त स्वार्थ, अविश्वास, चैन, वखवख, असंवेदनशील मनं, भकास कोडगेपणा आणि मोबाईलवरचे कृत्रिम अगत्य; अन् सारं आभासी तथाकथित जीवन !

कटू आहे पण हेच सत्य आहे !



## महाराष्ट्रातील सरकार : शेतकऱ्यांच्या आशा आणि वास्तव

महाराष्ट्रात 2022 मध्ये महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने आणि प्रत्यक्षात झालेली कामगिरी यांच्यातील तफावत स्पष्ट दिसते. विधानसभा निवडणुकीत रोजगार हमी योजना, कर्जमाफी, भावांतर योजना, सौर पंप योजना आणि सम्मान निधी वाढ यासारख्या मोठ्या घोषणा केल्या गेल्या. मात्र, 2023 ते 2025 या कालावधीत या योजनांच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणात त्रुटी दिसून आल्या. यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असून, सरकारच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या लेखात थकलेल्या देण्यांचा आकडेवारीसह सविस्तर आढावा घेतला आहे.

*1. रोजगार हमी योजनेची थकबाकी: शेतकऱ्यांचा विश्वासघात*

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) ही ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारद्वारे राबवली जाते. महाराष्ट्रात लाखो शेतकरी आणि ग्रामीण मजूर या योजनेवर अवलंबून आहेत. मात्र, 2023 ते 2025 या कालावधीत मजुरीच्या थकबाकीमुळे अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली आहेत.

आकडेवारी:2023-24 मध्ये महाराष्ट्रात MGNREGA अंतर्गत सुमारे 1.2 कोटी कामगारांनी नोंदणी केली होती. यापैकी अंदाजे 70 लाख कामगारांना मजुरीची थकबाकी आहे.2024-25 च्या आर्थिक वर्षात थकबाकीची रक्कम 2,500 कोटी रुपये इतकी आहे. यामुळे शेतकरी आणि मजुरांना मूलभूत गरजा पूर्ण करणेही कठीण झाले

*विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात मजुरीची थकबाकी सर्वाधिक आहे.*

जिथे प्रत्येक कुटुंबाला सरासरी 10,000 ते 15,000 रुपये थकले आहेत.परिणाम:केंद्र आणि राज्य सरकारमधील निधीवाटपावरील भांडणे याला कारणीभूत ठरली. केंद्राने निधी कमी दिल्याचा आरोप राज्य सरकार करत आहे, तर केंद्राने राज्यातील भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापनावर बोट ठेवले आहे.मजुरीविना कुटुंबांचे जीवनमान खालावले, आणि अनेकांना खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागले.

*2. कर्जमाफी: आश्वासनांचा फसवा खेळ*

महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची मोठी घोषणा केली होती. मात्र, 2023 पासून कर्जमाफीचा कोणताही ठोस प्रस्ताव समोर आलेला नाही. याउलट, बँकांकडून शेतकऱ्यांवर कर्जवसुलीसाठी दबाव वाढला आहे.

आकडेवारी:महाराष्ट्रात सुमारे 35 लाख शेतकऱ्यांकडे बँकांचे 1.5 लाख कोटी रुपये कर्ज थकबाकी आहे (2024 पर्यंत).2019 मध्ये तत्कालीन सरकारने "महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना" अंतर्गत 2 लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केली होती, जी अंशत: लागू झाली. मात्र, महायुती सरकारने यापुढे कोणतीही नवीन योजना आणलेली नाही.2023-25 मध्ये कर्जमाफीच्या नावाने केवळ 500 कोटी रुपये निधी वाटप झाला, जो अपुरा आहे.

परिणाम:कर्जमाफीच्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी नवीन कर्ज घेतले, पण माफी न मिळाल्याने त्यांच्यावर दुहेरी कर्जाचा बोजा पडला.बँकांनी जमिनी जप्त करण्याच्या नोटिसा पाठवल्या, ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला.

*3. भावांतर योजना: कागदावरच राहिली*

शेतकऱ्यांच्या पिकांना योग्य भाव मिळावा यासाठी भावांतर योजनेची घोषणा झाली होती. या योजनेत बाजारभाव आणि हमीभाव यातील फरक सरकार शेतकऱ्यांना देणार होते. मात्र, ही योजना प्रभावीपणे राबवली गेली नाही.

आकडेवारी:2023-24 मध्ये भावांतर योजनेसाठी 1,000 कोटी रुपये निधी मंजूर झाला, पण केवळ 20% निधी (200 कोटी रुपये) वितरित झाला.

कापूस, सोयाबीन आणि तूर यासारख्या प्रमुख पिकांसाठी भावांतर योजनेचा लाभ फक्त 5 लाख शेतकऱ्यांनाच मिळाला, जिथे 30 लाख शेतकरी अपेक्षित होते.

बाजारभाव हमीभावापेक्षा 20-30% कमी असल्याने शेतकऱ्यांचे सरासरी 15,000 रुपये प्रति हेक्टर नुकसान झाले.

परिणाम:अपुऱ्या निधीमुळे शेतकऱ्यांना बाजारात कमी भावाने पिके विकावी लागली.योजनेची अंमलबजावणी पारदर्शक नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला.

*4. सौर पंप योजना: शेतकऱ्यांची फसवणूक*

मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना आणि कुसुम सौर पंप योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सौर पंप देण्याचे आश्वासन देण्यात आले.

या योजनांमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी विजेच्या समस्येवर मात करता येणार होती. मात्र, योजनेची अंमलबजावणी अत्यंत संथ आणि अपुरी राहिली आकडेवारी:2023-25 मध्ये सौर पंप योजनेसाठी 10 लाख शेतकऱ्यांनी अर्ज केले, पण केवळ 1.5 लाख शेतकऱ्यांना पंप वितरित झाले.शेतकऱ्यांनी त्यांचा हिस्सा (10-20% रक्कम) म्हणून सरासरी 15,000 ते 25,000 रुपये भरले, पण पंप बसवले गेले नाहीत. यामुळे 2,000 कोटी रुपये शेतकऱ्यांचे पैसे अडकले.महावितरणने तांत्रिक कारणे आणि पुरवठादारांशी वाद यामुळे विलंब झाल्याचे सांगितले.

सौर पंपाची हमी 5 वर्षे आणि सोलर मॉड्यूल्सची वॉरंटी 10 वर्षे असतानाही, बसवलेल्या पंपांपैकी 25% पंप तांत्रिक बिघाडामुळे बंद पडले.परिणाम:सौर पंप न मिळाल्याने शेतकरी डिझेल पंपांवर अवलंबून राहत आहेत, ज्यामुळे खर्च वाढला (प्रति हेक्टर 20,000 रुपये अधिक). शेतकऱ्यांनी हिस्सा भरूनही पंप न मिळाल्याने सरकारवरील विश्वास कमी झाला.खाजगी कर्ज आणि बँक कर्जांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले.

5. सम्मान निधी वाढ: केवळ घोषणाचप्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वार्षिक 6,000 रुपये मिळत होते. महायुती सरकारने "नमो शेतकरी महासम्मान निधी" योजनेतून ही रक्कम 15,000 रुपये करणार असल्याचे जाहीर केले. मात्र, ही वाढ अद्याप लागू झालेली नाही.

*आकडेवारी:*

महाराष्ट्रात 78 लाख शेतकरी PM-KISAN योजनेचे लाभार्थी आहेत. नमो योजनेच्या वाढीमुळे त्यांना अतिरिक्त 6,000 रुपये मिळणे अपेक्षित होते.2024-25 मध्ये नमो योजनेअंतर्गत केवळ 1,000 कोटी रुपये वितरित झाले, जे 50 लाख शेतकऱ्यांनाही पुरेसे नाही.नोंदणीतील त्रुटींमुळे 10 लाख शेतकऱ्यांना अद्याप PM-KISAN चाही लाभ मिळत नाही.

परिणाम:शेतकऱ्यांनी वाढीव निधीच्या अपेक्षेने खर्चाचे नियोजन केले, पण निधी न मिळाल्याने आर्थिक अडचणी वाढल्या.योजनेची अंमलबजावणी पारदर्शी नसल्याने शेतकऱ्यांमध्ये गोंधळ आहे.

एकूण परिणाम आणि शेतकऱ्यांचे संकट,

| योजना | थकबाकी/नुकसान (कोटी रुपये) | प्रभावित शेतकरी (लाख) |
|---|---|---|
| रोजगार हमी | 2,500 | 35 |
| कर्जमाफी | 0 (निधी नाही) | 35 |
| भावांतर योजना | 800 | 25 |
| सौर पंप योजना | 2,000 | 8.5 |
| नमो सम्मान निधी | 4,500 | 50 |

*आर्थिक संकट:*

शेतकऱ्यांवर खाजगी सावकार आणि बँकांचे कर्ज वाढले. सरासरी प्रत्येक शेतकरी कुटुंबावर 1-2 लाख रुपये कर्ज आहे.

*आत्महत्या:*

विदर्भ आणि मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये 2023-25 मध्ये 15% वाढ झाली, ज्यामध्ये कर्ज आणि थकबाकी मुख्य कारणे आहेत.

*सरकारवरील असंतोष:*

शेतकऱ्यांमध्ये सरकारविरोधी भावना वाढली असून, ग्रामीण भागात आंदोलने तीव्र झाली आहेत.

*निष्कर्ष आणि उपायमहायुती सरकारने शेतकऱ्यांना दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात सपशेल अपयश दाखवले आहे. रोजगार हमीची थकबाकी, कर्जमाफीचा अभाव, भावांतर योजनेची अपुरी अंमलबजावणी आणि सौर पंप योजनेची फसवणूक यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक आणि मानसिक संकटात आहे.

सरकारने खालील उपाय करावेत:

*तातडीने थकबाकी द्यावी:*

रोजगार हमी आणि सौर पंप योजनेची थकबाकी त्वरित द्यावी.

*कर्जमाफी लागू करावी:* 3 लाखांपर्यंत कर्जमाफी लागू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

*सौर पंप योजनेची चौकशी:*

सौर पंप वितरणातील गैरव्यवहाराची चौकशी करून जबाबदारांना शिक्षा द्यावी.

*पारदर्शक अंमलबजावणी:*

योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता आणावी आणि शेतकऱ्यांना माहिती द्यावी.महाराष्ट्रातील शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणे म्हणजे राज्याच्या प्रगतीला खीळ घालणे आहे.सरकारने आता तरी जागे होऊन शेतकऱ्यांच्या हिताचे ठोस पाऊल उचलावे. अन्यथा, "म्हशी वळण्याचा" हा आरोप खरा ठरेल.



**डॉ बंजारा दिलीप लालू**
**महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर**

# भुषण भारता: बेकारीची समस्या???...

## (24 जून: बेकारी- बेरोजगारी विशेष.)

_भारतात सन 1980 ते सन 1995 या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. सन 2024च्या निवडणूकीनंतर रोजगार उपलब्ध करून दिले जातील अशी युवकांना व जनतेला अपेक्षा होती, मात्र सारे स्वप्न धुळीस मिळाले. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत. सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरु आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगलात नेऊन चारण्याचे काम करु लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अर्जाची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.900 ते 1000 एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज 100 रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर फेकली, अशी बिकट परिस्थिती. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अज्ञान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल? बेकारीची समस्या मांडणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा हा लेख.. संपादक._

बेकार म्हणजे ज्याला काम मिळालेले नाही असा व्यक्ती होय, बेकारीचा अभ्यास करताना दोन बाबी आधी स्पष्ट झाल्या पाहिजेत, पहिली म्हणजे बेकारीची व्याख्या कार्यकारी लोकसंख्येपर्यंतच मर्यादीत ठेवावी लागते, लोकसंख्येतील 0 ते 14 वयोगट व ज्येष्ठ नागरिक इ. घटक वजा केल्यावर जी उरते ती कार्यकारी लोकसंख्या होय. बेकारी म्हणजे अशी स्थिती होय, की जेथे व्यक्ती प्रचलित मजुरीच्या दरावर काम करायला तयार असतो, परंतु त्याला काम मिळत नसते. बेरोजगारीमुळे देशातील मानवी साधनसंपत्तीचा अपव्यय होतो. बेरोजगारीमुळे देशासमोरील अनेक समस्यांमध्ये वाढ होते. बेकारीमुळे देशातील सकल राष्ट्रीय उत्पन्न कमी राहते आणि समाज हा गरीब व मागासलेला राहतो. बेकारीमुळे देशाच्या अर्थव्यस्थेच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो.

बेकारीची संकल्पना: (1) अनैच्छिक बेकारी- या बेकारीला दृश्य किंवा उघड बेकारी असेही म्हणतात. ही बेकारी म्हणजे अशी एक अवस्था की लोकांची काम करण्याची पात्रता असते आणि काम करायला तयार असतात, परंतु त्यांना काम प्राप्त होत नाही. ही स्थिती श्रमांचा अतिरिक्त पुरवठा व त्या तुलनेत श्रमिकांची कमी मागणी यातून निर्माण होते. यामध्ये माणसांची मनस्थिती नसतानाही असेल ते कामे करावी लागतात तेही विनामोबदला किंवा कमी मोबदला; त्यामुळे त्यांचे हक्कांचे उच्चाटन होत असलेले दिसून येते. तसेच कमी मिळालेल्या मोबदल्याने त्यांच्या परिवारातील आर्थिक अडचणी पूर्ण होत नसल्याने बेकारीचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. (2) ऐच्छिक बेकारी- हा बेकारीचा असा प्रकार आहे की जेथे व्यक्ती काम करण्यासाठी पात्र असते पण तिची काम करण्याची इच्छा नसते. खऱ्या अर्थाने ही बेकारीची स्थिती नसून निष्क्रियतेची स्थिती आहे. (3) न्यून किंवा अर्धबेकारी- ही एक अशी स्थिती होय, की जेथे व्यक्तीची काम करण्याची क्षमता पूर्णपणे वापरली जात नाही, किंवा तिला कनिष्ठ पातळीवर काम करावे लागते. उदा. 1. पदव्युत्तर शिक्षित व्यक्तीने पहारेकऱ्याची नोकरी करणे. 2.इंजिनिअर व्यक्तीने शिपायाची नोकरी करणे. (4) पूर्ण बेरोजगारी- व्यक्तिकडे पात्रता, कौशल्य, इच्छाशक्ती, असूनही कोणत्याच ठिकाणी काम प्राप्त होत नाही. याला पूर्ण बेरोजगारी म्हणतात

बेकारीचे प्रकार: 1. ग्रामीण बेकारी- ही बेकारी प्रामुख्याने ग्रामीण भागात दिसून येते. ही एक गंभीर स्वरूपाची समस्या आहे. यामध्ये खालील प्रकार येतात. अ) हंगामी बेकारी- भारतात बहुतेक शेतकरी लागवडी साठी पावसावर अवलंबून असतात, त्यामुळे वर्षातून एकदाच पीक घेता येते. यामुळे ग्रामीण शेतमजुरांना केवळ 4 ते 5 महिनेच काम प्राप्त होते व उर्वरित काळ ते बेकार राहतात. म्हणून या प्रकाराला हंगामी बेकारी म्हणतात. ही बेकारी शहरी भागात सुद्धा आढळते. उदा. पर्यटन क्षेत्रातील मार्गदर्शक, लग्नसमारंभातील वादक इत्यादी. ब) प्रच्छन्न बेकारी (छुपी): अति लोकसंख्येच्या अविकसित आणि विकसनशील देशांमध्ये प्रच्छन्न बेकारी ही एक मूलभूत स्वरूपाची समस्या आहे. या प्रकारच्या बेकारीत ज्या ठिकाणी काम करण्यासाठी कमी लोकांची गरज आहे, तिथे गरजेपेक्षा जास्त लोक काम करतात, तेव्हा अतिरिक्त श्रमिकांची सीमान्त उत्पादकता शून्य राहते. म्हणजेच अतिरिक्त लोक उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही व छुपी बेकारी निर्माण होते. उदा. एका कारखान्यात उत्पादन प्रक्रियेसाठी केवळ 20 कामगारांची गरज असताना तेथे 25 कामगारांनी काम करणे. येथे अतिरिक्त 5 कामगार हे छुपे बेकार ठरतील व ते उत्पादनात कोणतीही भर टाकत नाही. अशा अतिरिक्त कामगारांनी उत्पन्नाचे मूल्य विनाकारण वाढते. क) शहरी बेकारी: जी बेकारी शहरी भागांमध्ये आढळून येते तिला शहरी बेकारी म्हणतात. याचे खालील प्रकार आहेत. सुशिक्षित बेकारी- ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले आहे आणि त्याची काम करण्याची इच्छा व पात्रता असूनही काम मिळत नसेल, अशा स्थितीला सुशिक्षित बेकारी असे म्हणतात. ही बेकारी दहावी, बारावी पास झालेले, पदवीपूर्व, पदवीधर, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले या लोकांमध्ये आढळून येते. नोकरीयोग्य शिक्षणासाठी जास्त पैसे मोजावे लागतात. अनेकांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व उच्च शिक्षणासाठी आकारण्यात येणाऱ्या भरमसाठ शुल्कामुळे योग्य शिक्षण घेणे शक्य होत नाही. म्हणूनही बेकारी वाढते. शिक्षण घेणारे दिवसेंदिवस वाढत असले तरी त्यांच्या शिक्षणासारखे त्यांना काम मिळत नाही. उच्च पदवी घेऊन देशील आज लाखो सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढले आहे. सरकार कोणतेही असो पण त्या सुशिक्षितांना त्यांच्या पदवी अनुसार काम मिळाले पाहिजे, नाहीतर ही बेकारी भविष्यात खूप वाढेल व त्यांना पाहून येणारी पुढची पिढी ही शिक्षणापासून वंचित राहील, असा विचारही दिसून येतो. तांत्रिक बेकारी- उत्पादनाच्या तंत्रात बदल झाल्याने जी बेकारी निर्माण होते, त्या बेकारीला तांत्रिक बेकारी असे म्हणतात. शहरी भागात कारखानदार श्रमिकांऐवजी यंत्रांना जास्त प्राधान्य देतात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरुन उत्पादन करणे, यामुळे श्रमिकांना कामावरुन कमी केले जाते. त्यामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते. घर्षणात्मक बेकारी (संघर्षात्मक बेकारी )- या प्रकारच्या बेकारीमध्ये आर्थिक संघर्षामुळे श्रमिकांना तात्पुरत्या स्वरुपात बेकार व्हावे लागते. यंत्रातील बिघाड, कच्च्या मालाची टंचाई, वीज कपात इ. मुळे श्रमिकांना कामावरुन कमी केले जाते. अशा स्थितीत श्रमिकांना एक काम सोडल्यापासून दुसरे काम स्वीकारेपर्यंत बेकार राहावे लागते, म्हणून त्याला घर्षणात्मक बेकारी म्हणतात. कारण या बेकारीच्या मधल्या काळात त्यांनी परिस्थितीशी संघर्ष केलेला असतो. ड) चक्रीय बेकारी- तेजीच्या अवस्थेनंतर येणाऱ्या मंदीच्या अवस्थेत प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला चक्रीय बेकारी म्हणतात. हा बेकारीचा प्रकार व्यापार चक्रामुळे निर्माण होतो. मंदीच्या काळात प्रभावी मागणीच्या कमतरतेमुळे आर्थिक क्रिया मंदावतात त्यामुळे उद्योगांचे मालक उत्पादन कमी करतात. परिणामी कामगारांना कामावरुन कमी केले जाते. उदा. 2008च्या मंदीमुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात अशाच प्रकारची चक्रीय बेकारी निर्माण झाली होती. ई) संरचनात्मक बेकारी- जेव्हा अर्थव्यवस्थेत संरचनात्मक व तंत्रज्ञानात्मक बदल होतात तेव्हा ही बेकारी निर्माण होते. जेव्हा मागासलेल्या व परंपरागत अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होऊन ती आधुनिक व विकसित होत जाते तेव्हा मागणीमध्ये मूलभूत स्वरुपाचे बदल होतात. त्यातून संरचनात्मक बेकारी निर्माण होते. ही बेकारी एक दीर्घकालीन घटना होय. उदा. ऑटो रिक्षांमुळे शहरातील घोडागाडी कालबाह्य झाली म्हणजेच त्यांना संरचनात्मक बेकारी सहन करावी लागली.

भारतातील बेकारीची परिस्थिती (सद्यस्थिती): भारतात ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर कामगारांना इच्छेविरुद्ध बेकार राहावे लागते, हे निर्विवाद सत्य आहे. नेमके किती लोक बेकार आहेत, त्याचा अंदाज घेणे कठीण आहे. नियोजन मंडळ, जनगणनेचा अहवाल, तसेच मध्यवर्ती सांख्यिकी संस्था यांना या बाबतीत अचूक माहिती नाही. या बाबतीत काही अंदाज पुढीलप्रमाणे देता येतील- शहरी व ग्रामीण भागातील बेरोजगारी-

बेकारीची कारणे: 1.लोकसंख्या वाढीची जास्त गती- स्वातंत्र्यानंतर भारताची लोकसंख्या वेगाने वाढू लागली. त्यामुळे श्रमशक्ती वाढत गेली. अपुऱ्या आर्थिक विकासामुळे या अतिरिक्त श्रमशक्तीला द्वितीय व तृतीय क्षेत्रात सामावून घेता आले नाही. त्यामुळेच बेकारी वेगाने वाढत गेली. शेती मशागतीचे मागास स्वरुप- अज्ञान व निरक्षरतेमुळे भारतातील शेतकरी शेतीमध्ये परंपरागत पद्धतीचा वापर करतात. त्यामुळे भूमीची उत्पादकता कमी राहते आणि रोजगार वाढत नाही. सरकारी नोकर भरती बंद- यामुळे सुशिक्षित बेरोजगारी शिगेला गेली. सरकारच्या नोकर कपात मोहिमेद्वारे सुद्धा बेकारीत अवाढव्य वृद्धी होते, परिणामत: बेकारी वाढते.

भारतात सन 1980 ते सन 1995 या काळात मोठ्या प्रमाणात बेकारी होती. परंतु मुक्त अर्थव्यवस्थेमुळे देशातला रोजगार निर्मितीचा प्रश्न बऱ्याच अंशी कमी झाला होता. मात्र सांप्रतकाळी तर त्याहून चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे. जुन्या नोकरदारांना दोन-दोन, तीन-तीन अतिरिक्त प्रभार सांभाळताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तरीही नोकर भरतीला ब्रेक लावलेले आहेत. सुशिक्षित बेरोजगार मिळेल ते काम करत आहेत. फक्त पोलिस भरती सुरु आहे. त्यात वकीली, डॉक्टरेट, अभियंता, अशा पदव्या मिळविलेले तरुण उतरत आहेत, थोडा थोडका जमिन तुकडा विकून उच्च शिक्षण घेतलेले तरुण हॉटेलमध्ये कपबश्या विसळण्याचे कामसुद्धा शोधत आहेत. गावातील गुरे, शेळ्या जंगलात नेऊन चारण्याचे काम करु लागले आहेत. सरकारी नोकरीच्या चार-पाच जागेसाठी लाखो तरुणांचे अर्ज जमत आहेत. त्यामुळे छुपी वशिलेबाजी फोफावत आहे. त्यातल्या त्यात अर्जाची शुल्कही गरीबांना आणखी खोल डोहात ढकलणारी असते. रु.900 ते 1000 एवढी मोठी रक्कम जमा करण्यात त्यांचे बरेच दिवस खर्ची पडलेले असतात. कारण कोठेही त्यांना दररोज 100 रुपयांची मोलमजुरी करावी लागत आहे. आज सन 2024नंतरही विज्ञानयुगात गडचिरोली सारख्या अतिदुर्गम जिल्ह्यात जल सिंचनाच्या सोयी नाहीत, त्यामुळे शेतकरी केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने शेती पिकली तर पिकली नाहीतर नासली, अशी बिकट परिस्थिती आवासून आहे. उद्योगधंदे, कारखाने, प्रकल्प आदी काहीच नाहीत. त्यामुळे रोजी, मजुरीचीही वाणवाच आहे. सामान्य जनता अज्ञान दशेत आहे, जेथील युवकवर्ग सुशिक्षित बेकार- बेरोजगार आहे, तो देश विकसनशील देश आहे, असे कसे काय म्हणता येईल?

!! बेकारी- बेरोजगारी सहन करण्यास भाग पाडणाऱ्या संवेदनशून्य सरकारचा जाहीर निषेध !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**रामनगर वॉर्ड नं. 20, गडचिरोली.**
**जि. गडचिरोली, फक्त व्हॉट्स ॲप- 9423714883.**

# महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेची गंभीर परिस्थिती: जागतिक घोषवाक्यांच्या पार्श्वभूमीवर चिंतन

**डॉ. भारत कऱ्हाड**

महाराष्ट्र हे देशातील प्रगत राज्य मानले जाते. शिक्षण, उद्योग, पर्यावरण, आरोग्य या सर्व क्षेत्रांत राज्याने मोठी प्रगती केली आहे, असे आपण म्हणतो. मात्र प्रत्यक्षात, महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची सध्याची परिस्थिती चिंताजनक आहे, हे नियंत्रक व महालेखापाल (CAG) च्या अलीकडील अहवालातून स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, 2025 साली जागतिक आरोग्य दिन आणि जागतिक योग दिन या दोन्ही महत्त्वाच्या दिवसांचे घोषवाक्य आरोग्याच्या व्यापक परिप्रेक्ष्याकडे निर्देश करत असताना, महाराष्ट्र मात्र या मूलभूत गोष्टींकडे गंभीरतेने पाहत नाही, हे खेदजनक आहे. यावर्षी जागतिक आरोग्य दिनाचे घोषवाक्य होते "Healthy Beginnings, Hopeful Futures" - म्हणजेच 'सुदृढ सुरुवात म्हणजे आशादायी भविष्य'. आरोग्याची पायाभूत गुंतवणूक गर्भधारणेपासून बालकांच्या सुरुवातीच्या वाढीपर्यंत केली गेली पाहिजे, हे या घोषवाक्यातून ठळक होते. आरोग्याची चांगली सुरुवात हीच भविष्यातील स्वास्थ्याचा पाया असते. पण CAG च्या अहवालानुसार, महाराष्ट्राच्या ग्रामीण तसेच शहरी भागातील आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर, नर्सेस आणि पॅरामेडिकल स्टाफची मोठी कमतरता आहे. प्राथमिक आणि माध्यमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टरांची 22%, नर्सेसची 35% आणि पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची 29% पदे रिक्त आहेत. विशेष म्हणजे, महिलांसाठी असलेल्या आरोग्य केंद्रांमध्ये देखील डॉक्टरांची 23%, नर्सेसची 19% आणि पॅरामेडिकल स्टाफची 16% पदे भरली गेलेली नाहीत. तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता तर 42% पर्यंत पोहोचली आहे.

ही केवळ आकडेवारी नाही; ही महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या आरोग्य हक्कावर होणारी गतीशून्य गदा आहे. जर डॉक्टरच उपलब्ध नसतील, तर गरोदर महिला, नवजात बालके, वृद्ध, तसेच इतर रुग्णांना वेळेवर व दर्जेदार सेवा मिळणे शक्यच नाही. याचे गंभीर परिणाम संपूर्ण समाजावर होतात. 'सुदृढ सुरुवात' ही आरोग्य सेवेची गती, उपलब्धता आणि गुणवत्ता यावर अवलंबून असते, आणि महाराष्ट्र या बाबतीत मागे पडत आहे, हे CAG च्या निरीक्षणांमधून स्पष्ट होते.या संदर्भात 2025 साली साजऱ्या झालेल्या जागतिक योग दिनाचे घोषवाक्य "Yoga for One Earth, One Health" देखील अत्यंत महत्त्वाचे ठरते. या घोषवाक्यात 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही संकल्पना मांडण्यात आली आहे. म्हणजेच, व्यक्ती, समाज आणि पर्यावरण या तिघांचे आरोग्य एकमेकांशी अविभाज्य आहे. केवळ वैयक्तिक योगाभ्यास करून आरोग्य टिकवणे पुरेसे नाही, तर संपूर्ण समाजाला आणि निसर्गाला आरोग्यपूर्ण ठेवण्यासाठी व्यापक प्रयत्न आवश्यक आहेत. परंतु CAG च्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेमध्ये पुरेशी पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळ नसल्यामुळे 'एक आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारताना मोठी अडचण येते.

आरोग्य ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही, ती शासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. योग दिनाच्या घोषवाक्याचा खरा अर्थ असा की, आपले आरोग्य पर्यावरणाशी जोडलेले आहे. जर आपण आरोग्य सेवा दुर्लक्षित करतो, तर पर्यावरणीय आरोग्य, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक आरोग्य सर्वच संकटात सापडते. महाराष्ट्रातील रुग्णालयांमध्ये डॉक्टर नसणे, नर्सेस आणि तज्ज्ञांची अनुपलब्धता ही समस्या केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित राहत नाही, तर ती समाजाच्या संपूर्ण आरोग्य व्यवस्थेला प्रभावित करते.

आरोग्य व्यवस्थेतील ही दुर्दशा पाहता, जागतिक आरोग्य दिन आणि योग दिनाच्या घोषवाक्यांमध्ये असलेला व्यापक संदेश आपण अंगिकारण्याची खरी वेळ आली आहे. सुदृढ सुरुवात ही फक्त बालकांपुरती मर्यादित नाही, ती गर्भधारणेपासून वृद्धावस्थेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर आवश्यक आहे. आणि 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही कल्पना फक्त योगाभ्यासापुरती मर्यादित नसून, ती आरोग्य सेवा, आरोग्य धोरणे, पर्यावरणाची काळजी, स्वच्छता यांचा एकत्रित विचार आहे.

महाराष्ट्र सरकारने या संदर्भात त्वरित पावले उचलणे अत्यंत गरजेचे आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये तातडीने रिक्त पदे भरणे, ग्रामीण आणि दुर्गम भागात आरोग्य सेवा पोहोचवणे, महिलांसाठी स्वतंत्र आणि सुसज्ज आरोग्य केंद्रांची उभारणी करणे, आणि आरोग्य शिक्षण, जनजागृती यावर भर देणे ही काळाची गरज आहे.

योग दिनाच्या माध्यमातून आपण स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देतो, पण जर सार्वजनिक आरोग्य यंत्रणा सक्षम नसेल तर व्यक्तीला एकटा आरोग्य राखणे कठीण होते. म्हणूनच, महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था सुधारण्याची जबाबदारी सरकारची आहे. शासनाने आरोग्य धोरणात दीर्घकालीन दृष्टी ठेवावी आणि आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून सामाजिक आणि राष्ट्रीय प्राधान्य आहे, हे मान्य करावे.CAG चा अहवाल महाराष्ट्रासाठी केवळ एक लेखापरीक्षण नाही, तर तो चेतावणी आहे. जागतिक स्तरावर आरोग्याच्या ज्या व्यापक कल्पना मांडल्या जात आहेत, त्या प्रत्यक्षात आपल्या राज्यात कशा अंमलात येतील, याचा विचार महाराष्ट्र सरकारने तातडीने करणे आवश्यक आहे.सुदृढ सुरुवात, आरोग्यदायी जीवनशैली आणि संपूर्ण समाजाचे आरोग्य एकत्रितपणे सुधारण्याचे काम सुरु केले, तरच 'Healthy Beginnings, Hopeful Futures' आणि 'Yoga for One Earth, One Health' ही जागतिक घोषवाक्ये केवळ शब्दांमध्ये न राहता महाराष्ट्राच्या जमिनीवर खऱ्या अर्थाने साकार होतील.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी .**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

# बंजारा समाज - एसटी आरक्षणाची भूमिका.


जरांगे पाटील साहेब यांच्या अतोनात प्रयत्नानंतर हैदराबाद गॅजेटच्या आधारावर महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला नोंदी तपासून कुणबी जातीचा दाखला द्यावा असं प्रस्ताव दिल्यामुळे त्या गॅझेटमध्ये एसटी प्रवर्गात असणाऱ्या बंजारा समाजाच्या देखील आशा पल्लवीत झाल्या आहेत. आदरणीय मनोज जरांगे पाटील दादांचे कोटी कोटी आभार . मराठा समाजाच्या पाठोपाठ बंजारा समाजालाही न्याय मिळेल अशा भूमिकेत आज बंजारा समाज राज्यभर सरकार दरबारी निवेदने, निदर्शने , आंदोलने, उपोषणे व महामोर्चे आयोजित करीत आहे. निजाम काळातील हैदराबाद गॅझेट मध्ये बंजारा , लंबाडा, सुगाळी समाजाचा एसटी म्हणून उल्लेख आधीपासूनच आहे यात काही दुमत नाही. परंतु 1956 मधील राज्य पुनर्रचना कायद्यानुसार हैदराबाद मधील आदिलाबाद या जिल्ह्यातून किनवट हा तालुका नांदेड जिल्ह्याला व राजुरा हा तालुका चंद्रपूर जिल्ह्याला जोडल्या गेला. किनवट व राजुरा जिल्ह्यातील सगेसोयरे व भाऊबंध जे हैदराबाद मध्ये राहिलेत ते एसटी प्रवर्गात आले व महाराष्ट्रात आलेल्या भावाला एसटी प्रवर्गात येण्याचा मान अथवा उपभोग मिळालं नाही. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यामध्ये बंजारा समाजाकडे एसटी प्रवर्गामध्ये असल्याचे नोंदी व पुरावे मोठ्या प्रमाणावर सापडत आहेत ज्याच्याकडे शंभर वर्षापासून कुणाचेही लक्ष नव्हते. बंजारा समाज हा एसटी प्रवर्गात असल्याचे सर्व निकष आज घडीला देखील पूर्ण करतो. मग भारत स्वातंत्र्य होऊन 75 वर्षे पूर्ण झाली तरीही या समाजाच्या नशिबी आजही भटकंती, गरिबी व दारिद्र्य का असे प्रश्न भेडसावत आहेत. 1920 पासून हा समाज एसटी प्रवर्गात आहे याचे पुरावे सापडले 1931 च्या जनगणनेत म्हणून गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी बंजारा समाजाच्या आरक्षणाच्या समर्थनार्थ पहिल्यांदा मुख्यमंत्र्यांना पत्र दिले. त्यांच्या पाठोपाठ अनेक आमदार व खासदार बंजारा समाजाच्या आरक्षणाला समर्थन देत आहेत. त्यांचे कोटी कोटी अभिनंदन! हैदराबाद नव्हे तर ब्रिटिश काळापासून बंजारा समाज हा आदिवासी प्रवर्गात मोडतो अशा नोंदी देखील इतिहासात आहेत. प्राण नावाच्या खलनायकाने हिंदी चित्रपट सृष्टीत बंजारा समाज हा आदिवासी प्रवर्गात कसा मोडतो याची प्रत्यक्ष दर्शन अनेक सिनेमामधून दिलेले आहे. उदा. जिद्दी, अपना देश, धर्मात्मा, हिर-रांजा, चोर मचाये शोर, जंजीर, शेरनी, बंजारन. बंजारा समाजाची काशी पोहरादेवी येथील बंजारा समाजाचे महंत तपस्वी रामराव महाराज यांनी 1970 ते 80 च्या काळात बंजारा समाज एसटी प्रवर्गात यावा यासाठी अनेक निवेदने सरकार पुढे मांडली तेव्हा कुठे 1976 मध्ये एसटी प्रवर्गासाठी दुरुस्ती कायदा करण्यात आला त्यात अनेक आंध्रा , तेलंगणा व कर्नाटक मधील बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये नवीन समावेश करण्यात आला. आदरणीय रामराव बापू यांनी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात आणण्यासाठी खूप निवेदने दिलीत पण त्याचा फायदा झाला नाही. अनेक आयोग स्थापन झालीत पण निरर्थक. एकेकाळी आर्थिक व लष्करी इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणारा, पारंपरिक व्यवसाय करणारा, मुघल व मराठा साम्राज्याला रसद पुरविणारा बंजारा समाज इंग्रजाला देखील घाबरला नाही. म्हणून 1857 च्या उठावानंतर अकबर बादशहाने राजाश्रय दिलेल्या , मुगल - मराठ्यांचा लाडका असणाऱ्या बंजारा समाजाला इंग्रजांनी 1871 मध्ये गुन्हेगारी जमात म्हणून जाहीर केले. म्हणजेच इंग्रजांनी देखील बंजारा समाजाला ट्राईब्स म्हणजेच आदिवासी म्हणून जाहीर केले. याचाच अर्थ असा की हैदराबाद गॅजेटच्या व्यतिरिक्त बंजारा समाज हा एसटी असल्याचे पुरावे भारतभर इतिहासात उपलब्ध आहेत. निजाम सरकारने हैदराबाद गॅझेट मध्ये बंजारा समाजाला अँबओरिजनल ट्राइब्स म्हणजेच मूल आदिवासी म्हणून संबोधले आहे. महाराष्ट्र सरकारला विनंती आहे की हैदराबाद गॅझेट व भारत स्वतंत्र्यापूर्वीचे व स्वातंत्र्यानंतरचे नोंदी व पुरावे लक्षात घेऊन बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात घ्यावे व हजारो वर्षापासून नशीबी भटकंती असलेल्या समाजाला न्याय द्यावा व आम्हाला आमचं हक्काचं आरक्षण द्यावं. सरकारने हैदराबाद गॅझेट कडे व बंजारा समाजाचे ऐतिहासिक पुराव्यांकडे कानाडोळा केला तर त्याचे परिणाम येणाऱ्या काळात खूप वाईट होतील आणि आज घडीला जो बंजारा समाज सरकारच्या पाठीशी आहे त्याच्या नशिबी परत भटकंती येईल , तो रस्त्यावर उतरेल, याला सर्वस्वी जबाबदार सरकार ...? जय जगदंबा! जय लक्कीशहा बंजारा ! जय सेवालाल!



प्रा. डॉ. दिलीप चव्हाण
रा.रूपचंद नगर
ता. रेनापुर
जि. लातूर



परळी
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे



# कला शाखेची आज गरज काय.?

प्रा. डॉ. दिलीप बंजारा;लोकप्रशासन विभाग प्रमुख महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर

बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक परिस्थितीत शिक्षण प्रणालीदेखील मोठ्या प्रमाणावर रूपांतरित होत आहे. 'कौशल्याधिष्ठित शिक्षण' ही संकल्पना प्राधान्याने पुढे येत असून, त्यावर भर दिला जात आहे. कौशल्य हे निश्चितच गरजेचे आहे; कारण कोणत्याही व्यक्तीचे रोजगारक्षम होणे हे तिच्या सशक्तीकरणासाठी आवश्यक आहे; परंतु शिक्षण केवळ कौशल्याभिमुख बनले, तर ते माणसाच्या मानसिक, भावनिक, सामाजिक आणि नैतिक विकासासाठी अपुरे ठरते. आजचा विद्यार्थी रोजगार मिळवतो आहे; पण अनेकवेळा तो समाजाशी तुटलेला, असंवेदनशील आणि तणावग्रस्त होतो आहे. हे फक्त भारतीयच नव्हे, तर जागतिक स्तरावर दिसणारे चित्र आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात यापूर्वी नव्हती इतकी गरज कला शाखेची भासणार आहे, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. त्याचे कारण कला शाखा म्हणजे केवळ चित्रकला, संगीत वा साहित्य नव्हे, तर ती सामाजिक वास्तव समजून घेण्याची, संवेदना विकसित करण्याची आणि नैतिकतेची जाणीव निर्माण करणारी शाखा आहे. समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, साहित्य या शाखा व्यक्तीमध्ये आत्मपरीक्षण, सहवेदना, विश्लेषण शक्ती आणि सामाजिक बांधिलकी घडवतात. उदा. गांधीजींचा शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन पाहता तो 'नैतिक व श्रमशील शिक्षणा'वर भर देणारा होता. 'नैतिक मूल्ये' ही घरातून नव्हे, तर शिक्षणातूनही मिळायला हवीत, असा त्यांचा आग्रह होता.

मूल्य, माणुसकीची जाणीव असलेले नागरिक लागतात. ही जाणीव घडवणारे शिक्षण म्हणजेच कला शाखा.

## अंमलबजावणीतील अडथळे अन् उपाय

कला शाखेतील संशोधन, अभ्यासक्रम, कार्यशाळा, कला व सर्जनशील उपक्रमांसाठी निधींची कमतरता आहे. त्यात वाढ करावी.

काळानुसार कला शाखेचा अभ्यासक्रम अद्ययावत न करणे ही समस्या असून, त्यावर तोडगा काढला पाहिजे. पालक, विद्यार्थी, समाज यांच्यामध्ये कला शाखेचे महत्त्व पोहोचविण्यात कमी पडत असून, त्यावर भर द्यावा. लिबरल आर्ट्स या माध्यमातून सर्जनशील विचार, संवाद कौशल्य, नेतृत्व या क्षमता विकसित होतात. ज्यांची कॉर्पोरेट क्षेत्रातही मागणी आहे. ते लोकांपर्यंत पोहोचविले पाहिजे. न्याय्य, संवेदनशील आणि सहिष्णू समाज घडवण्यासाठी केवळ तंत्रज्ञान व कौशल्य पुरेसे नाही, तर मूल्यांची आणि माणुसकीची जाणीव असलेले नागरिक लागतात. ही जाणीव घडवणारे शिक्षण म्हणजेच कला शाखा आहे. म्हणूनच, सुदृढ समाज घडवायचा असेल तर कला शाखेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

## कला शाखेतून काय साधाल?

काय योग्य, काय अयोग्य याचा निर्णय घेण्याची शक्ती.

सामाजिक रचना, विविधता, वर्गीय-लैंगिक विषमता आणि सांस्कृतिक परंपरा याची समज.

व्यक्तीचा समाजाशी संबंध दृढ करणारी आणि सामाजिक बांधिलकी जागवणारी भूमिका.

साहित्य आणि कला व्यक्तीला प्रभावी संवादक बनवते.

समाजातील दुर्लक्षित घटकांप्रती सहवेदना आणि नवकल्पनांची रुजवण.

## कला शाखेचे स्थान :

नव्या शैक्षणिक धोरणात कला शाखेला थोडेसे सकारात्मक स्थान दिले आहे. 'Multidisciplinary and holistic education' हा या धोरणाचा मूलमंत्र आहे. कला, विज्ञान, वाणिज्य यांना समान संधी दिली जाईल, असे यातून स्पष्ट करते. प्रत्यक्ष व्यवहारात अनेक महाविद्यालये आणि विद्यापीठे अजूनही कला शाखेकडे फारसा भर देत नाहीत.

## समज आणि वास्तव :

पालक व विद्यार्थी कला शाखेकडे 'दुय्यम' नजरेने पाहातात. विज्ञान व वाणिज्य शाखा म्हणजे करिअर; तर कला शाखा म्हणजे 'पर्याय नसल्यावर घेतलेली शाखा' असा चुकीचा समज प्रचलित आहे; पण जगातील अनेक महान नेते, लेखक, तत्त्वज्ञ, प्रशासक आणि सामाजिक कार्यकर्ते हे कला शाखेच्या अभ्यासातूनच घडलेले आहेत.

# धर्म आणि धर्माच्या भाषा या आरक्षणाच्या बाबतीत आरक्षणाच्या लढाई मध्ये आपण करूच नका

एक चिंतन



मला जे सुचलं ते मी लिहिण्याचा आणि समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.या लेखास प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून माझा लेख मी लिहिण्यास सुरुवात करीत आहे. मित्रांनो आरक्षण आणि धर्माची व्याख्या ही जुळत नाही राहिली गोष्ट बंजारा धर्माला वेगळं करण्याची तर आधी आपल्या शैक्षणिक टी.सी.वरील जातीचा आणि राष्ट्रीय त्वचा उल्लेख आहे. तो उल्लेख आपण शिक्षण पातळी वरून खोडावा आणि त्यानंतर आरक्षणाची लढाई लढावी आधी त्याचा त्याग करावा करता येतो का?आपण भारत स्वतंत्र झाल्या पासून ते महाराष्ट्र स्वतंत्रतेच्या लढ्यामध्ये आणि मराठवाडा महाराष्ट्रात विलीन करण्याच्या लढाई मध्ये वेगवेगळ्या शैलीतून महाराष्ट्रात आपल्या समाजाला ज्यांनी वि.जे.प्रवर्गात टाकून आपल्याला आपल्या ताकदीला तोडण्याचा प्रयत्न केला त्या लोकांशी वैर करताना आपल्याला आपल्या ताकतीचा प्रयोग करायचा असेल तर आधी आपण आपल्या बंजारा हिंदू अशा उल्लेखाने टी सी वर आणि आपल्या शैक्षणिक कागदपत्रावर उल्लेख आहे. तो काढणे अत्यंत आवश्यक आहे.मग आपण शैक्षणिक पात्रता गमावून या लढ्यात शामील होणारा आहात का?असा प्रश्नही आता उद्भवतो समाजाच्या या लढ्या मध्ये उल्लेखनीय बाब अशी आहे.की समाजाचा नेतृत्व कोण करणार यावर प्रश्नचिन्ह ताशेरे ओढणारा प्रवर्ग आपणास युवा वर्गातही दिसतो जेष्ठ वर्गातही दिसतो आणि मार्गदर्शकातही दिसतो एवढेच नव्हे तर आपल्या गुरुतुल्य लोकांवर हा प्रभाव पडलेला आहे.त्या मुळे एकात्मतेचा बोध घेतलेल्या सर्व जनतेला आपण कोणत्या मार्गाने नेणार हा मोठा प्रश्न आहे.या प्रश्नाचा उत्तर समूहाने कार्य केल्यावरच सुटेल जर आपण सद्गुरु सेवालाल महाराज यांना आपले आदर्श स्थान देवतुल्य स्थान आणि शक्तिपीठ स्थान असे मानतो तर पोहरागड येथून जे आव्हान होतात त्याला आपण नाकारतो असे का?यात ही अनेकांच्या स्वार्थाची गंध येताना दिसते,मग या दिपावळी मध्ये तेजोमय दीपावली करून आपल्या मनातील हीन भावना दूर करून समाजाला दिशा दाखवण्यासाठी एकजूट होऊन शपथ घेऊ सद्गुरु सेवालाल महाराज यांचे आपण गोर बंजारा आहोत आणि आपला लढा पोहरागड येथून जो समाजाचा आवाज उठेल तो आम्हाला मान्य आहे असे ग्राह्य धरू हीच मी शपथ घेतो.ज्या परंपरे नुसार आणि ज्या पिढीमध्ये मी जन्म घेतला त्या जन्मदात्या पूर्वजांचा माथा ठेवण्याचा ठिकाण पोहरागड आहे. त्या पोरागड नगरीतून जो ही आवाज एकात्मतेचा निघेल तो मला मान्य आहे.आज मी शपथ घेतो की,आई-वडिलांची,बहिण भावाची,पूर्वजांची,देवी-देवतेची,पंचमहाभूतांची किमी समाजाच्या समस्यांना सोडवण्यासाठी आरक्षण हक्कासाठी नेहमी समाजाच्या सोबत आहे.सेवा सेवक समाज सेवक सेवा भक्त एक गोर बंजारा

------------

प्रा डॉ दिलीप बंजारा,अहमदपूर

परळी
संघर्षनेता
https://www.parlisangharshneta.in 9881265102
संपादक - मोहन व्हावळे

# बंजारा एस. टी. आरक्षण आणि सद्यस्थिती

भारतातील बंजारा समाज ऐतिहासिक दृष्ट्या भटक्या आदिवासी समुदाय म्हणून ओळखला जातो. प्राचीन सिंधू संस्कृतीच्या वैभवात अस्तित्वात असलेल्या अनेक समुदायांपैकी बंजारा ही एक संस्कृती आहे. बंजारा समुदाय अभिजात आणि स्वाभिमानी समाज म्हणून समाजात ओळखला जातो भारताच्या सांस्कृतिक आणि आर्थिक इतिहासात बंजारा समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिलेले आहे.पशुपालक समाज, निसर्ग पूजक समाज, व्यापारी समाज, व्यापार लदेणी आणि तांडा संस्कृती जोपासत आलेला समाज जो मुळात आदिवासीच आहे. बंजारा समाजाने हजारो वर्षापासून अनेक शासक पाहिले लदेनी करुन म्हणजे व्यापार करुन या समाजाने भारतात, मध्य आशियामध्ये आणि जगभरात महत्त्वपूर्ण भूमिका मांडल्याचे इतिहासात अनेक दाखले आहेत. सप्तसिंधूच्या खोऱ्यातला या प्रभावशाली बंजारा समाजाने आपली स्वतंत्र ओळख, संस्कृती, पेहराव वेशभूषा आणि खानपान खानाबदोष संस्कृतीची ओळख टिकवून ठेवली आहे.

मुघल कालखंडातला व्यापारी समाज म्हणून या समाजाने स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.आपला व्यापार भारतात आणि भारताबाहेरिल अनेक देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित केले होते.

आपल्या व्यापाराच्या माध्यमातून उच्चतम सीमेवर असणारा हा समाज ब्रिटिश कालखंडात 1871 च्या जन्मजात गुन्हेगारी कायद्याने या समाजावर प्रचंड अन्याय आणि अत्याचार झाला. 871 पासून सुरु झालेला हा जीवघेणा प्रवास 1952 पर्यंत सुरु होता. साधारणता 81 वर्ष म्हणजेच जवळपास एक शतक या समाजाने नरक यातना भोगल्या आहेत आमच्या समाजाच्या पाच पिढ्या या कायद्याने बरबाद केल्या. गुन्हेगारी जमात म्हणून लागलेला डाग अद्याप समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणातून दिसून येतो.

या सामाजिक विषमतेची दरी आता तरी कमी होईल का आणि न्यायिक समानता या समाजाच्या वाट्याला मिळेल का? हा प्रश्न आ पासून समोर उभा आहे. 1871 च्या Criminal Tribe Act नुसार बंजारा समाज क्रिमिनल ट्राईब म्हणजे भटक्या जमाती ही नोंद स्वयं स्पष्ट करते की हा समाज आदिवासीच आहे .

स्वतंत्र जीवनशैली असणारा समाज संपूर्ण भारतातील 6000 जाती समुदायांपैकी एकमेव असा समाज आहे जो भारताच्या कन्याकुमारी ते हिमालयापर्यंत स्वतंत्र एकच बोलीभाषा बोलतो, सारखाच पेहराव परिधान करतो, स्वतः ला गोरमाटी म्हणून उल्लेखित करतो,महिलांचा स्वतंत्र पोशाख, दाग दागिने आभूषणे केस रचना आणि संपूर्ण समुदायाची खानपान हे दर्शवते की हा समाज मुळात आदिवासीच आहे. भौगोलिक विलगता शहरापासून, गावापासून दूर असलेले असलेला तांडा आणि तांड्याची सामाजिक जीवनशैली _परंपरा जोपासत आलेला आढळतो.

अनेक मानववंशशास्त्रीय लेखकांनी बंजारा जमात समुदाय तांडा वस्ती दरीखोऱ्यातील राहणीमान असलेले पशुपालन करणारे, शिकार करणारे, सामाजिक मागासलेपण असलेले, शरीरावर गोंदन करणारे, स्वतंत्र देवी देवता असलेले स्वतंत्र लोकनृत्य आणि लेंगी नृत्य असलेले सणवारातील वेगळेपणा, कलाकुसरतील वेगळेपणा इत्यादी बाबींचा सर्वसमावेशक अभ्यास करून बंजारा समाज हा भटक्या आदिवासी समुदाय म्हणून केलेला उल्लेख महत्त्वपूर्ण ठरतो.

Ethnographic मध्ये

1) JJ Roy Burman यांनी Ethnography of denotified tribes यामध्ये बंजारा समुदाय समुदायाची वैशिष्ट्ये विलगता याबद्दल सविस्तर वर्णन केलेला आहे .

2) Russel and Hiralal यांनी सुद्धा बंजारा ही जमात असून त्यांच्या वेगळेपणाविषयी भाष्य त्यांनी केलेला आहे.

3) Edgar Thrustan यांनी सुद्धा Cast and Tribes of surdan india या पुस्तकांमध्ये ठीक ठिकाणी बंजारा समाजाचा उल्लेख केलेला आहे. बंजारा समाजाबद्दलची इत्यंभूत माहिती त्यांनी सविस्तर मांडली आहे.

4) Crustofar Vidyal यांनी सुद्धा Tribal Art of middle India नावाच्या पुस्तकामध्ये बंजारा समाजातील अनेक बाबींची नोंद केलेली आहे. वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगणारी जमात बंजारा समाजातील कला कौशल्य दागिन्यातील कला कौशल्य पोशाखातील विविधता इत्यादी बाबींचा उल्लेख त्यांनी केलेला आढळतो.

निजामकालीन व ब्रिटिश कालीन अनेक शासकीय दस्तऐवजामध्ये बंजारा समाज हा भटका आदिवासी समाज असल्याचे अधिकृत नोंदवले गेलेले आहे.

स्वातंत्र्यानंतर निजामकालीन मराठवाडा हा प्रदेश बॉम्बे स्टेट मध्ये भाषावार प्रांत रचना कायद्याद्वारे समाविष्ट करण्यात आला. तो समाविष्टपूर्व आंध्र प्रदेशात आदिवासी म्हणून नोंदवला गेलेला होता. पण महाराष्ट्रात मराठवाड्याचा समाविष्ट करत असताना State Reorganazation pilicy मधील आंतरराज्य प्रादेशिक हस्तांतरण या तत्त्वाचा नियमावलीचा भंग या ठिकाणी झालेला आढळतो.

सध्या परिस्थितीत बंजारा समाजाची दयनीय अवस्था, सामाजिक मागस मागासलेपण, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती पाहता हा समाज कोलमडून पडला आहे. ज्याचा थेट परिणाम समाजाच्या उपजीविकेवर झाला आणि हा समाज शिक्षण आरोग्य रोजगार या मूलभूत क्षेत्रातही मागास राहिला. सामाजिक दृष्ट्या बंजारा समाज मुख्यप्रवाह पासून वंचित आहे, बंजारा समाजाच्या सामाजिक आर्थिक मागासलेपणाचा अभ्यास करून त्यांना मुख्यप्रवाहात आणण्यासाठी स्वातंत्र्यापासून ते आज पर्यंत अनेक आयोग अनेक कमिट्या नेमण्यात आल्या त्या आयोगांनी शिफारशी करून सुद्धा बंजारा समाजाला अद्याप न्याय मिळालेला नाही, बंजारासमाजाच्या हातातून ऊस तोडीचा कोयता सुटलेला नाही... ऊस तोडी करणारी जमात म्हणून नवीन नाव बंजारा समाजाला या महाराष्ट्राने दिले.

Aboriginal tribe अदिम जमाती म्हणजे Primitive or Aboriginal

अशा नोंदी 1871 ते 1948 पर्यंत विविध ठिकाणी केल्याचे आढळते. ऐतिहासिक संदर्भात, ब्रिटिशकालीन नोंदीत, निजाम काळातील नोंदी, हैदराबाद गॅजेटर्स, 1931 ची जातवार जनगणना, आतापर्यंत केंद्र शासनाने आणि राज्य सरकारने सामाजिक आर्थिक दृष्टिकोनातून मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी नेमलेले आयोग त्या आयोगाच्या शिफारशी आणि न्यायालयीन आदेश इत्यादी बाबी हे दर्शवतात.

बंजारा समाजाच्या आरक्षणाची सध्याची परिस्थिती पाहिल्यास बिहार,झारखंड, उडीसा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा इत्यादी राज्यांमध्ये बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्यात आलेला आहे एसटी प्रवर्गात केलेला आढळतो तर दिल्ली हिमाचल प्रदेश कर्नाटक हरियाणा या राज्यात बंजारा जमातीचा उल्लेख अनुसूचित जाती म्हणजे एससी शेड्युल कास्ट असा करण्यात आलेला आहे आणि सध्या महाराष्ट्रामध्ये तामिळनाडूमध्ये गुजरात मध्ये ओबीसी किंवा व्हीजेएनटी म्हणून या जातींचा उल्लेख केलेला आहे ही हे समानतेच्या न्यायाला तडा देणारी गोष्ट आहे एकच जात एकच समुदाय एकच भाषा बोलणारा वर्ग पण वेगवेगळ्या राज्यामध्ये त्याची वेगवेगळी स्थिती जी आरक्षणाच्या न्यायिक तत्त्वाचा भंग करताना दिसते. कलम 14 समानतेच्या अधिकार या ठिकाणी भंग होताना दिसतो.



भारतीय राज्यघटनेच्या कलम 340 नुसार एखाद्या समुदयाची सामाजिक आर्थिक स्थिती सामाजिक मागासलेपण भौगोलिक विलगता, शहरापासून गावापासून दूर असलेले तांडे यांचा अभ्यास करून त्यांना अनुसूचित जमाती मध्ये अंतर्भूत करता येते. पहिली घटना दुरुस्ती कलम 15 (4) केंद्र सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासवर्गासाठी विशेष तरतूद करता येते. हे तत्व राज्यघटनेच्या मूलभूत तत्वांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे.

सदर बाबींचा विचार करून ऐतिहासिक पुरावांचा विचार करून ब्रिटिश काळातील नोंदणीचा विचार करून केंद्र शासनाने आतापर्यंत स्थापन केलेल्या निरनिराळ्या आयोगाच्या शिफारशींचा विचार करून माननीय सुप्रीम कोर्टाने दिलेल्या अनुसूचित जाती जमातीच्या उपवर्गीकरणाच्या आदेशाचा विचार करून संबंध बंजारा समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करावे ही मागणी मोठ्या प्रमाणामध्ये जोर धरत आहे आणि शासनाने त्याची दखल घ्यावी ही समाजभावना झालेली आहे.

वरील सर्व बाबींचा शासन गांभीर्याने विचार करून बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात समाविष्ट करून बंजारा समाजाला न्याय देईल ही अपेक्षा आहे.

**आपलाच गोर बांधव**
**प्रा. डॉ.दिलीप लालू चव्हाण**
**रा.रूपचंद नगर**
**ता.रेनापुर**
**जि.लातूर**




THANK YO

# न भेट. । न बोलळों.. ! न बलाळों.. । बस्स आचाणक चलेजाळों... ?

हा विषयावर मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करित आहे. हे आपणास आवडेल अशी मी इच्छा व्यक्त करतो.

'कोरोना' काळातील 'एक्झिट' मग ती कोणाचीही असू देत ! ती आपल्या डोळ्यांची कडा पाणावले अन् मनाला चटका लावून जाणारा ठरतेय ! सध्या 'नियती' ही 'कोरोना'च्या पडद्याआडून घेतेय आपला आपल्यावरचा अनंत काळापासूनचा 'सूड'... ! नियती घे हवा तेवढा सूड घे. तू काही कायम राहणार नाहीस. आम्ही डगमगणार नाही की खचणार नाही. जातील हेही दिवस !

कोरोना आपली पाठ सोडायला तयार नाही. तो किती दिवस आपली सोबत करणार आहे हे निश्चित नाही. पण, आपल्या सर्वांची नातेवाईकांसह, मित्रांच्याही प्रत्यक्षात भेटी वा एकत्र येणे शक्य होत नसल्याने अगदी जवळच्यांचा या काळातील 'मृत्यू' म्हणजे, ना बोलणं. ना भेटणं. ना सांगावा. कसं हे एकाकी अनंतात निघून जाणं ? असा प्रश्न उपस्थित करून मनाला चटका लावून डोळ्याच्या कडा पाणावणारा 'मृत्यू' हा शेवटचा 'संस्कार'सुद्धा 'कोरोना'च्या पडद्याआडून 'नियती'ने आपल्यापासून हिरावून नेला असला तरीही हेही दिवस जातीलच.

आपल्याकडे संस्कारांची नांदी आहे. ही खूप चांगली बाब आहे. या निमित्ताने आपण एकत्र येत असतो. अन्यथा एकत्र येण्याचे काही निमित्तच राहिले नसते. निमित्ता निमित्ताने आपण आयुष्यभर एकत्र येतच असतो. जन्मलेल्या व्यक्तीला जिवंत असेपर्यंत पंधरा संस्कारांना डोळ्यादेखत सामोरे जावे लागते. शेवटचा जो अंतिम संस्कार आहे तो मात्र ती व्यक्ती पाहू शकत नाही. सोळावा संस्कार हा नातेवाईक, मित्रांच्या उपस्थितीत पार पडत असतो. माणूस हा मरेपर्यंत सोळा संस्कारांना सामोरा जातो.

पण, आता परिस्थिती बदललीय. वातावरण बदललंय. जीवनशैली बदललीय. मोकळेपणा हरवलाय. हस्तांदोलन दोन महिन्यातच इतिहासजमा झालंय. उरभेट, गळाभेट, कवटाळणं तर संपुष्टातच आलंय. सामाजिक डिस्टंनसिंग मुळं दोन फूट अंतरावर आपण उभं राहून एकमेकांना बोलतोय. शारीरिक आंतरप्रम णेच आता मना – मनाचेही अंतर तर पडणार नाही ना ? याची राहून राहून भीती वाटतेय. आता एकमेकांच्या समोर आपण आलो तर हा कसा आहे? याला कोरोना तर नाही ना असं समजून आपण विशिष्ट अंतरावर ठेवून आपला कार्यभाग साधण्याचा प्रयत्न करत आहोत.

दिवसांतून दहा वेळा सॅनिटायझरने हात धुणारे, एकमेकांचा स्पर्श टाळणारे, आणि तोंडाला मास्क लावून महत्वाच्या कामानिमित्ताने बाहेर पडणारे आपण आता 'आपली'तेवढी कशी काळजी घ्यावी यात गुंतलो आहोत. कोणी नातेवाईक आजारी असला की तो आजारी कशामुळे झाला? तो ऑरेंज, रेड की ग्रीन या पैकी कोणत्या एरियात राहतो ? त्याचे स्वॅब रिपोर्ट कसे आहेत? असे असंख्य प्रश्न अन् संशयातून संशय निर्माण करतो.

अन् अशातच तो गचकला. गेला. तर मग शासनादेशान्वये आपण एकत्र येऊ शकत नाहीत. कोरोना पॉझिटिव्हने मृत्यू झाला नसल्यास मोजक्या दहा पाच व्यक्तींच्या उपस्थितीत अंत्यविधी 'आटोपला' जातो. तो मृत्यू पावला याचे दुःख वाटते. डोळे ओलावतात. मनाला उदासी घेरते. चुटपुट लागते. त्याची कर्तबगारी आठवते. बस्स एवढेच काय ते. वृद्ध असो की कोणीही असो कसलेही सोपस्कार नाहीत. वृद्धापकाळाने निधन झाल्यानंतर त्यांचा अंत्यविधी आनंदात साजरा केला जातो. पण आता कोणीही असो फक्त स्मशानभूमीत घेऊन जाण्याचा व अग्निडाग देण्याचा एक शेवटचा संस्कार सोपस्कार म्हणून पार पडला जातो आहे. हा नियतीच्या आपल्यावर असलेला अनंतकाळापासूनच्या 'सूड' भावनेला आता वाट मिळतेय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

जर एखाद्या व्यक्तीचा जर कोरोना विषाणूंचा संसर्ग होऊन मृत्यू झाला तर मग या व्यक्तीच्या घरातल्या व्यक्ती सुद्धा सोबत नाहीत. अँम्बुलन्स मधून प्लॅस्टिकच्या आवरणासह अंत्यविधी उरकला जातोय. या कोरोना काळातील कोणाचीही होणारी 'एक्झिट' ही अशी एकाकी आहे. अंतःकरण पिळवटून टाकणारी आहे. डोळ्याच्या कडा पाणावणारी आहे. कोणालाही न बोलता न भेटता अन् अंत्यविधीला न जाताही आपली शोकात्म भावना कधी वेळ व्याकूळ होते. 'कोरोना'पूर्वी आपल्यातील कोणाचाही मृत्यू झाला की त्या व्यक्तीचा हा शेवटचा विधी आहे म्हणून शत्रू असो की मित्र हा मरणदारी यायचाच. 'माणसं तोरणदारी आणि मरणदारी...' न बोलवता येतात. पण, आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. 'कालाय तस्मै नमः' जातील हेही दिवस! असंच म्हणू ?



– डॉ. बंजारा दिलीप लालू (चव्हाण)
लोक प्रशासन विभाग प्रमुख, अहमदपूर.
मो. ९३०७१८३५१७/ ८८५५९८६५०१

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
Pimpri 08 April 2025_004
08 Apr 2025

# मैं एक बंजारा...

**भारतीय विविधतेतील एक स्वतंत्र संस्कृती जोपासणारा समाज म्हणून बंजारा समाजाकडे पाहिले जाते. काटक, लढवय्ये, साहसी व निसर्गप्रेमी अशी त्यांची खरी ओळख आहे. आज जागतिक बंजारा दिन.**

विशेष
– प्रा. सुभाष राठोड

८ एप्रिल १९८१ रोजी जर्मनीमध्ये रोमा, जिप्सी आणि विश्व बंजारा समाजाची बैठक झाली होती. या बैठकीमध्ये भारताकडून रामसिंगजी भानावत आणि रणजीत नाईक यांनी भाग घेतला होता. बंजारा समाजाची एकता आणि रोमा बंजारा बांधवांच्या प्रश्नांकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने रोमा समुदायाविषयी भेदभाव नष्ट व्हावा व मानवाधिकाराचे होणारे हनन थांबावे, मानवाधिकाराचे संरक्षण कवच मिळावे, त्यांनासुद्धा सन्मानाने जीवन जगण्याचा मूलभूत अधिकार मिळावा, इत्यादी प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी दरवर्षी ८ एप्रिल हा दिवस 'जागतिक रोमा बंजारा दिवस' म्हणून साजरा करण्याबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला होता.

रोमा बंजारा बांधव हे भारताचे मूळ रहिवाशी असून ते मूळचे गोर बंजारा समुदायाशी निगडित आहेत. ६ व्या शतकापासून ते ११व्या शतकापर्यंत ते भारतातून अफगाणिस्तानमार्गे युरोपमध्ये गेले असल्याचे मानले जाते. युरोपमधील विविध देशांत रोमा बंजारा समाजाची लोकसंख्या दोन कोटींपेक्षाही अधिक असल्याचे यावेळी समजले. रोमानी भाषा भारतीय इंडो-आर्यन भाषा कुळातील असून बंजारा, गुजराथी, राजस्थानी यांसारख्या इंडो-आर्यन भाषा कुळातील भारतीय भाषांशी कमालीचे साधर्म्य आढळून येते. 'रोमा बंजारा कल्चरल सेंटर', उदयपूर, राजस्थानच्या संस्थापिका अनिशा हरनॅक्स या स्वतः जिप्सी, रोमानी समुदायाच्या असून त्यांनी संशोधनाअंती जिप्सी समुदायाचे मूळ उत्तर-पश्चिमी भारत असल्याचे मत मांडले आहे. त्यांनी रोमानी समुदायाची संस्कृती भारतीय असून त्यांच्या बोलीभाषेत राजस्थानी, पंजाबी, गुजराती शब्दांचा भरणा अधिक असल्याचे नमूद केले आहे.

'Center For Secular and Moliculer Biology Institution, Hyderabad' या संस्थेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निरज रॉय यांच्या नेतृत्वाखाली जगातील अनेक विश्वविद्यालयाच्या सायंटिस्टनी पूर्व युरोपमधील रोमा लोकांची डीएनए चाचणी केली असता त्यांचे डीएनए भारतीय बंजारा, शिकलीगार या समाजाशी साम्य असल्याचे आढळले होते. युरोपमधील रोमा बंजारा लोकांनी नाझीकडून (हिटलर) १९३८ मध्ये 'जिप्सी क्लिनअप विक' राबविण्यात



आले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या समाजाला लक्ष्य करण्यात आले होते. युद्धकाळात त्यांना विशिष्ट शिबिरामध्ये कैदेत ठेवण्यात आले. स्त्रिया, बालके तसेच माणसे यांना नामोहरम करण्यात आले होते. उपासमार आणि भूकबळीमुळे सुमारे २० हजार रोमा बंजारा मृत्यूमुखी पडल्याची वस्तुस्थिती जगासमोर आली होती. आज 'रोमा बंजारा' हा युरोपमधील सर्वाधिक गरीब, अल्पसंख्याक समुदाय आहे. हे लोक भटके असल्यामुळे इंग्रजीमध्ये यांना 'जिप्सी' म्हणतात. युरोपमध्ये या लोकांना नागरिकत्व प्राप्त करण्यात अनंत अडचणी येत असून वांशिक भेदभाव केला जातो. त्यांचे मानवाधिकार नाकारले जात आहेत. फ्रान्सने गेल्या काही वर्षांपूर्वी रोमा लोकांना रोमानिया आणि बल्गेरियामध्ये हुसकावून लावले होते. हा मुद्दा फ्रान्समधील काही मानवाधिकार संघटनांनीसुद्धा लावून धरला होता. या समुदायाच्या मानवाधिकार रक्षणासाठी 'European Roma Rights Center '(ERRC) तसेच 'Roma Rights Network' या स्वयंसेवी संस्था युरोपमधे कार्यरत आहेत.

युरोपमध्ये गेल्यानंतर रोमा समुदाय युरोपातील बायजेंटाइन साम्राज्याचा एक भाग बनले. हा समुदाय स्वतःला रोमन साम्राज्याचे वारसदार मानतात. म्हणून या लोकांनी स्वतःला 'रोमा' हे नाव धारण केले असे मानले जाते.

१९८३ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी रोमा महोत्सवात 'रोमा लोगों का इतिहास विपत्ति और वेदना का इतिहास है, लेकीन नियती की थपेडोपर मानवीय उत्साह का परिचायक है', असे उद्गार काढले होते. तसेच भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी एका ठिकाणी भारतीयांच्या सांस्कृतिक विविधतेबाबत असे विशद केले आहे की, 'कोई विदेशी जो भारत से बिल्कुल अपरिचित हो, वह एक सैर से दुसरे सैर तक सफर करे तो उसको इस देश में इतनी विभिन्नताएं देखने को मिलती है कि, वह कह उठेगा- यह एक देश नहीं बल्कि कहीं देशों का एक समूह है। पर विचार करके देखा जाए तो इस विभिन्नताओं की तह में एक ऐसी एकता फैली हुई है, जो अन्य विभिन्नताओं को ठीक उसी तरह पिरोलेती है और पिरोकर एक सुंदर मणियों की समूहमाला बना देतीहै।'

रोमा बंजारा समाज युरोपमध्ये आजही खूप कष्टप्रद जीवन जगतो आहे. रोमा समुदायाविषयी आपल्या देशातील बंजारा बांधवांमध्ये अधिक जागरुकता झाली पाहिजे. रामसिंग भानावत यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर अनेकदा या समाजाच्या मानवाधिकाराबाबत प्रयत्न केले होते. बंजारा समाज भारतात आणि परदेशातही राहतो. हा समाज जगात 'रोमा बंजारा', युरोपात 'जिप्सी बंजारा' अशा अनेक नावांनी ओळखला जातो, तर भारतात गोर बंजारा, बामणिया बंजारा, गवारिया, लदनिया बंजारा, बालदिया, चारण, बाजीगर, लभाणी, लम्बाडा, सुगळी, सिरकीबंद अशा अनेक नावांनी ओळखला जातो. एकाच विशाल अशा समाजाची भारतात राज्यपरत्वे जवळपास ४४ वेगवेगळी नावे आढळून येतात आणि ही नावे समाजाच्या एकतेमध्ये, प्रगतीमध्ये अडसर ठरत आहेत. गोर-बंजारा हा एक समृद्ध सांस्कृतिक परंपरा असणारा भारतीय समाजरचनेचा एक महत्वाचा घटक होय. गोर बंजारा समाजाच्या अस्तित्वाच्या खानाखुणा, पाळेमुळे आपणास भारतातील एक सभ्य संस्कृती म्हणून समजल्या गेलेल्या सिंधू संस्कृतीमध्ये सापडतात.

परळी **संघर्षनेता**
https://www.parlisangharshneta.in 9881265102

# समान परिस्थिती, वेगळा न्याय : महाराष्ट्रातील बंजारा समाज अनुसूचित जमाती (S.T.) आरक्षणाचा हक्कदार

□ ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि राज्य पुनर्रचनेतील अन्याय :

भारतातील बंजारा, गोर बंजारा अथवा लमाण, लमाणी समाज हा पूर्वीपासूनच वंचित, पीडित व सतत स्थलांतरित जीवन जगणारा समुदाय राहिलेला आहे. या समाजाचा मागोवा घेतला तर निजामशाहीच्या काळातही त्यांच्या अस्तित्वाची स्पष्ट नोंद सरकारी गॅझेटमध्ये दिसून येते. निजामाच्या हैदराबाद संस्थानातील अधिकृत नोंदींमध्ये बंजारा समाजाला स्वतंत्र जमात म्हणून मान्यता होती. त्याचप्रमाणे तत्कालीन ब्रिटिश सरकारच्या अहवालांत व विविध जिल्ह्यांच्या गॅझेट नोंदींमध्येही या समाजाचा उल्लेख अनुसूचित व मागासवर्गीय म्हणून केला गेला आहे. म्हणजेच, बंजारा समाजाच्या सामाजिक-आर्थिक स्थितीची मागासलेपणाची जाणीव तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांनाही होती, हे निर्विवादपणे सिद्ध होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1950 मध्ये भारतीय संविधानाची अंमलबजावणी झाली. त्यातील कलम 366(25) व अनुसूची 342 अंतर्गत अनुसूचित जमातींची यादी जाहीर करण्यात आली. या यादीत तत्कालीन हैदराबाद संस्थानाचा भाग असलेल्या आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यात बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती ( S.T.) प्रवर्गात करण्यात आला. आजही त्या राज्यांत बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळतो. याउलट, महाराष्ट्रात मात्र राज्य पुनर्रचनेच्या प्रक्रियेदरम्यान मोठा अन्याय घडला.

1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हा मराठवाडा विभाग हा हैदराबाद संस्थानाचा भाग म्हणून महाराष्ट्रात सामील झाला. राज्य पुनर्रचनेच्या या प्रक्रियेत, इतर राज्यांत अनुसूचित जमाती म्हणून मान्यता असलेला बंजारा समाज महाराष्ट्रात मात्र 'विमुक्त जाती अ' प्रवर्गात टाकण्यात आला. हा निर्णय पूर्णतः विसंगत व अन्यायकारक होता. कारण सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती सारखी असूनही, शेजारील राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळतो, आणि महाराष्ट्रातील बंजारा समाज मात्र त्याच अधिकारापासून वंचित राहतो.

ही विसंगती संविधानातील समानता तत्त्वाच्या (Equality Principle – कलम 14 व 15) स्पष्ट उल्लंघनासमान आहे. एकाच समाजाला, एकाच वंशपरंपरेला, वेगवेगळ्या राज्यांत वेगळा दर्जा देणे हे सामाजिक न्यायाच्या मूलभूत संकल्पनेलाही बाधक आहे. "समता हीच खरी लोकशाहीचा आत्मा आहे" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले होते, परंतु बंजारा समाजाच्या प्रश्नाकडे मात्र शासनाने व कायदेमंडळाने पूर्णपणे दुर्लक्ष केले.

आज महाराष्ट्रातील बंजारा समाज या ऐतिहासिक अन्यायाच्या छायेत जगत आहे. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रश्न अजूनही तेवढ्याच तीव्र आहेत, जितके इतर राज्यांतील बंजारा समाजाचे होते. परंतु आरक्षणातील अन्यायामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला प्रगतीची दारे बंद झाली. त्यामुळेच या प्रश्नाचा ऐतिहासिक संदर्भ, घटनात्मक तरतुदी व सामाजिक स्थिती लक्षात घेऊन समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देणे अपरिहार्य ठरते.

□ शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वातील मागासलेपणा :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाच्या शैक्षणिक स्थितीकडे पाहिले तर ती अत्यंत चिंताजनक व मागासलेली आहे. आजही ग्रामीण व दुर्गम भागात या समाजातील मुला-मुलींना प्राथमिक शिक्षणाची सुविधा अपुरीच आहे. 2011 च्या जनगणनेनुसार, बंजारा समाजातील साक्षरता दर महाराष्ट्रात केवळ सुमारे 52 टक्क्यांच्या आसपास आहे, तर राज्याचा सरासरी साक्षरता दर 82 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. उच्चशिक्षणाच्या दृष्टीने ही तफावत अधिकच गंभीर ठरते. महाविद्यालयीन शिक्षणात बंजारा समाजाचा प्रवेश अत्यल्प असून अभियांत्रिकी, वैद्यकीय, व्यवस्थापन किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमात तर हा आकडा नगण्य आहे. अनुसूचित जमातींना उपलब्ध असलेल्या शैक्षणिक आरक्षणाचा लाभ न मिळाल्यामुळे या समाजातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचे स्वप्न दहावी-बारावी नंतरच थांबते.

रोजगाराच्या क्षेत्रातही बंजारा समाजाला प्रचंड वंचितपणाचा सामना करावा लागतो. राज्यातील बहुतांश बंजारा युवक पारंपरिक हातमजुरी, शेतमजुरी, लहान-मोठे धंदे किंवा स्थलांतरित मजुरीवर अवलंबून असतात. शासकीय नोकऱ्यांमध्ये या समाजाचे प्रमाण अत्यल्प असून, तेही ओबीसी प्रवर्गातील स्पर्धेमुळे मागे पडते. महाराष्ट्र सरकारच्या कर्मचारी आकडेवारीनुसार, गट-अ आणि गट-ब पदांवर बंजारा समाजाचे प्रतिनिधित्व जवळजवळ नगण्य आहे. गट- क आणि गट-ड मध्ये काही प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या असल्या तरी त्या टिकाव धरू शकलेल्या नाहीत. याउलट, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटकात अनुसूचित जमाती आरक्षणामुळे बंजारा समाजातील मोठा वर्ग शासकीय सेवेत पोहोचला असून, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या प्रगती करत आहे.

राजकीय प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने बंजारा समाज महाराष्ट्रात नेहमीच उपेक्षित राहिला आहे. अनुसूचित जमातींसाठी राखीव असलेल्या मतदारसंघांत या समाजाला उमेदवारी मिळत नाही, कारण त्यांना ओबीसीमध्ये गणले जाते. दुसरीकडे, ओबीसी प्रवर्गातील प्रमुख जातींच्या राजकीय वर्चस्वामुळे बंजारा समाजाचे नेतृत्व दुय्यम ठरते. त्यामुळे विधानमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा संसदेत समाजाचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे. "लोकशाही ही संख्येवर नाही तर प्रतिनिधित्वावर उभी असते" असे म्हटले जाते, परंतु बंजारा समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळालेले नाही.

या शैक्षणिक, रोजगार व राजकीय वंचितपणाचे मूळ कारण म्हणजे समाजाला अनुसूचित जमातींचा दर्जा न मिळणे हे होय. कारण राज्यघटनेतील कलम 46 नुसार, अनुसूचित जाती व जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांचे विशेष रक्षण करण्याची जबाबदारी राज्यावर टाकलेली आहे. परंतु महाराष्ट्रातील बंजारा समाज या संरक्षणापासून वंचित आहे. "समाजाच्या सर्वात दुर्बल घटकांना बळकट केल्याशिवाय खरी लोकशाही फुलू शकत नाही" हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आजही तितकाच लागू होतो.

□ न्यायालयीन लढा, आयोगांचे अहवाल व धोरणात्मक शिफारसी :

महाराष्ट्रातील बंजारा समाजाने अनुसूचित जमाती प्रवर्गातील हक्क मिळविण्यासाठी गेली अनेक दशके न्यायालयीन आणि प्रशासकीय स्तरावर लढा दिला आहे. 1950 मध्ये भारतीय संविधान लागू झाल्यावर तत्कालीन हैदराबाद राज्याच्या गॅझेटमध्ये बंजारा/लंबाडी/सुगाळी समाजाचा समावेश अनुसूचित जमाती यादीत होता. परंतु 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यानंतर मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला आणि नवीन तयार झालेल्या बॉम्बे राज्याने अनुसूचित जमातींची यादी तयार करताना बंजारा समाजाला वगळले. याविरुद्ध समाजाने आंदोलन, निवेदने, खटले अशा विविध मार्गांचा अवलंब केला.

न्यायालयीन स्तरावर पाहिले तर, बंजारा समाजाचे अनेक खटले मुंबई उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात दाखल झाले. यामध्ये समाजाने हेच अधोरेखित केले की, "राज्याचे पुनर्रचनेनंतर फक्त प्रशासकीय सीमा बदलल्या, पण समाजाचे सामाजिक-आर्थिक वास्तव तेच राहिले. त्यामुळे हैदराबादमधील ST दर्जा महाराष्ट्रातही कायम राहायला हवा होता." न्यायालयांनी काही ठिकाणी राज्य व केंद्र सरकारला समाजाच्या मागणीचा गांभीर्याने विचार करण्याचे निर्देश दिले असले तरी, अद्याप अंतिम तोडगा निघालेला नाही.

विविध आयोगांच्या अहवालांमध्येही बंजारा समाजाच्या मागणीस आधार मिळतो. खास करून मंडल आयोग (1980) यांनी बंजारा समाजाच्या मागासलेपणाचे सविस्तर वर्णन केले होते. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाने (काका काळेलकर व नंतरचे आयोग) देखील बंजारा समाजाच्या सामाजिक-शैक्षणिक मागासलेपणाची नोंद केली आहे. राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाने (2010, 2015) केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालांमध्ये, "समान समाजाला एका राज्यात ST आणि दुसऱ्या राज्यात OBC/VJNT मध्ये टाकणे हे संविधानातील समानतेच्या तत्त्वाला विरोधी आहे" असे नमूद केले आहे.

धोरणात्मक स्तरावर पाहता, महाराष्ट्र सरकारने अनेक वेळा केंद्र सरकारला बंजारा समाजाच्या ST दर्जासाठी शिफारस केली आहे. 2008, 2013 मध्ये राज्य मंत्रिमंडळाने ठराव पारित करून केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु केंद्र सरकारकडून "संपूर्ण देशभर एकसमान धोरण" या कारणावरुन तो प्रस्ताव अजूनही प्रलंबित ठेवण्यात आला आहे. दुसरीकडे, आंध्र प्रदेश, तेलंगणा व कर्नाटक या राज्यांमध्ये बंजारा समाज आजही ST प्रवर्गात आहे आणि तिथे त्यांना शैक्षणिक, रोजगार व राजकीय लाभ मिळत आहेत.

न्यायालयीन आणि आयोगांच्या निष्कर्षांवरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, बंजारा समाजाची मागणी ही केवळ भावनिक किंवा राजकीय नाही, तर घटनात्मक व न्यायसुसंगत आहे. राज्यघटनेतील कलम 14 (समानतेचा हक्क) आणि कलम 15(4), 16(4) (आरक्षणाच्या तरतुदी) याच्या आधारे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही अनुसूचित जमाती प्रवर्गाचा हक्क मिळणे अपरिहार्य आहे. "ज्या समाजाला इतिहासाने वंचित केले, त्याला भविष्याने संधी द्यावी" हा न्यायनिवाड्याचा मूलभूत विचार आजही लागू होतो.


□ निष्कर्षात्मक सारांश :

महाराष्ट्रातील बंजारा समाजावर झालेला ऐतिहासिक अन्याय केवळ प्रशासकीय निर्णयाचा परिणाम आहे, समाजाच्या सामाजिक-आर्थिक वास्तवाचा नव्हे. निजामशाही काळात व नंतर हैदराबाद राज्यात बंजारा समाजाला अनुसूचित जमाती म्हणून मान्यता होती. 1956 च्या राज्य पुनर्रचनेनंतर मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावर या समाजाचा ST दर्जा काढून टाकण्यात आला आणि त्यांना VJ/NT प्रवर्गात टाकण्यात आले. परिणामी, शैक्षणिक आरक्षण, शासकीय नोकऱ्या आणि राजकीय प्रतिनिधित्व या सर्व क्षेत्रात समाजाची पिढ्यान्पिढ्या हानी झाली आहे. समान सामाजिक-आर्थिक स्थितीत असताना शेजारच्या आंध्र प्रदेश, तेलंगणा S.T. आणि कर्नाटकातील बंजारा समाज SC म्हणून प्रगत होत असताना महाराष्ट्रातील बंजारा समाज मागे राहिला आहे.

घटनात्मक दृष्ट्या ही परिस्थिती कलम 14 (समानतेचा हक्क), कलम 15(4) व 16(4) (आरक्षणाची तरतूद) आणि कलम 46 (मागासवर्गीयांच्या हितसंरक्षणाची जबाबदारी) या तरतुदींना विरोधी ठरते. संविधानाने दिलेले समान हक्क एका समाजाला फक्त राज्यांच्या सीमांच्या आधारावर हिरावून घेणे हे अन्यायकारक आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक वेळा ठरवले आहे की, आरक्षण व प्रतिनिधित्वाचा उद्देश "सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे" हा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजालाही ST दर्जा देणे हेच न्यायसंगत ठरते. किंबहुना तो कायदेशीर हक्क ठरतो.

आज बंजारा समाज शिक्षणात मागे आहे, शासकीय सेवेत त्यांचे प्रतिनिधित्व नगण्य आहे, राजकीय क्षेत्रात त्यांचा आवाज दडपला गेला आहे. न्यायालयीन खटले, विविध आयोगांचे अहवाल आणि राज्य मंत्रिमंडळाचे ठराव यामध्ये वारंवार समाजाच्या मागणीची वैधता अधोरेखित झाली आहे. परंतु केंद्र सरकारकडून अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित आहे. "ज्यांना इतिहासाने वंचित केले, त्यांना भविष्याने न्याय द्यावा" हा विचार आता प्रत्यक्षात उतरवणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील बंजारा समाजाला ST दर्जा देणे म्हणजे फक्त आरक्षणाचा लाभ नव्हे, तर त्यांचा हरवलेला सामाजिक-सांस्कृतिक सन्मान परत मिळवून देणे आहे.

यामुळे आता धोरणकर्त्यांनी धाडसी निर्णय घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गाचा दर्जा द्यावा. हा निर्णय घेतल्यास समाजाला शिक्षण, रोजगार व राजकारणातील संधी समानतेने उपलब्ध होतील आणि सामाजिक न्यायाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले जाईल.



**डॉ. चव्हाण दिलीप लालू**
**रुपचंद नगर, तालुका रेनापुर, जिल्हा लातूर**

# धर्म आणि धर्माच्या भाषा या आरक्षणाच्या बाबतीत आरक्षणाच्या लढाई मध्ये आपण करूच नका

एक चिंतन



मला जे सुचलं ते मी लिहिण्याचा आणि समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.या लेखास प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून माझा लेख मी लिहिण्यास सुरुवात करीत आहे. मित्रांनो आरक्षण आणि धर्माची व्याख्या ही जुळत नाही राहिली गोष्ट बंजारा धर्माला वेगळं करण्याची तर आधी आपल्या शैक्षणिक टी.सी.वरील जातीचा आणि राष्ट्रीय त्वचा उल्लेख आहे. तो उल्लेख आपण शिक्षण पातळी वरून खोडावा आणि त्यानंतर आरक्षणाची लढाई लढावी आधी त्याचा त्याग करावा करता येतो का?आपण भारत स्वतंत्र झाल्या पासून ते महाराष्ट्र स्वतंत्रतेच्या लढ्यामध्ये आणि मराठवाडा महाराष्ट्रात विलीन करण्याच्या लढाई मध्ये वेगवेगळ्या शैलीतून महाराष्ट्रात आपल्या समाजाला ज्यांनी वि.जे.प्रवर्गात टाकून आपल्याला आपल्या ताकदीला तोडण्याचा प्रयत्न केला त्या लोकांशी वैर करताना आपल्याला आपल्या ताकतीचा प्रयोग करायचा असेल तर आधी आपण आपल्या बंजारा हिंदू अशा उल्लेखाने टी सी वर आणि आपल्या शैक्षणिक कागदपत्रावर उल्लेख आहे. तो काढणे अत्यंत आवश्यक आहे.मग आपण शैक्षणिक पात्रता गमावून या लढ्यात शामील होणारा आहात का?असा प्रश्नही आता उद्भवतो समाजाच्या या लढ्या मध्ये उल्लेखनीय बाब अशी आहे.की समाजाचा नेतृत्व कोण करणार यावर प्रश्नचिन्ह ताशेरे ओढणारा प्रवर्ग आपणास युवा वर्गातही दिसतो जेष्ठ वर्गातही दिसतो आणि मार्गदर्शकातही दिसतो एवढेच नव्हे तर आपल्या गुरुतुल्य लोकांवर हा प्रभाव पडलेला आहे.त्या मुळे एकात्मतेचा बोध घेतलेल्या सर्व जनतेला आपण कोणत्या मार्गाने नेणार हा मोठा प्रश्न आहे.या प्रश्नाचा उत्तर समूहाने कार्य केल्यावरच सुटेल जर आपण सद्गुरु सेवालाल महाराज यांना आपले आदर्श स्थान देवतुल्य स्थान आणि शक्तिपीठ स्थान असे मानतो तर पोहरागड येथून जे आव्हान होतात त्याला आपण नाकारतो असे का?यात ही अनेकांच्या स्वार्थाची गंध येताना दिसते,मग या दिपावळी मध्ये तेजोमय दीपावली करून आपल्या मनातील हीन भावना दूर करून समाजाला दिशा दाखवण्यासाठी एकजूट होऊन शपथ घेऊ सद्गुरु सेवालाल महाराज यांचे आपण गोर बंजारा आहोत आणि आपला लढा पोहरागड येथून जो समाजाचा आवाज उठेल तो आम्हाला मान्य आहे असे ग्राह्य धरू हीच मी शपथ घेतो.ज्या परंपरे नुसार आणि ज्या पिढीमध्ये मी जन्म घेतला त्या जन्मदात्या पूर्वजांचा माथा ठेवण्याचा ठिकाण पोहरागड आहे. त्या पोरागड नगरीतून जो ही आवाज एकात्मतेचा निघेल तो मला मान्य आहे.आज मी शपथ घेतो की,आई-वडिलांची,बहिण भावाची,पूर्वजांची,देवी-देवतेची,पंचमहाभूतांची किमी समाजाच्या समस्यांना सोडवण्यासाठी आरक्षण हक्कासाठी नेहमी समाजाच्या सोबत आहे.सेवा सेवक समाज सेवक सेवा भक्त एक गोर बंजारा

------------

प्रा डॉ दिलीप बंजारा,अहमदपूर


YOU CAN WIN

# रेणापूर शहरी तांड्यातील युवकांनी घडविला इतिहास



लहानपणी आपण सर्वांनी ते 'एकीचे बळ' नावाची गोष्ट ऐकलीच असेल.....असं म्हटलं जातं की लोकसहभागातून काहीही शक्य होऊ शकत.....मग ती गोष्ट कितीही अशक्य का असेना....... याचं सर्वात छान उदाहरण म्हणजे अमीर खानने महाराष्ट्रातील सर्व जनतेला सोबत घेऊन लोकसहभागातून पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून उभालेलं 'पाणी अडवा पाणी जिरवा' ही मोहीम व त्यातून मिळालेलं यश हे ऐतिहासिक आहे.....

अगदी तसच काहीसं म्हणता येईल अशी एक गोष्ट कोरोनाच्या संकटकाळात घडली.......कोरोना रुपी या आलेल्या जागतिक महामारी मध्ये आपल्या प्रत्येकाच्या जवळची लोक अक्षरशः झाडाची पानं गळावी तशी आपल्याला सोडून गेली, हे खरच भयंकर तर होतच पण त्याही पेक्षा भयंकर म्हणजे या महामारीत निधन झालेल्या मृतदेहाला अक्षरशः स्मशानभूमी देखील कमी पडत होत्या....... अंत्यसंस्कारासाठी लोकांना तासन तास वाट बघावी लागत होती......एकतर आपल्या जवळच्या व्यक्तीच असं निधन होणं वरून पार्थिवावर वेळेवर अंत्यसंस्कार देखील न होणे हे खरच खूप दुर्दैवी होतं..........

हीच समस्या लातूर च्या रेणापूर मधील शहरात असलेल्या रेणापूर तांड्याला कोरोनाच्या संकटात जाणवली. अनेक लोकांनी आपल्या जवळची माणसं गमवली आणि त्यातून जे घडलं ते कौतुकास्पद होत......तांड्यातील लोकांनी व युवकांनी स्मशानभूमीची मागणी अनेक वेळा शासन दरबारी केली होती पण काहीच निष्पन्न नाही झालं. तेव्हा शासनाने देखील बगल दिली. या संकटा समोर शासकीय यंत्रणा देखील हतबल झाली होती व पूर्ण कोलमडली होती.कोरोना काळात या समस्यांना समोर गेल्याने युवकांना स्मशानभूमीची जाणीव झाली व त्यांनी लोकसहभागातून स्मशानभूमी उभारण्याचा संकल्प केला.......

स्मशानभूमी उभी करायचं तर ठरलं पण युवकांसमोर सर्वात मोठा प्रश्न होता तो म्हणजे जागा विकत घ्यायचा व स्मशानभूमी उभारायचा त्यासाठी गरज होती निधीची..... जवळपास ५ ते ६ लाख रुपये यासाठी लागणार होते मग काय ?......गरम रक्त असलेल्या सर्व युवकांनी प्रयत्न सोडले नाही त्यांनी स्वतःच्या खिशातून तर पैसे टाकलेच पण त्याच सोबत गावातील सर्वांकडून फुल ना फुलाची पाकळी म्हणून जेष्ठ नागरिक, शेतकरी, बाहेरगावी नौकरिस असलेले अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापन, पोलीस यांच्या मदतीने अक्षरशः एवढा निधी उभा केला....व स्मशानभूमीचं काम चालू केलं व आज हे काम प्रगतीपथावर आहे...काही दिवसातच स्मशानभूमी उभी राहील व सामान्य नागरिकांना त्याचा फायदा होईल........या लोकसहभागातून उभारलेल्या सामाजिक कार्यासाठी पुढाकार घेतलेल्या युवकांची व मोठ्या मनाने व सढळ हाताने मदत केलेल्या लोकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.....

गजेंद्र चव्हाण, संतोष राठोड, संजय चव्हाण, सतीश उगिले, रविकांत चव्हाण, विकास चव्हाण, दिलीप राठोड, बालाजी चव्हाण, गोविंदा राठोड, संदीप राठोड, प्रेमदास चव्हाण,मोहन चव्हाण, भगवान आडे, सतीश राठोड, विजय चव्हाण, मंगेश जाधव, उत्तम चव्हाण, सुनील राठोड,अंगद चव्हाण, पंढीत चव्हाण, व्यंकट चव्हाण, किसन चव्हाण,लिंबराज चव्हाण,लिंबराज राठोड इत्यादी.सर्वच लोकांचे नाव मला आठवत नाही माहित असलेल्या लोकांची नावे याठिकाणी मी नमूद केले आहे अजून बरीच नावे राहिली आहेत, कोणाची नावे चुकून राहिली असेल तर मी त्यांची याठिकाणी दिलगिरी व्यक्त करतो....आपल्या मोलाचा साथ व आशीर्वाद असच आमच्या पाठीशी असावा अशी अपेक्षा करतो...

तांड्यातील युवक,जेष्ठ नागरिक,शेतकरी, मोलमजुरी करणारे आपले बांधव, शिक्षक,प्राध्यापक,पोलिस,नगर पंचायतीचे नगरसेवक, प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नातून व लोकसहभागातून स्मशानभूमी ही बनविली जात आहे, हे आजच्या काळात खरोखरच कौतुकास्पद मानावे लागेल व सोबतच इतर गावे व तांड्यासाठी हे एक आदर्श घेण्यासारखे आहे.........सर्वांचं खूप सारं कौतुक व त्यांनी लोकसहभागातून उभारलेल्या या कार्यबद्दल सर्वांचे मनापासून अभिनंदन........


**डॉ.चव्हाण दिलीप लालू**

लोकप्रशासन विभाग प्रमुख ,

महात्मा गांधी महाविद्यालय,अहमदपूर

तालुका अहमदपूर,जि.लातूर,मो.९८८१०९०५८८